# प्रकरण तीन

## पशुसंवर्धन विभाग

**3.725 पशुवैदयकीय दवाखान्यांना पेटंट औषध व लसीचा पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर योजनेकरीता रक्कम रुपये 48,71,149/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे आक्षेप आहेत.

1) सन 2016-2017 करीता मंजूर तरतूदीस मंजूरी घेताना सन 2015-2016 चा अखर्चीत निधी अंदाजपत्रकात समाविष्ट करुन त्याप्रमाणे मागणी करणे आवश्यक आहे. प्रथम सन 2015-2016 च्या अखर्चीत निधीतून रुपये 28,75,625/- व सन 2016-2017 मध्ये प्राप्त अनुदान रुपये 19,95,524/- मधून त्याच आर्थिक वर्षात दरपत्रके मागवून खरेदी केली आहे. आर्थिक वर्षात दोन वेळा त्याच प्रकारची पेटंट औषधे व लसीची खरेदी का करण्यात आली, याचा खुलासा सादर करावा.

2) सदर खरेदीची प्रशासकीय मंजूरी व तांत्रीक मंजूरी एकाच दिवशी घेण्यात आली आहे, याचे प्रयोजन काय हे स्पष्ट करावे.

3) दरकरारातील अट क्रमांक 4 व 6 अन्वये औषधाचे दरात (परिशिष्ट-अ) औषधे थेट तालुक्यांपर्यंत पोहचविण्याचे दर समाविष्ट असतांना औषधे पशुवैदयकीय दवाखाना, पडघा, भिवंडी येथे पुरवठादाराना पुरवठा करण्याकरीता आदेशित केलेले दिसून येते. अधिनस्त असलेले पशुवैदयकीय दवाखाने हे शहापूर, मुरबाड, भिवंडी, अंबरनाथ, कल्याण तालुक्यात असल्याने संबधित सर्व तालुक्यातील दवाखान्यांना पडघा येथे वारंवार येऊन औषधे घेऊन जावे लागते. प्रत्यक्षात पुरवठादाराने 5 ही तालुका स्तरावर औषध पोहचविणे आवश्यक असून दरकरारामध्ये वाहतुकीसह दर असल्याने तशी कार्यवाही करत नसल्याने सर्व तालुक्यांना औषधे प्राप्त करुन घेण्याकरीता पुन्हा खर्च करावा लागत आहे. 5 तालुक्यांना औषध उचलण्याकरीता प्रत्यक्ष तालुक्याच्या ठिकाणांहून केलेल्या खर्चाची परिगणना करुन तो खर्च संबधीत पुरवठादाराच्या देयकातून वसूल करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न केल्याने झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करुन तालुक्यांनी पडघा येथे केलेल्या वाहतुकीची रक्कम वसुल करावी.

4) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 5 अन्वये औषधाची तपासणी शासकीय प्रयोगशाळेकडून करुन त्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक असताना उपरोक्त 14 ही औषधाचा चाचणी अहवाल नस्तीत दिसून आला नाही.

5) विभागामार्फत 5 तालुक्यांना वरील 14 औषधांचे वाटप या योजनेअंतर्गत करण्यात येतात. तालुक्यांनी मागणी करताना 3 वर्षाचा आढावा घेऊन तशी मागणी करणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त पेटंट औषधेही एकाच आर्थिक वर्षात दोन वेळा देण्यात आली याचे प्रयोजन काय? जिल्हा स्तरावर त्याची तपासणी होणे आवश्यक आहे. तरी त्याचा तपासणी अहवाल नस्तीत आढळून आला नाही.

6) प्रथम पुरवठा आदेशात पुरवठा करण्याची मुदत 60 दिवस होती. मात्र दिनांक 31/12/2016 रोजी दिलेल्या पुरवठा आदेशात मुदत 30 दिवस देण्यात आली याचे कारण काय, याचा खुलासा करावा.

7) पंचायत समितीकडून मागणी प्रत्यक्षात कोणत्या दिनांकास प्राप्त झाली, याचा दिनांकीत अहवाल नस्तीत दिसून येत नाही.

8) सन 2016-2017 च्या तरतुदीतून पेटंट औषध व लसीची दुस-यांदा खरेदी करताना दिनांक 01/12/2016 रोजी दरपत्रके मागविण्यात आली. उदयोग, उर्जा व कामागार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस2014/प्र.क्र.82/भाग- III/उदयोग-4, दिनांक 01/12/2016 मधील खरेदी रुपये 3 लक्षच्या वरील असताना ई-निविदा प्रक्रिया का राबविण्यात आली नाही, याचा खुलासा करावा.

**3.726 75 टक्के अनुदानावर अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमातींच्या लाभार्थींना शेळी गट (10+1) वाटप करणे.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** अनुसूचित जाती / नवबौध्द / अनुसुचित जमातींच्या लाभार्थींना ग्रामीण भागात स्वयंरोजगारादवारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शेळी गट

वाटप करण्यात आलेले आहेत. एकूण 21 लाभार्थ्यांना रक्कम रुपये 7,53,606/- एवढे अनुदान गट स्तरावर वर्ग केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपी-10-2004/18103/ प्र.क्र.367/पदुम-4, दिनांक 05/10/2004 परिशिष्ट ब मधील क्रमांक 11 नुसार पशुधन विकास अधिकारी यांनी दर तीन महिन्यांनी योजनेतील प्रत्येक जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करुन सदयस्थिती अहवाल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना सादर करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) या योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थींना सलग तीन वर्ष व्यवसाय करणे आवश्यक असून त्या कालावधीत जनावरांचा विमा काढणे आवश्यक आहे. भिवंडी व शहापूर यांची विमा कागदपत्रे नस्तीत आढळून आली नाहीत, तर मुरबाड मधील 7 लाभार्थ्यांची विमा कागदपत्रे नाहीत.

3) श्री. शरद अंनता पवार व श्रीमती जागृती शरद पवार, शहापूर हे एकाच कुटुंबातील असताना त्या दोघांना लाभ दिला असल्याने एकच लाभ मान्य करुन रुपये 35,886/- ची वसुली करण्यात यावी. तसेच गट स्तरावर पशुधन विकास अधिकारी यांनी लाभार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करणे व जिल्हा स्तरावरील संबंधीतांनी ही अर्जाची छाननी करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न केल्याने अश्या अनियमितता होत आहेत, हे लेखापरीक्षणात दिसून येत आहे. तरी याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे, याचा खुलासा सादर करावा.

4) कृषि विभाग, पशुसंवर्धन विभाग, दुग्धव्यवसाय विकास विभाग व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 3 नुसार लाभार्थी निवड करतांना एकूण लाभार्थींच्या 33 टक्के महिला लाभार्थींना लाभ देणे आवश्यक असतांना 33 टक्के पेक्षा कमी महिला लाभार्थींना लाभ दिलेला आहे.

5) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2011/प्र.क्र.414/पदुम-4, दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थींना या योजनेत लाभ देण्यात यावा. असे असतांना सदर योजनेत 3 टक्के विकलांग लाभार्थींना लाभ दिलेला नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968, नियम 91 प्रमाणे शिल्लक साठा व विनियोजन प्रमाणपत्र तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रावी/पीसी-1083/सीआर 1074/ 574 दिनांक 02/07/2013 नुसार उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना शहापूर व भिवंडी गटांचे उपयोगिता प्रमाणपत्र फाईल सोबत प्राप्त झालेले नाहीत.

**3.727 जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना सन 2016-2017 अंतर्गत पशुवैद्यकिय संस्थाना जीवरक्षक औषधाचा पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, पालघर येथील सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना सन 2016-2017 अंतर्गत पशुवैद्यकिय संस्थाना जीवरक्षक औषधाचा पुरवठा करणे या कामासाठी केलेल्या खर्चाची नस्ती व देयकाची तपासणी केली असता सदरबाबत रक्कम रुपये 45,99,996/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांचे पुरवठा आदेशातील अट क्रमांक 2 नुसार पुरवठादाराने पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून 60 दिवसांचे मुदतीत औषध पुरवठा करणे आवश्यक आहे. औषध विलंबाबाबत कोणत्याही सबबी ग्राह्य मानल्या जाणार नाहीत अथवा सूट दिली जाणार नाही. मुदतीत पुरवठा न केल्यास भांडार नियमावलीनुसार पुरवठा न केलेल्या मालाच्या किंमतीच्या प्रती आठवडा 0.5 टक्के प्रमाणे अथवा सदर रक्कम रूपये 1 लाखापेक्षा जास्त असल्यास कमाल 5 टक्के दंड आकारण्यात येईल, असे नमुद आहे. या अनुषंगाने उपरोक्त नमुद खर्च देयकांची तपासणी केली असता देयकातून कमी दंड कपात करण्यात आलेला आहे. तरी कमी दंड कपात रक्कम रूपये 1,69,562/- संबधिताकडून वसूल करण्यात यावी व लेखापरीक्षणास अनुपालन दर्शवावे.

2) प्रमाणक क्रमांक 12 दिनांक 04/10/2016 या देयकाची तपासणी केली असता पुरवठा आदेश क्रमांक 499 दिनांक 23/06/2016 मधील अट क्रमांक 5 अन्वये पुरवठा झाल्यानंतर प्राप्त झालेल्या औषधांचा नमुना शासन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येईल. स्पेसिफिकेशननुसार औषधाचे नमुने आढळल्यानंतर देयक अदा करण्यात येईल, असे नमुद असतांनाही Chlorpheniramine Maleate Inj I.P या औषधाच्या तपासणी अहवालानुसार सदर तपासणी अहवाल पुरवठा आदेश देण्यापूर्वी प्राप्त करण्यात आलेला आहे.

3) चलनावर औषध स्विकारणा-याचे नाव, पदनाम व दिनांकित स्वाक्षरी, साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याबाबत व जडवस्तू संग्रह नोंदवही पृष्ठ क्रमांक नमुद असणे आवश्यक आहे. गट/ दवाखाना यांचेकडून प्राप्त झालेल्या चलनाच्या मूळ प्रती एकत्रित करणे व औषध सुस्थितीत प्राप्त झाल्याबद्दल संबधित कार्यालयाचे लेखीपत्र (जावक क्रमांक व दिनांकासह) या कार्यालयास प्राप्त झाल्याखेरीज देयक अदा केले जाणार नाही, असे नमुद असूनही प्रमाणक क्रमांक 39 दिनांक 06/10/2016 या देयकाची तपासणी केली असता डिलिव्हरी चलनावर औषध स्विकारणाऱ्याचे नाव नाही.

4) दरकरार मंजूर आदेशातील अट क्रमांक 15 नुसार जिल्हास्तरीय मागणी करणा-या अधिका-यांनी अधिनस्त पशुवैद्यकिय दवाखान्यांकडून आवश्यक औषधांची मागणी घ्यावी व पशूवैद्यकिय दवाखान्यांनी 3 वर्षाचा आढावा घेऊन आवश्यक मागणी करावी, असे नमुद आहे. तालुकानिहाय मागणी तक्त्याची तपासणी केली असता सदर तक्त्यावर तालुक्याचा जावक क्रमांक व दिनांक नोंदविलेला नाही. तसेच प्रत्यक्षात जिल्ह्यास मागणी केव्हा प्राप्त झाली, याबाबतचीही नोंद घेण्यात आलेली नाही.

5) 8 तालुक्यांना औषधाचे वाटप झाले आहे. त्या तालुक्यांच्या अधिका-यांकडून विनियोग दाखले लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत.

**3.728 योजनेत्तर योजना सन 2016-2017 रुग्णालये व दवाखाने, फिरते पशुवैद्यकिय चिकित्सालये आधारभूत ग्राम योजना अंतर्गत सामुग्री व पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, पालघर येथील सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील योजनेत्तर योजना सन 2016-2017 रुग्णालये व दवाखाने, फिरते पशुवैद्यकिय चिकित्सालये आधारभूत ग्राम योजना अंतर्गत सामुग्री व पुरवठा करणे या कामासाठी केलेल्या खर्चाची नस्ती व देयकाची तपासणी केली असता सदरबाबत रक्कम रुपये 11,66,114/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खर्च देयकाची तपासणी केली असता पुरवठा आदेशातील अट क्रमांक 5 नुसार पुरवठा झाल्यानंतर प्राप्त झालेल्या साहित्याचा नमुना शासन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडे पाठविण्यात येईल. स्पेसिफिकेशननुसार साहित्याचे नमुने आढळल्यानंतर देयक अदा करण्यात येईल, असे नमुद आहे. परंतु, साहित्य तपासणी अहवाल नसतानाही देयक अदा करण्यात आलेले आहे.

2) 8 तालुक्यांना साहित्याचे वाटप झाले आहे. त्या तालुक्यांच्या अधिका-यांकडून विनियोग दाखले लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाहीत.

3) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे हत्यारे, अवजारे, उपकरणे खरेदी भावबंद दर करार सन 2014-2016 चे पत्र जा.क्र. व्हीईटी/टेंडर/326/16/2014-16/पसं-12/ औंधपुणे, दिनांक 04/01/2016 मध्ये 01 ते 15 सुचना देण्यात आल्या असून सदरील सूचनांमधील सूचना क्रमांक 14 नुसार जिल्हा पशूसंवर्धन अधिकारी यांनी हत्यारे, अवजारे, उपकरणे यांची मागणी करण्यापूर्वी त्यांचे अधिनस्त पशूवैद्यकिय दवाखान्यांकडून आवश्यक हत्यारे, अवजारे, उपकरणे यांची मागणी घ्यावी व त्यासाठी सर्व पशूवैद्यकिय दवाखान्यांच्या प्रमुखांनी त्यांच्या दवाखान्यात गेल्या 3 वर्षात उपचारासाठी आलेल्या पशूरुग्णांच्या आजाराचा आढावा घेऊन लागणा-या औषधीची मागणी करावी. परंतु, गेल्या 3 वर्षात उपचारासाठी आलेल्या पशूरुग्णांचा आढावा घेऊन लागणा-या औषधी मागणी केल्याबाबतचे दस्तऐवज नस्तीत उपलब्ध झाले नाही.

**3.729 वैरण विकास योजने अंतर्गत हायड्रोपोनीक मशीनचा पुरवठा करणे (अनुदान 75 टक्के)**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत रक्कम रुपये 13,00,000/- खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा पशुसंवर्धन विभागाने वैरण विकास योजने अंतर्गत 29 हायड्रोपोनीक मशीनचा पुरवठा केलेला आहे. सदर खरेदीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1084/सी आर/1633/578, दिनांक 19/01/1985 नुसार योजनेसाठी लाभार्थ्याचे अर्ज मंजूर झाल्यावर लाभार्थ्यांनी प्रथम हिस्सा रक्कम भरणा करणे आवश्यक असताना उशीराने भरणा केला आहे.

2) लाभार्थ्यांकडे हायड्रोपोनीक मशिनसाठी पुरेशी जागा असल्याबाबतची कागदपत्रे नस्तीत आढळून आली नाहीत. लाभार्थ्याने हायड्रोपोनीक मशिन चालवणे विषयक तांत्रिक प्रशिक्षण घेतल्याबाबतची आवश्यक कागदपत्रे नस्तीत आढळून आली नाहीत.

3) लाभार्थ्यांस / कुटुंबास शासनाच्या इतर विभागाच्या कोणत्याही विशेष घटक / आदिवासी क्षेत्र / आदिवासी क्षेत्राबाहेरील / आदिवासी क्षेत्र उपाययोजने अंतर्गत पुढील पाच वर्षासाठी लाभ देता येणार नाही. यासाठी अशा लाभार्थ्यांची यादी सबंधित ग्रामपंचायतीस, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना पाठवून सदर लाभार्थ्यांना वरील योजनेतून मागील पाच वर्षात लाभ दिला गेला आहे किंवा कसे, याची खात्री जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी केलेली नाही.

4) तालुकास्तरीय अधिकाऱ्याने लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकारून प्राप्त झालेली सर्व अर्ज जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्याकडे जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे आहे व प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी. परंतु, तशा प्रकारे कार्यवाही जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी केलेली नाही.

5) हायड्रोपोनीक मशीन वाटप केलेले लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय दवाखान्यात कार्यक्षेत्रातील असतील, त्या पशुवैद्यकीय दवाखान्यावरील पशुधन विकास अधिकारी / पशुधन पर्यवेक्षक यांनी सदर हायड्रोपोनीक मशीन विषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात व त्याची नोंद स्वतंत्र नोंदवहीत घेण्यात यावी. वाटप केलेल्या हायड्रोपोनीक मशीन लाभार्थी / पशुपालकांच्या घरी जाऊन 100 टक्के पडताळणी करण्यात यावी व त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्यामार्फत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना पाठविणे आवश्यक होता. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नसून तसा अहवाल नस्तीसोबत जोडलेला नाही.

6) पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या एकूण हायड्रोपोनीक मशीनची 25 टक्के प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना पाठविणे आवश्यक होता. परंतु, वरीलबाबत कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

7) सदर योजनेमध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत दिलेल्या हायड्रोपोनीक मशीन पासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे अभिलेखे ठेवण्यात यावे. तसेच सदर योजनेंतर्गत केलेल्या कार्यवाहीबाबतच्या नोंदी पशुवैद्यकीय संस्थेकडे ठेवण्यात याव्यात. ही माहिती पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे मार्फत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना सादर करणे आवश्यक होते. परंतु, तसे माहिती सादर केलेली नाही.

8) सदर योजनेच्या नस्तीसोबत मुद्रांक पेपर जोडले आहेत. परंतु, त्या पेपरवर हमी कालावधी संबंधी करारनामा केलेला नाही. निविदाकाराकडून पुरवठा झालेल्या हायड्रोपोनीक मशीनची गुणात्मक आणि संख्यात्मक तपासणी झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत प्राप्त पुरवठ्याची रक्कम अदा करावी, असे निर्देश असताना सुध्दा विभागाने तदपूर्वीच रक्कम अदा केलेली आहे.

9) शासन परिपत्रक क्रमांक पीआरसी/1082/सी आर/1974/67, दिनांक 29/07/1983 नुसार विनियोग व उपयोगिता प्रमाणपत्र तपासणीस उपलब्ध झाले नाही.

**3.730 जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखाने यांना एक्सरे मशीन पुरवठा करणे. (नावीन्यपूर्ण योजना) X RAY MACHINE WITH CR (FOR VET.USE).**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत रक्कम रुपये 29,51,500/- खर्च करण्यात आला आहे. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी X RAY MACHINE WITH CR (FOR VETERINARY USE) खरेदी केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी वरील साहित्य खरेदी करण्यापूर्वी गटांकडून मागणी घेणे आवश्यक होते. परंतु, अशी कोणत्याही प्रकारची मागणी गटाकडून प्राप्त झाल्याचे लेखे नस्तीसोबत नाहीत.

2) वरील साहित्य खरेदी करण्यापूर्वी कंपनीबरोबर करारनामा करणे आवश्यक होता. परंतु, तसा करारनामा केल्याचे आढळून आले नाही.

3) आधी खरेदी केलेले साहित्य किती आहेत, आता कोणत्या दवाखान्याची मागणी आहे, या विषयी कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही अथवा नस्तीमध्ये उल्लेख नाही.

4) कोणत्याही साहित्याची 03 वर्ष वारंटी देखभाल (हमी कालावधी) असताना मागील किती साहित्य सुस्थितीत असल्याबाबतची माहिती नस्तीसोबत उपलब्ध नाही.

5) पुरवठा आदेशामध्ये X-Ray Machine with CR कोणत्या प्रकारचे मॉडेल (specification) नमुद नाही. सदर वस्तूचे केंद्र शासनाचे दर करार व केंद्रीय भांडाराचे दर करार उपलब्ध असताना देखील ई-निविदा मागवून खरेदी केली आहे. त्यामुळे दर करारातील दर व ई-निविदा दर यामध्ये तफावत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरबाबत सखोल चौकशी करून खरेदी दर योग्य असल्याची पूर्तता दर्शवावी.

6) निविदाकाराकडून पुरवठा झालेल्या X-Ray Machine with CR ची गुणात्मक आणि संख्यात्मक तपासणी झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत प्राप्त पुरवठ्याची रक्कम अदा करावी असे निर्देश असताना सुद्धा विभागाने तदपूर्वीच रक्कम अदा केलेली आहे.

7) X RAY MACHINE WITH CR मशीन हाताळणी करणाऱ्याने सदर यंत्र चालवणे विषयक तांत्रिक प्रशिक्षण घेतल्याबाबतची आवश्यक कागदपत्रे नस्तीत आढळून आली नाहीत.

**3.731 जिल्हा परिषद सेसमधून गोचिड निर्मुलन योजना राबविणेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-17 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद सेसमधून गोचिडजन्य आजारांनी जनावरे बळी व मर्तुक दिसतात. यासाठी औषध खरेदीकरीता रक्कम रुपये 15,98,918/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर औषधांकरीता तालुकानिहाय मागणी यांचे लेखे तपासले असता सदर मागणी पत्रावर जावक क्रमांक नाही. तर काही पत्रावर दिनांक नमुद करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर मागणी केल्याचे ग्राहय आहे किंवा कसे, याबाबत साशंकता वाटते. तालुकानिहाय मंडणगड, रत्नागिरी, लांजा, राजापुर यांच्या पत्रावर जावक क्रमांक नाही. परंतु, दिनांक नमुद आहे. तसेच तालुका दापोली, खेड, चिपळुण गुहागर, संगमेश्वर यांच्या मागणीवर दिनांक व जावक क्रमांक नमुद नाही. तरी याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) औषध खरेदी करतांना पंचायत समिती निहाय मागणी व शिल्लक साठा याचा आढावा घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर औषधी खरेदीच्या प्रयोजन मानकाप्रमाणे खरेदी करणे आवश्यक होते. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याबाबत आढळुन आले नाही.

3) आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांचे सुचनेनुसार औषधांचे पार्सल कार्यालय प्रमुखांनी स्वत:च्या उपस्थितीत व इतर दोन अधिकाऱ्यांच्या समक्ष औषध मागणीप्रमाणे प्राप्त झाल्याची खातर जमा करणे आवश्यक आहे.

4) देयकाची तपासणी केली असता औषधी प्राप्त झालेबाबतचे चलनाची पोच पावती उपलब्ध न झाल्याने औषधे विहित मुदतीत प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स व्यवसाय विभागाकडील शासन निर्णय क्रमांक डिआयएस-2009/ प्र.क.435/ पदुम-4, दिनांक 05/03/2010 मधील परि.13 नुसार औषधांची गुणवत्ता तपासणी करुन देयकाची अदायगी करणे आवश्यक आहे.

6) तालुका स्तरावर पशुवैदयकीय दवाखानातील औषधाची उपयोगाची व साठयाची मागणी नियंत्रण अधिकाऱ्यांनी दर 3 महिन्यांनी तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच वाटप केलेल्या औषधांबाबत तालुक्याचे उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

**3.732 पशुपालकांना स्वच्छ गोठ्याकरीता ट्रॉली पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-17 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,98,800/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तालुका स्तरावरुन लाभार्थ्यांचे पाठविलेले मागणी प्रस्ताव व जिल्हा स्तरावरील लाभार्थींची मंजुर यादी लेखापरीक्षणास पहावयास मिळाले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर /1633, दिनांक 19/01/1985 अन्वये प्रथम लाभार्थी हिस्सा वसुल करणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळुन आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे दुबार लाभ दिले जाणार नाही यांची खातरजमा करता येते. त्याप्रमाणे नोंदवही ठेवल्याचे आढळुन आले नाही.

4) देयकाची तपासणी केली असता साहित्य प्राप्त झालेबाबतचे चलनाची पोच पावती उपलब्ध न झाल्याने साहित्य विहित मुदतीत प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

5) साहित्याची आय टी आय रत्नागिरी अथवा शासकीय तंत्र निकेतन यांचेकडुन तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, त्याबाबत अहवाल नस्तीत आढळुन आलेला नाही.

6) सदर साहित्यांची तालुका स्तरावर पोच झाल्याची पावतीवर प्राप्त दिनांक नमुद केलेले नाहीत. त्यामुळे सदर साहित्य पुरवठा आदेशातील अटी नुसार 30 दिवसात पोच केल्याची खात्री करता आली नाही. त्यामुळे संबंधित पुरवठादारावर विलंबाने पुरवठा केल्याबाबत दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच तालुका स्तरावरुन लाभार्थी यांना साहित्य सुस्थितीत पोच झाल्याबाबतची पावती व विनियोग अहवाल नस्तीत आढळुन आलेले नाही.

**3.733 गोठ्याकरीता रबर मॅट पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा परिषद सेसमधून 10 टक्के लाभार्थी हिस्सा व 90 टक्के अनुदानामधून रबर मॅट पुरविणे यावर रक्कम रूपये 7,48,440/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तालुका स्तरावरुन लाभार्थ्यांचे पाठविलेले मागणी प्रस्ताव पत्रावर मंडणगड, दापोली, चिपळुण, गुहागर, संगमेश्वर यांचा जावक क्रमांक व दिनांक नमुद केलेले नाही. तसेच तालुका रत्नागिरी यांचे पत्रावर जावक क्रमांक नमुद नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव विहीत वेळेत प्राप्त न झाल्याची साशंकता वाटते. तसेच जिल्हा स्तरावरील लाभार्थी मंजुर यादी लेखापरीक्षणास पहावयास मिळाली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/ 1633, दिनांक 19/01/1985 अन्वये प्रथम लाभार्थी हिस्सा वसुल करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळुन आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदने राबविण्यात येणा-या योजनेसाठी वेळापत्रकानुसार योजनेस

दिनांक 30 जुन पर्यंत प्रशासकीय व तांत्रिक मंजुरी देणे आवश्यक आहे व दिनांक 30 नोव्हेंबर अखेर पर्यंत साहित्य वाटप करणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55/34, दिनांक 05/10/1989 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे दुबार लाभ दिले जाणार नाही याची खातरजमा करता येते. त्याप्रमाणे नोंदवही ठेवल्याचे आढळुन आले नाही.

5) देयकाची तपासणी केली असता साहित्य प्राप्त झालेबाबतचे चलनाची पोच पावती उपलब्ध न झाल्याने साहित्य विहित मुदतीत प्राप्त झाल्याची खात्री करता आली नाही.

6) साहित्यांची आय टी आय, रत्नागिरी अथवा शासकीय तंत्र निकेतन यांचेकडुन तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, त्याबाबत अहवाल नस्तीत आढळुन आलेला नाही.

**3.734 अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** जिल्हा वार्षिक योजनामधून अनुसुचित जातीच्या लाभार्थ्याना प्रशिक्षण देणेकरीता रक्कम रुपये 5,00,000/- इतकी रक्कम तालुका स्तरावर वितरीत करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तालुका स्तरावर अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना प्रशिक्षण शिबिर घेणेबाबतचे मागणी प्रस्तावाचे पत्रावर जावक क्रमांक नमुद करण्यात आलेला नाही.

2) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण 2011/प्र.क्र.414/पदुम 4 दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थी यांना लाभ देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळुन आले नाही.

3) लाभार्थी निवडताना एकुण लाभार्थ्यांच्या 30 टक्के महिला लाभार्थी निवडीस प्राधान्य देणे आवश्यक आहे.

4) कार्यान्वयीन यंत्रणांनी योजनेमध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांची यादी माहिती फलकावर व विभागाच्या बेबसाईटवर प्रसिध्दी करणे व सदर यादी एम.पी.एस/एम.एस या प्रणालीवर नोंदविणे आवश्यक आहे.

5) जा.क्र.पंसर/पशु/89/17/पं.स.रत्ना, दिनांक 08/01/2017 अन्वये प्रशिक्षण आयोजित दिनांक 02/02/2017 ते 04/02/2017 केलेबाबत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना कळविले आहे. सोबत कार्यक्रम पत्रिका जोडण्यात आली आहे, असे नमुद केले आहे. परंतु, कार्यक्रम पत्रिका नस्तीत आढळुन आली नाही. तसेच तालुका लांजा, गुहागर, खेड, दापोली, संगमेश्वर, मंडणगड, दापोली यांनी प्रशिक्षण कार्यक्रम केव्हा आयोजित केलेबाबतचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांना पत्राने कळविलेबाबत अभिलेखे आढळुन आले नाही. त्यामुळे सदर प्रशिक्षणाचा अनुसुचित जातीच्या लाभार्थ्याना लाभ दिले किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

6) तालुका स्तरावरील लाभार्थी निवड यादी मंजुरी मिळणेबाबत जिल्हा पशुधन अधिकारी यांनी केलेल्या पत्रव्यवहाराचे अभिलेखे व वितरीत केलेले अनुदान यांचा विनियोग केलेबाबतचे तालुका मंडणगड, संगमेश्वर, लांजा यांचे अहवाल नस्तीत आढळुन आले नाही.

**3.735 पशुपालकांना किटली, बादली, घमेले व फावडे संच पुरविणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रुपये 14,99,091/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 2012/प्र.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये जिल्हा परिषदेच्या वतीने खरेदी करण्यात येणाऱ्या सामग्री विषयी मार्गदर्शक तत्वे दिलेली असतांनाही जिल्हा परिषदेने योजना राबवितांना प्रथम लाभार्थी यादी निवड न करताच खरेदी प्रक्रिया करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1084/सी आर/1633/56, दिनांक 19/01/1995 नुसार लाभार्थी हिस्सा साहित्य खरेदी आदेश देण्यापूर्वी वसूल केलेला नाही. सदरील योजना 75 टक्के

अनुदानावर राबविण्यात आलेली असल्याने संबधित लाभार्थ्यांची 25 टक्के लाभार्थी हिस्सा मक्तेदारास कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी जमा करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही केलेली नाही.

3) सभापती, पशुसंवर्धन व दुग्ध विकास सामिती, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी सदरील योजनेसाठी तालुकानिहाय एकूण 2,067 लाभार्थ्यांची निवड केलेल्या तालुकानिहाय लाभार्थी यादी लेखापरीक्षणास प्राप्त झालेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/ प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 अन्वये जिल्हा परिषद करण्यात येणाऱ्या कार्य करारावर मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 34 चे अंमलबजावणी बाबत सूचित केल्यानुसार संबंधित मक्तेदारासोबत रक्कम रुपये 1,100/- च्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न केल्याने रक्कम रुपये 1,000/- चे नुकसान झालेले आहे. सदरची रक्कम वसूल करण्यात यावी.

5) जिल्हा परिषद स्तरावर खरेदीकरून पंचायत समिती स्तरावर पाठविण्यात आलेले साहित्याची वाटप यादी व संबंधित लाभार्थ्यांना पोहोच झाल्याबाबत संबंधितांचे पोहोच लेखापरीक्षणास प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे सदरील योजनेचे उद्दिष्ट सफल झाल्याचे दिसून येत नाही.

**3.736 पशु रोगावर नियंत्रण फिरते पथकास यंत्र व साधन सामुग्री पुरविणेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पशुसंवर्धन विभागाने पशु रोगावर नियंत्रण फिरते पथकास यंत्र व साधन सामुग्री पुरविण्यासाठी ई निविदा मागवून पुरवठादार गस्टो फार्मा, जालना रक्कम रुपये 20,998/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) करारातील अट क्रमांक 8 नुसार साहित्य गुणवत्ता चाचणी शासनमान्य प्रयोगशाळेकडून चाचणी अहवाल (Quality Analysis report) घेऊन त्याची एक प्रत नस्तीमध्ये ठेवणे गरजेचे होते. परंतु, चाचणी अहवाल उपलब्ध नाही. चाचणी अहवालाखेरीज औषधांचा वापर करणे धोक्याचे असून नियमबाहय आहे. तरी चाचणी अहवाल न घेता पुरवठा स्विकारणेबाबत खुलासा व्हावा.

2) निविदा धारकांची नोंदविलेल्या दराची तुलना करता गस्टो फार्मा, जालना यांचे दर इतरांपेक्षा 50 टक्के कमीच्या दरम्यान आढळून येतात. त्यांचेकडील सर्व साहित्याची चाचणी अत्यावशक आहे. तरी ती मिळवून दाखवावी.

3) गटाकडील मागणी एकत्रित करता 1,300 नग 10 ml सिरींजची गरज होती. परंतु, मागणी 4,242 नगांची कोणत्या आधारे केली व जरुरीपेक्षा जास्त वाटप केलेले आहे. हे संयुक्तीक वाटत नाही. तरी याबाबत खुलासा व्हावा.

**3.737 पशुवैद्यकीय संस्थाना औषध पुरवठा करणेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** पशुसंवर्धन विभागाने जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत 77 पशुवैद्यकीय संस्था कार्यरत असून सदर दवाखान्याच्या दैनंदिनी वापरासाठी आवश्यक असलेली औषधे हत्यारे/ उपकरणे इत्यादी खरेदी ई - निविदा मागवून पुरवठादार गस्टो फार्मा, जालना रक्कम रुपये 7,75,510/-, वर्धन डिस्ट्रीब्यूटर्स, कोल्हापूर रक्कम रुपये 1,99,750/- व विशाल एंटर प्रायजेस, कोल्हापूर रक्कम रुपये 37,24,736/- अशी एकूण रक्कम रुपये 46,99,996/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुसंवर्धन विभागाकडील 77 पशु वैद्यकीय दवाखान्यांना औषध पाहिजे असल्याबाबतचे संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याकडील औषध मागणीपत्रक दप्तरी आढळून आलेले नाही. त्यामुळे मागणी निश्चित नसताना औषध कोणत्या आधारे खरेदी केले, याबाबत समर्पक खुलासा द्यावा.

2) खरेदी करण्यात आलेले औषधे गुणवत्तापूर्ण तपासणी शासनमान्य गुणवत्ता प्रयोगशाळेकडून करून घेतल्याचा गुणवत्ता अहवाल दप्तरी आढळून येत नाही. उदा. गस्टो फार्मा, जालना

3) संबंधित पुरवठादारानी पुरवठा केलेल्या औषधांचा दर्जा व मानकाप्रमाणे पुरवठा केल्याबाबतचा दाखला जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्गयांनी नस्तीसोबत ठेवलेला नाही.

4) सादिल रजिस्टर पान क्रमांक 65 खर्चाचे प्रमाणक क्रमांक व दिनांक, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली नाही.

5) नमुना नंबर 33 स्टॉक रजिस्टर तपासले असता tax invoice पावतीवर batch 23871 व expairy 09/2019 अशी असताना स्टॉक रजिस्टरमध्ये batch SL 7207 व expairy date 02/2019 अशी नमूद केलेली आहे. या तफावतीबाबत योग्य तो खुलासा द्यावा.

6) संबंधित आठ तालुक्याना वितरीत केलेले औषध यांचे तालुका पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांचे उपयोगिता व विनियोग दाखले घेवून दप्तरी ठेवलेले नाहीत.

**3.738 पशु वैद्यकीय दवाखान्याना क्षारमिश्रणे जीवनसत्वे व अत्यावशक औषध खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पशुसंवर्धन विभागाने जिल्हा परिषद योजनेतून अंतर्गत 77 पशुवैद्यकीय दवाखान्यांने कार्यरत असून सदर दवाखान्याच्या दैनंदिनी वापरासाठी आवश्यक असलेली क्षार मिश्रणे जीवनसत्वे व अत्यावशक औषध इत्यादी खरेदी ई - निविदा मागवून पुरवठादार विशाल एंटर प्रायजेस, कोल्हापूर रक्कम रुपये 18,00,000/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निविदेतील दर समान आल्यामुळे पुरवठादार विशाल एंटर प्रायजेस, कोल्हापूर व गस्टो फार्मा, जालना यांना वाटाघाटीसाठी व चर्चेस बोलविण्यात आल्याचे पत्र दप्तरी ठेवलेली नाहीत. त्यामुळे सदरची पत्रे पुरवठादार यांना कधी मिळाल्याची व वाटाघाटीसाठी व चर्चेस उपस्थित राहिल्याचे पडताळणी करता आलेली नाही.

2) संबंधित आठ तालुक्याची चिलेटेड कॅल्शियम मागणीपत्रक दप्तरी उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे मागणी नसताना खरेदी करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

3) दप्तरी करारनामा असून तो साक्षांकित प्रत जोडलेली नाही.

4) सादिल खर्चाचे रजिस्टर पान क्रमांक 63 वर सदर देयकाची नोंद घेतलेली आहे. परंतु, नोंदवहीमध्ये प्रमाणक क्रमांक व दिनांक जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांची स्वाक्षरी केलेली नाही.

5) मंजूर निविदाधारक यांनी पुरवठा करण्यात आलेल्या औषधाची गुणवत्तापूर्ण तपासणी शासनमान्य गुणवत्ता प्रयोगशाळाकडून करून घेतल्याचे दप्तरी आढळून येत नाहीत. तसेच मंजूर निविदा धारकांची कागदपत्रे व प्रमाणपत्र साक्षांकित केलेली दप्तरी ठेवलेली नाहीत.

6) पुरवठादार यांनी पुरवठा केलेले औषधांचा दर्जा निविदेतील मानक व निकषाप्रमाणे पुरविल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र व विनियोग दाखले घेवून दप्तरी ठेवलेले नाहीत.

**3.739 गोपालकांना 50 टक्के अनुदानावर स्वच्छ दुध निर्मिती व दुध उत्पादनात वाढ होणेसाठी साहित्य पुरविणे**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 9,99,514/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निवीदेसोबत पुरवठा दारांची पॅन नंबर दिलेले आहेत समृध्दी इंडस्ट्रीज लि. व समाधन इंडस्ट्रीज लि. चे प्रोप्रायटर रमाकांत नारायण मालु आहेत. त्यामुळे तीन पुरवठादाराऐवजी दोनच पुरवठादार पात्र ठरतात तसेच समृध्दी इंडस्ट्रीज लि. या पुरवठादाराचे प्राप्तीकर विवरणपत्रातील सन 2015-2016 मधील भागीदाराचे नाव ओमप्रकाश नारायण मालु हे आहे. समृध्दी व्हॅल्यु मार्केटिंग लि या पुरवठादार/ भागीदाराचे नाव ओमप्रकाश नारायण मालु आहे. त्यामुळे दोन्ही पुरवठादारांपैकी एका पुरवठादारास अपात्र ठरवणे आवश्यक होते

2) उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्रं 14/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील परिच्छेद क्रमांक 4.4.3.1 नुसार निवीदा स्पर्शात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन पात्र निवीदाकार असणे आवश्यक आहे. त्यामुळे फेर निवीदा काढणे आवश्यक होते. तथापि, फेर निवीदा न काढल्यामुळे

जिल्हा परिषदेस स्पर्धात्मक दराचा लाभ झाला नाही, असे दिसते. सबब खरेदी झालेले साहित्य वाजवी दरात खरेदी झाल्याबाबत खात्री देता येत नाही.

3) दिनांक 30/10/2015 शासन निर्णय मधील परिच्छेद क्रमांक 2.6.1 नुसार पैशाची इष्टतम किंवा आदर्श किंमत या तत्वाचे पालन करण्यासाठी खरेदी दाराने खरेदी किंमत किरकोळ विक्री किंमतीपेक्षा (MRP) जास्त असु नये, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. सदर खरेदीबाबत ई - निवीदेत प्राप्त झालेल्या किंमती एम आर पी पेक्षा जास्त नाहीत. याबाबत खात्री केल्याचा उल्लेख नाही. त्यामुळे खरेदी किंमत एम आर पी पेक्षा कमी होती किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही. याबाबत खुलासा करुन अनुपालन दर्शवावे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए2012/प्र.क्रं680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 नुसार भाग-4 मधील विकास योजनेसंदभ्ारत मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेतील ज्या विभागाची योजना असेल, त्या विभागाच्या प्रमुखांचा तांत्रिक सल्ला घेऊनच योजनेस तांत्रिक मान्यता दयावी, असे नमुद आहे. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे पत्र क्रमांक 486 दिनांक 16/07/2016 अन्वये प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील साहित्य खरेदी प्रस्तावास तांत्रिक सहमती मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. तथापि, तांत्रिक सहमती प्राप्त झालेली नाही. तरी आवश्यक त्या प्राधिकाऱ्याची मंजुरी घेऊन अनुपालन दर्शवावे

**3.740 सन 2016-2017 या बिगर आदिवासी क्षेत्रातील कामधेनू दत्तक ग्राम योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, धुळे संस्थेचे संस्थेचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील बिगर आदिवासी क्षेत्रातील कामधेनू दत्तक ग्राम योजनेवर रक्कम रुपये 19,82,358/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेवर अंदाजपत्रकात तरतूद मंजूर असून निधी उपलब्ध असतांना महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडील शासन निर्णय क्रमांक नापुयो-2010/प्र.क्र.150/ पदुम-1, दिनांक 29/10/2010 मधील अट क्रमांक 2 नुसार योजनेची अमंलबजावणी जंतनाशके पाजणे, गोचिड, गोमाशा निर्मलुन व रोगप्रतिकारक लसीकरण, वंधत्व निवारण शिबीर बाबींसाठी माहे मे महिन्यातील पुर्वनियोजित दिनांकास लसीकरण व शिबीरे यांचे आयोजन करणे आवश्यक आहे. परंतु, सदरचे कार्यक्रम कधी व केव्हा राबविले, याबाबत लेखापरीक्षणात नस्तीसोबत अभिलेखे उपलब्ध नाही.

2) सदर योजनेवर औषधी व खनिज मिश्रण व जिवनसत्वे सन 2016-2017 मध्ये माहे जुलै ते ऑगस्ट 2016 तसेच माहे फेब्रुवारी 2017 मध्ये खरेदी करण्यात आलेली आहेत. त्यामुळे मार्गदर्शक सुचनानुसार योजना फलश्रुती झाली, असे म्हणाता येत नाही.

4) सदर औषधाची तालुकास्तरावरुन मागणीपत्र प्राप्त करण्यात आलेली आहेत. मागणी पत्राची तपासणी केली असता एकाच प्रकारची मागणीपत्र तालुकास्तवरुन प्राप्त झालेली आहेत. औषध मागणीपत्रात भिन्नाता दिसून येत नाही.

5) सदर योजनेच्या नमुना नंबर 33 साठा नोंदवहीतून चाचणी अहवालासाठी पाठविण्यात आलेल्या सॅम्पल टेस्टींगसाठी मात्रा कमी करण्यात आलेली नाही. त्यामुळे चाचणी अहवालाचे रिपोर्ट कसे प्राप्त झाले, याबाबत लेखापरीक्षणात खात्री करता येत नाही. फक्त सॅम्पल टेस्टींगसाठी कागदोपत्री दाखविण्यात आल्याचे दिसून येते. सदरची बाब नियमोचित नाही. देयक पारीत करण्यासाठी चाचणी अहवाल प्राप्त करुन घेण्यात आलेली आहेत.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 मधील नियम 98 तसेच हॉस्पिटल मॅन्युअल खंड-1, चॉप्टर 26 परिच्छेद 18 नुसार सक्षम अधिकारी हे साठा नोंदवहीतील शिल्लक परिमाण व भांडारातील प्रत्यक्ष परिमाण यांची नियमितपणे पडताळणी करुन तत्संबंधित साठा नोंदवहीत प्रमाणपत्र देतील. त्याखेरीज सक्षम अधिकारी आपल्या अधिनस्त दवाखान्याच्या भेटीत चाचणी पडताळणी करुन तसा अभिप्राय नोंदवतील. तथापि, अशा प्रकार साठा पडताळणी केल्याचे लेखापरीक्षणात साठा नोंदवहीत दिसून येत नाही.

**3.741 कामधेनु दत्तक ग्रामयोजनाबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील आदिवासी उपयोजना अंतर्गत पशुवैदयकीय दवाखान्यांना औषध पुरवठा करणेबाबत तरतुद रक्कम रुपये 45,75,000/- करण्यात आली होती. त्या अंतर्गत 17 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 32,09,498/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सयव्यवसाय विभागाकडील शासन निर्णय क्रमांक डिआरएस-2009/प्र.क्र..435/पदुम-4, दिनांक 05/03/2010 मधील परि.क्र.13 नुसार गुणवत्ता तपासणी करुन त्यांची खात्री करुन लेखी पुरावा संग्रहीत ठेवुनच त्यानंतर देयकाची अदायगी करावी, असे स्पष्ट आदेश असतांना तशी गुणवत्ता तपासणी केल्याबाबतचे पुरावे नस्तीसोबत दिसुन येत नाहीत. तरी सदरचे गुणवत्ता तपासणी अहवाल नसतांना देयके पारित केल्याचे प्रयोजनाबाबत खुलासा करावा. तसेच उपरोक्त नमुद औषधांचे दिनांक 26/11/2008 शासन निर्णयातील मुददा क्रमांक 12 नुसार औषध मागणी अधिकाऱ्यांनी प्राप्त औषधांची गुणात्मक तपासणी आयुक्त पशुसंवर्धन मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून करुनच गुणवत्ता प्राप्त असलेल्या औषधांची अदागी करणे आवश्यक आहे. प्रस्तुत खरेदी प्रकरणे पुरवठादारांनी त्यांचे चाचणीय अहवाल सादर केलेले असले तरी मागणी अधिकारी यांनी तटस्थ पार्टीचे चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक होते.

गुणवत्ता चाचणी अहवाल उशिरा प्राप्त करुन चाचणी अहवालाबाबतचा उददेश सफल झालेला दिसुन येत नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या लेखा संहिता 1968 मधील नियम 98 आणि हॉस्पिटल मॅन्युअल खंड-1 चाप्टर-26 परिच्छेद-18 प्रमाणे सक्षम अधिकारी यांची साठा नोंदवहीतील शिल्लक व भांडारातील प्रत्यक्ष परिमाण यांची नियमितपणे पडताळणी करुन तत्संबंधित साठा नोंदवहीत प्रमाणपत्र देतील. त्याखेरीज सक्षम अधिकारी हे आपल्या अधिनस्त दवाखान्यांना भेटीत चाचणी पडताळणी करुन तसा अभिप्राय नोंदवतील. तथापि, अशा प्रकारे साठा पडताळणी केल्याचे साठा नोंदवहीत पडताळणीस आढळुन आले नाही.

3) अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-7 यांचे पत्र क्रमांक जा.क्र.डीडीडी326/1199/ 2014/ पसं-12, औध, पुणे दिनांक 25/11/2014 या पत्रांन्वये खरेदी बाबत 1 ते 16 सुचना देण्यात आल्या होत्या. त्यापैकी अनुक्रमांक 12 अन्वये क्षेत्रीय कार्यालयांनी दर करारान्वये निविदाकारांकडे मागणी डाक पोहोच देय पत्रान्वये नोंदवावी. सर्व दर करारातील बाबींचा पुरवठा मागणी प्राप्त झाल्यापासुन संबंधित निविदाकराने 60 दिवसांच्या आत करणे बंधनकारक राहील. 60 दिवसांच्या अवधीनंतर विलंबाने मागणी पुरवठा केल्यास संबंधित निवेदकाकडुन मागणीच्या एकुण किमतीच्या 0.5 टक्के प्रती आठवडाप्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात यावे, असे असतांनादेखील खालील निविदाकरांने विलंब शुल्कांची रक्कम वसुल न करता रक्कम अदा केलेली दिसुन येते.

4) औषधाचा विनियोग दाखला व उपयोगीता प्रमाणपत्र जिल्हा परिषदेस सादर करण्यात आलेली आहे. परंतु, प्रत्यक्ष योजनेचा फलश्रुती अहवाल दिसून येत नाही.

**3.742 जनावरांसाठी खनिज मिश्रणे व जिवनसत्वे पुरवठा करणेबाबत**

**जिल्हा परिषद जळगाव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** जनावरांसाठी खनिज मिश्रणे व जीवनसत्वे पुरवठा करणेकरीता रक्कम रूपये 15,09,390/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक डिआयएस-102003/13592/प्र.क्र.188/पदुम-4, दिनांक 26/11/2008 अन्वये औषधांची विहित केलेल्या टक्केवारी प्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहे. परंतु, साठा नोंदवहीत वर्गवारी प्रमाणे नोंदी केलेल्या नसल्याने नमुद शासन निर्णयातील टक्केवारी नुसार खरेदी करण्यात आल्याची खात्री लेखापरीक्षणास करता आलेली नाही. सबब शासन निर्णयानुसार विहित टक्केवारीची पालन केल्याबाबत प्रमाणपत्रासह अनुपालन लेखापरीक्षणात सादर करावे

2) औषध खरेदी पावसाळयापुर्वी खरेदी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. तालुका स्तरावर पुरवठा दिनांक 08/11/2016 व 23/11/2016 रोजी केल्याने सदर योजनेचा उद्देश सफल झालेला नाही. सदरचा पुरवठा विलंबाने केलबाबतचा खुलासा सादर करणेत यावा.

3) पुरवठादारांबरोबर आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केलेल्या दरकरारानुसार औषधे खरेदी करण्यात आली आहेत. परंतु, पशुवैदयकीय दवाखाने उपकेंद्र यांनी सादर केलेल्या मागणी पत्रांचा गोषवारा नस्तीसोबत जोडण्यात आलेला नाही. तरी मागणी पत्रकानुसार केलेली खरेदी योग्य असल्याचे अनुपानल सादर करावे.

4) उपरोक्त नमुद दिनांक 26/11/2008 च्या शासन निर्णयातील मुददा क्रमांक 12 नुसार औषध मागणी अधिका-यांनी प्राप्त औषधांची गुणात्मक तपासणी आयुक्त पशुसंवर्धन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतुन करुनच गुणवत्ता पात्रता असलेल्या औषधांचीच अदागी करणे आवश्यक आहे. प्रस्तृत खरेदी प्रकरणी पुरवठादारांनी त्यांचे चाचणी अहवाल सादर केलेले असले, तरी मागणी अधिकारी यांनी त्रयस्थ पार्टीचे चाचणी अहवाल प्राप्त करणे आवश्यक होते. याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने प्राप्त औषधांच्या गुणात्मकतेची लेखापरीक्षणास अभिलेख्याद्वारे खात्री पटलेली नाही. तरी यापुढे आदेशाप्रमाणे चाचणी अहवाल प्राप्त करुन अनुपालन सादर करावे.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 98 आणि हॉस्पीटल मॅन्युअल खंड 1 चाप्टर 26 परिच्छेद 18 प्रमाणे सक्षम अधिकारी हे साठा नोंदवहीतील शिल्लक परिमाण व भांडारातील प्रत्यक्ष परिमाण यांची नियमितपणे पडताळणी करुन ततसंबंधित साठा नोंदवहीत प्रमाणपत्र देतील. त्याखेरीज सक्षम अधिकारी हे आपल्या अधिनस्त दवाखान्यांच्या भेटीत चाचणी पडताळणी करुन तसा अभिप्राय नोंदवतील. तथापि, अशा प्रकारे साठा पडताळणी केल्याचे साठा नोंदवही पडताळणीस आढळुन आलेले नाही. सबब संबंधित जबाबदार अधिकारी यांना तशा सुचना देवून कार्यवाही सुरु केल्याचे अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

6) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक डीडीओ/313/भाग2/49/2012-13/पंस/12, दिनांक 16/01/2013 अन्वये चाचणी अहवाल प्राप्त असल्याशिवाय प्रदान करण्यात येऊ नये, असे नमुद असतांना रक्कम अदा केलेली आहे. चाचणी अहवालाशिवाय प्रदान केल्याबाबतचे अनुपालन दर्शवावे.

7) ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र.41/34, दिनांक 14/09/1989 मधील परिच्छेद 6 नुसार ज्या योजनेस शासन अनुदान प्राप्त होते त्या योजनेवर जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पनातुन खर्च करणे उचित नसतांना खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

### 3.743 जिल्हा वार्षीक योजना पशुवैद्यकिय दवाखाने बळकटीकरण निधी सन 2014-2015 अंतर्गत पशुवैद्यकिय संस्थांना कोल्ड कॅबीनेटचा पुरवठाबाबत.

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 22) -** पशुसंवर्धन विभागांतर्गत जिल्हा वार्षिक योजना पशुवैद्यकिय दवाखाने बळकटीकरण निधी सन 2014-2015 अंतर्गत पशुवैदकिय संस्थांना कोल्डकॅबीनेटचा पुरवठा करण्याचे आदेश मे.गस्टो फार्मा., औरंगाबाद यांना देण्यात आले होते. त्याप्रमाणे पुरवठादाराने एकूण 26 कोल्डकॅबीनेटचा पुरवठा मार्च 2016 अखेर जिल्हा परिषदेस केलेला असून त्यापोटी प्रमाणक क्रमांक 963 दिनांक 31/03/2016 अन्वये एकूण रूपये 48,62,000/- पुरवठादारास अदा करणेत आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ॲनालॉगमीटर फॉल्टी आहेत.

2) कोल्डकॅबीनेटचे दरवाजे पूर्णपणे लागत नाहीत. हवाबंद होत नाहीत.

3) दरवाजास आतून इन्सूलेशन कव्हर नाहीत.

4) प्रत्येक कॅबीनेटला वेगवेगळया पध्दतीने व चुकीच्या पध्दतीने व्हेंटीलेशन जाळी बसविलेली आहे.

5) कोल्डकॅबीनेटचा कॉम्प्रेसर 24 तासामध्ये अतीशय कमी वेळ बंद राहतो. हवे असलेले/सेटकेलेले तापमान आल्यानंतर कॉम्प्रेसर बंद होऊन अपेक्षीत तापमान 18 तास राहणे आवश्यक आहे. ते राहात नाही

6) कोल्डकॅबीनेटच्या कप्याच्या पोकळीमध्ये सेन्सर धरला असता ॲनालॉग मीटरवरील तापमान व थर्मामीटरवरील तपमान यामध्ये सर्वसाधारण 2 डीग्री सेल्सीअसची तफावत आढळून येते.

उक्त नमूद तसेच इतर त्रुटींबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे कक्षात दिनांक 02/08/2016 रोजी दुपारी 1 वाजता पुरवठादारासोबत बैठक अयोजित करणेत आली होती. गुणवत्ता तपासणीमध्ये आढळलेल्या दोषांबाबत झालेल्या बैठकीचे इतीवृत्तानुसार पुरवठादाराने सदर माल आयएसआय मार्क नाही. माझेकडे तसा परवाना नाही. सदर माल फेब्रीकेशनचा असल्याचे नमूद केले आहे. कोल्डकॅबीनेटसारखी यंत्रसामुग्री फॅब्रीकेशनव्दारे बनवून घेण्याची वस्तु नाही ही तांत्रिकदृष्टया अदयावत कंपनीव्दारे बनविलेली असणे आवश्यक होते.

जिल्हा परीषद, अहमदनगर यांनी सदर वस्तू बदलून किंवा परत घेणेबाबत संबंधीत पुरवठादाराकडे पत्रव्यवहार केला असून त्याबाबत पुरवठादाराने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

उपरोक्त बाबीवरुन जिल्हा परीषद, अहमदनगर यांचे पत्र जा.क्र.61/2016 दिनांक 16/05/2016 तसेच पत्र जा.क्र.63/ 2016 दिनांक 20/05/2016 अन्वये गठीत पथकाचा गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त करुनच संबंधीत पुरवठादारास देयक अदा करणे आवश्यक होते व दरकरारानुसार निवड केलेली संस्था कोल्डकॅबीनेट बनविणेस सक्षम नसल्याचे दिसून येते. तसेच जिल्हा परीषद, अहमदनगर यांनी केलेल्या पत्रव्यवहारावर कोणतीही कार्यवाही व कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत अंतीम कार्यवाही लेखापरीक्षणास दर्शवावी.

**3.744 50 टक्के अनुदानावर कुक्कुट विकास योजनेंतर्गत एक महिन्याचे कडकनाथ जातीचे पक्षी पुरवणेबाबत जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** 50 टक्के अनुदानावर कुक्कुट विकास योजनेंतर्गत एक महिन्याचे कडकनाथ जातीचे पक्षी पुरवणेकरिता रक्कम रूपये 64,38,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वाटपाची उपयोगिता प्रमाणपत्रे तपासली असता उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडली नाहीत. त्यामुळे उपयोगिता प्रमाणपत्रे तपासता आली नाहीत. वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्रमांक प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 च्या परिशिष्ट इ नुसार विहित केलेल्या वेळापत्रकानुसार तालुकास्तरावर योजना राबविल्याबाबत पडताळणी करता आली नाही

2) सबब खरेदीबाबत मुंबई वित्तिय नियम 1959 नियम 58 औचित्याच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे दिसुन येते.

3) सदरील साहित्याची पुरवठा पुर्व तपासणी सक्षम शासकीय यंत्रणेकडून केलेली नाही त्याचे साठा नोंदवहीमध्ये विहित वेळेत माल पोहोच झालेची नोंद घेतली का? याची तपासणी करणेसाठी साठा नोंदवही उपलब्ध केली नाही. तसेच सदर साहित्याचा विनियोग केलेबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध झाले नाही.

4) पुरवठा आदेशानुसार 50 टक्के लाभार्थी हिस्सा भरणा केल्याचे चलन नस्तीसोबत नाही. त्यामुळे लाभार्थी हिस्सा वसूल केल्याची खात्री करता आली नाही. तरी लाभार्थी हिस्सा वसूल करून जिल्हा परिषद निधीत भरणा करावा.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1094/सीआर/2239/ 31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 मधील मुद्दा क्रमांक 4 मध्ये नमुद केले प्रमाणे विवरणपत्र-अ प्रपत्राप्रमाणे विहित नमुन्यात लाभार्थी मास्टर नोंदवही तयार करून मागासवर्गीय जातनिहाय /गावनिहाय/ कुटुंबनिहाय लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी घेणे आवश्यक आहे. सदर लाभार्थींची मास्टर नोंदवही शासन निर्णयानुसार ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे एकाच कुटुंबात दुबार लाभ दिला नसलेची पडताळणी करता आली नाही

6) सदरील योजनेचे तालुका स्तरावरून मागणी प्रस्ताव न घेता पुरवठा आदेश काय आधारे देण्यात आले? लेखापरीक्षणास खुलासा करण्यात आलेला नाही.

7) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 01/12/2016 नुसार सदरील योजनेची निविदा जाहिरात एक विभागिय स्तर व एक राज्य स्तरावरील दैनिक वर्तमान पत्रात देणे आवश्यक

असताना साप्ताहिक प्रवीण यामध्ये जाहिरात दिल्याने नियमबाह्यता झाली आहे. सदरील शासन निर्णयानुसार निविदा जाहिरात दिली असती, तर स्पर्धात्मकता निर्माण होऊन साहित्याचे दर कमी झाले असते.

8) सदरील योजनेची साठा नोंदवही, विनियोग दाखले, फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास सादर केले नाहीत. खुलासा सदर करावा.

9) सदरील साहित्याच्या खरेदीच्या प्रमाणकातून 2 टक्के प्रमाणे महाराष्ट्र राज्य विक्रीकर वसूल केला नाही. तरी सदरील पुरवठा दाराकडून रूपये 1,28,760/- राज्य विक्रीकर वसूल करून शासन खाती भरणा करावा.

10) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 01/12/2016 नुसार पंचायत समिती, इंदापूर, हवेली व शिरूर वगळता इतर 10 तालुक्यांना पुरवठा केलेल्या पक्षांची एक महिना वय असलेची तपासणी व वैद्यकीय तपासणी केली नाही. असे असताना सदरील पुरवठा दारास प्रदान कोणत्या आधारावर केले?

11) महाराष्ट्र स्टोअर परचेस मनुअल कायदा-1978 मधील प्रकरण-9 नुसार सदरील पक्षांचे निविदेतील दर रूपये 174/- हे बाजार भावानुसार तुलना न करता अंतिम केले आहेत व पुरवठा दारास प्रदान केले आहे असे असताना सदरील पुरवठा दारास प्रदान कोणत्या आधारावर केले? याचा खुलासा करावा.

12) सदरील योजनेसाठी तालुका स्तरावरून लाभार्थी मागणी अर्ज व प्रस्ताव घेतलेले नाहीत. मोघम स्वरुपात पुरवठा आदेश दिलेले आहेत.

13) आयुक्त, पशूसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शक सूचनांनुसार पक्षी पुरवठा करण्यापूर्वी लाभार्थीने 75 चौ.फुट जागेचे निवारा शेड बांधकाम, पाण्यासाठी आवश्यक भांडी, मानकाप्रमाणे पशुखाद्य व लस याची व्यवस्था यांची पाहणी करून पक्षी पुरवठा करावयाचे असताना तशी पाहणी न करता थेट पक्षी पुरवठा केलेला आहे यामुळे योजनेच मूळ उद्देश सफल होत नाही.

14) पशू पशूसंवर्धन समिती ठराव क्रमांक 308 नुसार सदरील योजनेचे खालीलप्रमाणे आर्थिक निकष ठरवले आहेत:-

1. पक्षी गट --- रूपये 7,500/-
2. पक्षी खाद्य --- रूपये 3,000/-
3. वाहतूक खर्च --- रूपये 1,000/-
4. लस, निवारा शेड, भांडी -- रूपये 3,500/-

क्रमांक 1 रूपये 7,500/- 50 टक्के जिल्हा परिषद अनुदान व क्रमांक 2, 3, 4, एकूण 7,500/- लाभार्थी हिस्सा परंतु, पुरवठा आदेश, योजना अटी व शर्ती आणि करारनामानुसार प्रती एका पक्षी गटासाठी रूपये 8,700/- वाहतूक खर्च समाविष्ट करून 740 गटांसाठी एकूण रक्कम रूपये 64,38,000/- प्रदान केली आहे. योजनेच्या उपरोक्त आर्थिक निकषानुसार वाहतूक खर्च, पक्षी खाद्य, लस, निवारा शेड, भांडी याचा खर्च लाभार्थी हिस्सा म्हणून लाभार्थीने करावयाचा असताना वाहतूक खर्चापोटी प्रती पक्षी गट रूपये 1,000/- पुरवठा दारास प्रदान केले आहेत. तरी एकूण 740 पक्षी गट पुरवठ्यासाठी पुरावठादारास दिलेले रूपये 7,40,000/- वसूल करावेत.

15) सदरील पक्षी गटासाठी आवश्यक पक्षी खाद्य, लस, निवारा शेड, भांडी यासह लाभार्थी फोटो नस्तीसोबत सादर केले नाहीत. योजना राबविल्याची खात्री करता आली नाही.

**3.745 50 टक्के अनुदानावर एक दिवसीय मिश्र पिलांचे गट वाटप करणे.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 14,97,460/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेसाठीच्या निवड समितीची सभा दिनांक 05/12/2015 अन्वये झाली व पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो2010/प्र.क्र.312/पदुम4, दिनांक 16/09/2010 अन्वये लाभार्थी निवड करणे आवश्यक असता बाब क्रमांक 1 नुसार फक्त लाभार्थी निवडीचे निकष 1) बीपीएल, 2) भुमीहीन शेत मजूर, 3) मागासवर्गीय, 4) अल्प अत्यल्प भुधारक शेतकरी अशी वर्गवारी ठरविली या 3 टक्के विकलांग व्यक्ती व शासन निर्णयामधील ब4 नुसार 30 टक्के महिला लाभार्थी निवडण्यास प्राधान्य दिले नाही. उपरोक्त शासन निर्णयानुसार

व्यापक प्रसिध्दी मिळाल्याचे व त्यानुसार प्रतिसाद मिळून तालुका स्तरावर निवड झाल्याबाबत कागदपत्रे दप्तरी नाहीत. शासन निर्णयामधील लाभार्थी निवडीचे निकष पुर्ण केले नसलेने उपरोक्त 188 लाभार्थीची निवड योग्य असलेचे प्रमाणित होत नाही.

2) सदर निधी सन 2016-2017 मध्ये खर्च करणेस प्रस्तावीत करतांना महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक संकिर्ण-10-02/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 यापुढील वर्षात खर्च करणेकरीता संदर्भ दिला आहे. ग्रामीण जनतेला काही प्रमाणात रोजगार निर्मीती करुन त्यांना आर्थिक लाभ मिळवून देणे हा मुख्य उद्देश असल्याने सन 2015-2016 मध्ये निधी खर्च न झाल्याने यावर परिणाम झाला नसल्याबाबत तपशिलासह पुर्तता आवश्यक आहे.

3) पशुखाद्य खरेदीऐवजी जा.क्र. कुक्कुट-2/276/1853/2014, दिनांक 19/05/2014 नुसार लाभार्थ्यांच्या खात्यावर वरीलप्रमाणे 2 हप्त्यात अनुदान वर्ग केले आहे. मात्र लाभार्थ्याने खाद्य खरेदी केल्यावरच 100 एक दिवसीय पिल्ले वाटपाचा कार्यक्रम आयोजित करुन उर्वरीत दुसरा हप्ता लाभार्थ्यास वाटप करावा, असे नमूद आहे. तसेच दर करारात नमूद केल्यानुसार लाभार्थ्याने BIS मानांकनाप्रमाणे पोषण मुल्याचे खाद्य खरेदी केली किंवा कसे, याप्रमाणे कार्यवाही झाल्याबाबत नोंदी दप्तरी नाहीत. त्यामुळे लाभार्थ्याने त्यांच्या हिश्याची 50 टक्के रक्कम खर्च केल्याचे व योग्य बाबीवरच केलेचे दिसून येत नाही.

4) दिनांक 16/09/2010 च्या शासन निर्णयामधील ब. 20 नुसार पक्षांचे अंडयावर येण्याचे वय, त्यापासून मिळणारे उत्पन्न यांचे अभिलेखे नजीकच्या पशु वैद्यकीय दवाखान्याने ठेवणे आवश्यक आहे. मात्र त्याप्रमाणे अभिलेखे ठेवलेले नाहीत. तसेच योजनेचा फलश्रृती अहवाल विस्तार अधिकाऱ्यामार्फत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी प्रादेशिक सह आयुक्तांमार्फत आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करावयाचा आहे. मात्र याप्रमाणे देखील कार्यवाही केली नाही.

5) शासन निर्णय दिनांक 16/09/2010 मध्ये नमूद केल्यानुसार एकाच कुटुंबात एका पेक्षा अधिक लाभ दिला नसलेबाबत व एका लाभार्थ्यास पाच वर्षापर्यंत या योजनेचा पुन्हा लाभ घेता येणार नाही. याबाबत नोंदी घेऊन नोंदवही इत्यादी ठेवल्याचे आढळले नाही.

6) सदर अंडी उबवणी केंद्र हे शासनाचे असल्याने विहीत नमुना व शासनाच्या छापील नमुन्यामध्ये टॅक्स इन्व्हाईस, कॅश मेमो इत्यादी असणे आवश्यक आहे. तथापि, सदर खरेदीची बिल विहीत शासकीय नमुन्यातील घेतलेली नाही. ही बिले रबरी शिक्याची आहेत. त्यामुळे या व्यवहाराबाबत शंका निर्माण होते व गैरव्यवहाराची शक्यता वाटते.

7) सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, कोल्हापूर यांचेकडील डिलीव्हरी चलन गेट पास अथवा अन्य नोंदी नाहीत. त्यामुळे सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र, कोल्हापूर यांच्या नमूद वेळापत्रकाप्रमाणे सर्व पिल्ले प्राप्त होऊन लाभार्थ्यांना वाटप झाल्याचे दिसून येत नाही.

8) वाहनाद्वारे पिलांची वाहतुक केलेली आहे. वाहतुकीची पोहोच पावती पाहता प्रती किलोमीटर रुपये 19/- प्रमाणे सातारा ते कोल्हापूर अंतर 285 किमी दर्शविले आहे. सदर अंडी उबवणी केंद्र हे कसबा बावडा म्हणजे कोल्हापूरच्या अलीकडे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 4 च्या लगत आहे. सर्वे ऑफ इंडिया यांचे क्रमांक टी.बी. 115/62 ए-3/985 दिनांक 23/01/2003 अन्वये मंजूर नकाशानुसार सातारा ते कोल्हापूर अंतर 123 किमी आहे म्हणजेच परतीचे अंतर 246 किमी एवढे भरते. त्यामुळे 4 फेऱ्यांकरीता एकुण 1140-984 = 156 X 19 = रूपये 2,964/- एवढे जादा प्रदान झाले आहे.

तसेच सदर प्रती किमी दर रुपये 19/- बाबत प्रादेशिक सह आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांचे पत्र क्रमांक प्रा.स.आपत/तांत्रिक 1/द्रवनत्र वाहतुक/3889-90/2015/पुणे 7, दिनांक 22/06/2015 अन्वये सदरचे दर हे कृत्रिम रेतन केंद्र, सातारा यांनी द्रवनत्र वाहतुक करणेकरीता मंजूर आहे. म्हणजेच टॅकर अथवा बंदीस्त टाक्याद्वारे वाहतुकीकरीता सदरचे दर मंजूर आहेत. असे असता त्याच दराने श्री. हेमंत रामचंद्र निकम, सातारा यांना दिलेले वाहतुक आदेश व प्रदान नियमबाहय झाले आहे. याबाबत परिवहन विभागाकडील सदर वाहन प्रकारानुसार अनुज्ञेय दराने प्रदान करणे आवश्यक आहे. त्यानुसार जादा प्रदान वसुल करणे आवश्यक आहे.

9) अट क्रमांक 14 अनुसार लाभार्थींची निवड झाल्यानंतर संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पंचायत समिती संबंधित पशु वैद्यकीय दवाखान्याचे मार्फत लाभधारकास एक दिवसीय पिल्ले गट वाटप करावे, अशा सुचना असतांना जिल्हा सतरावरुन वाटप करण्याचे प्रयोजन समजून येत नाही. तसेच सदर बाब ही शासन निर्णयाचे उल्लंघन करणारी आहे.

**3.746 कुक्कुटपालन संस्थांकडील कर्ज थकबाकीबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** पशुसंवर्धन विभागामार्फत शासन निर्णय क्रमांक कुक्कुट-10-2001/प्र.क्र.448/पदुम, दिनांक 02/12/2012 अन्वये खालील संस्थांना दिलेल्या कर्जापैकी दिनांक 31/03/2017 अखेर कर्ज व व्याज थकीत आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त विवरणपत्रानुसार मुद्दल व व्याज मिळून रक्कम रुपये 2,04,39,000/- थकबाकी आहे. उपराक्त शासन निर्णयानुसार कर्ज वसुलीचे अधिकार सनियंत्रण समितीस आहेत. तथापि, मागील बऱ्याच कालावधीपासून सनियंत्रण समितीच्या सभाच झालेल्या नाहीत. सबब कोटयावधी रकमेच्या गुंतवणुकीवर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांचे नियंत्रण नसल्याचे दिसून येते. याबाबत साधार स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. थकीत कर्ज वसुलीबाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांचे कोणतेही नियंत्रण नाही.

2) सदर कर्जाची नोंदवही मार्च 2012 नंतर अपुर्ण आहे. सदर नोंदवहीत नोंदी घेतलेल्या नाहीत.

3) सदर थकीत कर्ज व व्याज वसुलीबाबत स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडील लेखापरीक्षण अहवालात यापूर्वी आक्षेप नोंदवून सुध्दा त्याची दखल घेतलेचे दिसून येत नाही.

4) सदर संस्थांचे सहाकार विभागाकडून कोणत्या कालावधीअखेर लेखापरीक्षण झाले आहे व त्यातील अभिप्राय तसेच थकीत मुद्दल व व्याज, याबाबत तपशिल सादर होणे आवश्यक आहे.

**3.747 लोकनेते राजाराम बापू पाटील 50 टक्के अनुदानावर शेळी गट वाटप योजना खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सांगली लेखापरीक्षणात लोकनेते राजाराम बापू पाटील 50 टक्के अनुदानावर शेळी गट वाटप योजनेवर रक्कम रूपये 49,79,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेची तरतूद विभागास जिल्हा परिषद स्विय निधीमधून प्राप्त असून प्रशासकीय मान्यता दिनांक 20/10/2016 व तांत्रिक मान्यता दिनांक 06/10/2016 रोजी दिली असून योजना विलंबाने राबविली आहे.

2) उक्त तांत्रिक मंजुरी आदेशात नमूद केलेप्रमाणे फलश्रुती अहवाल आयुक्त यांचेकडे सादर केला नाही

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 तसेच नुसार योजना राबविणे आवश्यक होते. तथापि, तशी कार्यवाही केलेली नाही

4) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीसिटी2316/प्र.क्र.133/का.1417 दिनांक 05/12/2016 नुसार बाजारात दराची चौकशी करणे आवश्यक असताना तसेच त्यचेकडून दरपत्रके मागविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. दरासाठी 2011 च्या शासन मार्गदर्शक सुचनेमधील दर ग्राह्य धरून दर ठरवले आहेत. ही बाब नियमबाह्य आहे.

5) सदर रक्कम शासन निर्णय दिनांक 03/03/2017 प्रमाणे लाभार्थींचे खातेवर वर्ग केली आहे. तथापि, सन 2016 -2017 मध्ये लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झालेली नाही. ती 2017-2018 मध्ये जमा झाली आहे.

6) विमाबाबत चौकशी करून कमी रक्कम असलेल्या विमा कंपनीप्रमाणे विमा रक्कम अदा करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सबब रूपये 3,310/- च्या 50 टक्के ऐवजी रूपये 4,140/- प्रमाणे रक्कम अदा केल्यामुळे रक्कम रूपये 45,560/- जादा आदा झाले आहेत.

7) प्रथम लाभार्थी निवड करून त्यास विषय समितीची मंजुरी घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

8) लाभार्थी निवड केल्यावर लाभार्थी हिस्सा वसूल करून घेणे आवश्यक होते. तथापि, तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.748 वैरण विकास**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सांगली लेखापरीक्षणात वैरण विकास 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 19,96,650/- खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वैयक्तिक लाभ योजनेसाठी प्रथम तांत्रिक मान्यता व नंतर प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असताना प्रथम प्रशासकीय व नंतर तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे.

2) आफ्रिकन मका बियाणे यांचे कर्नाटकाकडील चाचणी अहवाल पाहिला असता सदर चाचणी अहवाल हा पुरवठा करणेपूर्वीपर्यंत वैध असताना सदर बियाणे वापरणेस योग्य असल्याबाबत खात्री करता येत नाही.

3) योजना राबविताना प्रथम लाभार्थी निवड करून त्यास विषय समितीची मान्यता घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) लाभार्थी निवड न करता मका बियाणे खरेदी करून पंचायत समिती स्तरावर पोच केले आहे,

5) जिल्हा स्तरावरील योजना असल्याने जिल्हा स्तरावर आवश्यक ती नोदवही ठेवून नोंदी घेणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) बियाणे बॅच क्रमांक तसेच वापर केव्हा पर्यंत करावा? याचा उल्लेख डिलिव्हरी चलनावर नाही. त्यामुळे त्याबाबत खात्री करता येत नाही.

7) आयुक्त यांचेकडील आदेशानुसार वैरण लागवड ही जून - जुलै मध्ये करणे आवश्यक असताना वाटप माहे ऑक्टोंबर 2016 मध्ये केले आहे.

8) सदर योजनेचे लाभार्थी प्रस्ताव उपलब्ध न झाल्यामुळे योग्य लाभार्थ्यांना लाभ झाल्याची खात्री करता आली नाही.

9) करारनामे उपलब्ध झाले नाहीत.

10) पुरवठा आदेशामध्ये पुरवठ्याची मुदत नमूद केलेली नाही.

11) फलश्रुती अहवाल आयुक्त यांना सादर करणे आवश्यक असताना सादर केलेला नाही.

**3.749 पशुवैद्यकीय दवाखान्यांना औषध पुरवठा करणे**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पशुसंवर्धन विभागाने औषध खरेदीसाठी रक्कम रूपये 34,12,415/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक जाक्रमांक डीडीडी/326/1999/2014/पं.स.12 औंध,पुणे-7, दिनांक 25/11/2014 मधील मुददा क्रमांक 8 नुसार कार्यालय प्रमुखांनी स्वतःच्या उपस्थितीत व इतर दोन अधिकाऱ्यांच्या समोर साहित्याचे पार्सल फोडावे व वस्तुंची नोंद साठा नोंदवहीला घ्यावी. असे असताना तशा प्रकारची कार्यवाही झालेची खात्री करुन घ्यावी.

2) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक जाक्रमांक डीडीडी/326/1999/2014/पं.स.12 औंध, पुणे-7, दिनांक 25/11/2014 मधील मुददा क्रमांक 5 नुसार रक्कम रुपये 5,000/- पेक्षा जास्त रक्कमेची मागणी असल्यास पुरवठादाराकडून औषधांचा थेट पुरवठा तालुका स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी सदरचे दर मंजूर असताना औषधे मुख्यालय स्तरावर घेवुन त्यानंतर तालुकानिहाय वाटप केलेली आहेत. त्यामुळे वाहतूक खर्च झाला असण्याची शक्यता आहे. तरी सदर वाहतूक खर्चाची परीगणना करून रक्कम सबंधित कडून वसूल करून पूर्तता दाखवावी.

3) आयुक्त पशुसंवर्धन विभाग यांचे पत्र क्रमांक जाक्रमांक डीडीडी/326/1999/2014/पं.स.12 औंध, पुणे-7, दिनांक 25/11/2014 मधील मुददा क्रमांक 15 नुसार पशुवैदयकिय दवाखाना प्रमुखांनी त्यांच्या दवाखान्यात गेल्या तीन वर्षात उपचारासाठी आलेल्या पशुरुग्णाच्या आजाराचा आढावा घेवुन औषधांची मागणी करावी. सदरप्रमाणे कार्यवाही झाली का कसे? याबाबत लेखापरीक्षणास खात्री करून दयावी.

4) जिल्हा स्तरीय एकत्रित मागणीपत्र व तालुकानिहाय मागणीपत्र यामध्ये तफावत दिसुन येते.

5) महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, निर्णय क्रमांक भांखसं-2014/प्रक्र.82/भाग-3/उदयोग 4, दिनांक 30/10/2015 मधील 3.2.1 अन्वये बाजार दराशी तुलना करुन साहित्य खरेदी करणेबाबत सुचना केल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

**3.750 अनुसुचित जाती उपाययोजना अंतर्गत 2 दुधाळ जनावरे गट वाटप योजनेतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** अनुसुचित जाती उपाययोजना अंतर्गत 2 दुधाळ जनावरे गट वाटप योजनेवर रक्कम रूपये 1,49,92,060/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेंतर्गत वित्त प्रेषणाने वितरीत करण्यात आलेल्या रक्कम रूपये 1,49,92,060/- या अनुदानापैकी रक्कम रूपये 74,96,030/- इतके अनुदान अखर्चित राहीलेले आहे.

2) लाभार्थी निवड करताना 30 टक्के महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देणेबाबत सुचीत केले होते. एकूण 235 लाभार्थी निवड केली असून त्यातील 160 पुरूष, 67 स्त्री व 8 अपंग लाभार्थी निवडले आहेत. परंतु, 30 टक्केल महिला म्हणजे 71 महिला लाभार्थी निवडणे आवश्यक असता 67 लाभार्थी निवडले आहेत. 4 लाभार्थी कमी निवड केलेली आहे.

3) या योजनेमध्ये एचएफ, जर्सी या संकरीत गायी तसेच मु-हा व जाफराबादी या सुधारीत जातीच्या म्हशी खरेदी केलेबाबतचे दाखले नस्तीसोबत नाहीत.

4) या योजनेतंर्गत वाटप करण्यात येणा-या दुधाळ जनावरांचा लाभार्थी व संबंधित पशुसंवर्धन अधिकारी यांचे संयुक्त नांवे 3 वर्षासाठी विमा उतरवलेबाबतची कागदपत्रे नस्तीसोबत नाहीत.

5) खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटिफिकेशन ॲन्ड रेकॉर्डीग ॲथॉरीटी यांचेकडे नोंदणी केलेबाबतचे दाखले उपलब्ध नाहीत.

6) या योजनेतंर्गत लाभ दिलेल्या अधिकारी यांचे कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्थांनी लाभार्थ्यांची नोंद पशुधनाच्या तपशिलासह स्वतंत्र नोंदवहीत नोंदणे आवश्यक असता तशी कार्यवाही नाही.

7) पशुसंवर्धन अधिका-यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या 10 टक्केव जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी केलेबाबतची कार्यवाहीची नोंदवही ठेवणेत आलेली नाही.

8) वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची विहीत नमुन्यातील बंधपत्र ठेवणेत आलेबाबतची नोंदवही ठेवलेली नाही.

**3.751 राजर्षि शाहु पशुपालक दत्तक योजनेअंतर्गत किटल्या खरेदीबाबत**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद, कोल्हापूर पशुसंवर्धन विभागाने सन 2016-2017 या आर्थिक वर्षात राजश्री शाहु पशुपालक दत्तक योजनेअंतर्गत 75 टक्के अनुदानातुन 14,908 किटल्या वाटप केल्या आहेत. याकरिता रक्कम रूपये 14,97,136/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1961 मधील कलम 100 मधील अनुक्रमांक 14 ने 17 पर्यंतची कामे नमुद असुन त्यामध्ये किटली खरेदी ही, बाब नसुन नियमबाह्यपणे रक्कम खर्च केली आहे.

2) ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक मागास /1089/ प्र.क्र. 55, दिनांक 05/10/01989 नुसार योजनेतील लाभार्थीची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. पण नोदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ दिल्याची लेखापरिक्षणास खात्री करता येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक परास 1084/सीआर 1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार ज्या योजनेतील खरेदीसाठी लोकवर्गणी आहे. योजनेतील खरेदीसाठी लोकवर्गणी जमा झाल्याशिवाय खर्च करु नये पण, सदर योजनेच्या लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 16,470/- अदयाप भरलेला नाही.

**3.752 गोचीड नाशक औषध पुरवठा करणे योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडून सन 2016-2017 या वर्षामध्ये गोचीड नाशक औषध पुरवठा करणे योजना राबवलेली आहे. यावर 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 24,99,997/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर औषधांसाठी तालुक्यांची मागणी केलेल्या मागणीपत्रावर दिनांक नमूद नाहीत

2) तालुक्यांच्या मागणीपत्रात शिल्लक साठ्याची नोंद नाही. कोणत्या दवाखान्याला कोणते औषध किती प्रमाणात हवे आहे? याचा उल्लेख केलेला नाही.

3) तालुक्यांनी मागणी पत्रकात मागणी केलेली औषधे यांचे परिमाण व प्रत्यक्ष पुरवठा केलेले परिमाण यात तफावत दिसून येते.

4) INJ.IVOMEEDIN 50.ml पुरवठादार M/S ALLIAANCE BIOTEC यांनी सदर औषधाचा पुरवठा विलंबाने केल्याने एकूण 5 टक्के प्रमाणे विलंब आकार एकूण रक्कम रूपये 27,611.92 वसूल करून शासन निधीत भरणा केल्याचे दाखवावे.

5) तालुका करमाळा यांना INJ.IVOMEEDIN चे दिनांक 29/06/2016 रोजी वाटप करण्यात आलेले आहे. सदर पावतीवर एकूण 900 नग प्राप्त असे दिनांक 21/12/2016 रोजी नमूद करण्यात आलेले आहे. तालुका करमाळा यांची प्रत्यक्ष मागणी 1,640 ची असताना 900 नग पुरवठा करून 740 नग कमी पुरवठा केलेले आहेत. प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या 900 नगांचे देयक अदा करणे आवश्यक असताना एकूण 1,640 नगांचे रक्कम रूपये 49,085/- अदा केलेले आहेत. त्यामुळे रक्कम रूपये 22,148/- चे ज्यादा अदाई झालेली आहे. सदर रक्कम वसूल करून भरणा केल्याचे दाखवावे.

6) तालुका सांगोला यांना INJ.IVOMEEDIN चे प्रत्यक्षात 2,135 नग वाटप करणे आवश्यक असताना त्यांना 2,185 नग वाटप केलेले आहेत. ज्यादा 50 नग काय आधारे वाटप करण्यात आले? याबाबत साधार खुलासा करावा.

**3.753 औषध खरेदी (शिबीर व लसीकरण)**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा परिषद, सोलापूर पशुसंवर्धन विभाग यांचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण करीत असतां शिबीर लसीकरण यासाठी केलेली औषध खरेदीची नस्ती तपासली असतां 7 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 29,99,920/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तालुका पंचायत समिती कार्यालयाचे मागणी पत्र पाहता मागणी पत्रामध्ये मागील शिल्लक साठा नोंदविलेला नाही.

2) पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांचे दिनांक 23/01/2004 व 25/11/2008 च्या पत्रान्वये औषधांचा चांचणी अहवाल हा शासकीय प्रयोगशाळेकडून प्राप्त करुन घेणेबाबत नमूद केले असतांना संबंधीत औषधाचा चांचणी अहवाल हा खाजगी (Para Lab,Mumbai,Ana Lab Mumbai) प्रयोगशाळेकडून तपासणी करुन घेतल्याचे आढळून आले आहे. सदर संस्था शासन मान्यता प्राप्त आहेत किंवा कसे, याची पूर्तता दर्शवावी.

3) पुरवठा आदेशामध्ये नमूद केलेप्रमाणे पुरवठा होणारी औषधे ही Long Expiry Date चे असणे आवश्यक आहे. परंतु, सदर पुरवठा केलेली औषधे ही माहे जुलै-18, सप्टेंबर-18, ऑक्टोबर-17, नोव्हेंबर-17, जून 18 अशा कालावधीमध्ये मुदतबाहय होणारी असून पुरवठा केलेल्या दिनांकापासून सदर औषधांचा वापर होणेसाठी खूप

कमी कालावधी उपलब्ध होत असल्याने सदर औषधांचा त्वरीत वितरण व वापर झाले किंवा कसे, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

4) पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांचे दिनांक 05/03/2010 च्या कार्यवाही बाबतच्या सूचनांतील अनुक्रमांक 22 मध्ये नमूद केलेप्रमाणे पुरवठा केलेल्या औषधांचा वापर केलेबाबतचा तिमाही अहवाल वरिष्ठ कार्यालयांस अप्राप्त आहे. तसेच औषधांचा वापर केलेबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र सदर नस्तीसोबत संलग्न नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 21 नुसार खरेदी रक्कम अदा करतांना संबंधीत पुरवठादाराची पोहोच पावती सदर नस्तीसोबत संलग्न नसल्याने पुरवठादारास रक्कम मिळाल्याची खात्री करतां येत नाही.

6) पंचायत समिती सांगोला यांना गोस्टो फार्मा, औरंगाबाद - Inj DNS IT मात्रा 600 प्राप्त झालेबाबतचे मूळ डिलीव्हरी चलन स्वाक्षरीसह व पंचायत समिती बार्शी यांना मेरीलीन फार्मा, मुंबई - Dexamethazone, Choropheniramine Malate, Meloxicam Para. अनुक्रमे मात्रा 480, 800, 800 प्राप्त झालेबाबतचे मूळ डिलीव्हरी चलन स्वाक्षरीसह लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेले नाही. तसेच पंचायत समिती, सांगोला यांना सेफकॉन लाईफ सायन्सेस, आगरा यांनी पुरवठा केलेले Fluonixin meglumine मात्रा 720 हे मूळ डिलीव्हरी चलन लेखापरीक्षणांस उपलब्ध झालेले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये लाभाच्या योजनेसाठी प्रभावी अंमलबजावणी व नियोजन विशिष्ठ मुदतीत होणेसाठी दिलेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार कार्यवाही करणेबाबत सूचना असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, यांचे शासन निर्णय क्रमांक जीपीआर/1088/सीआर-716/30, दिनांक 26/10/1989 अन्वये औषध सामुग्रीची खरेदी ज्या वित्तीय वर्षात केलेली आहे, त्याच वित्तीय वर्षात सदर औषध सामुग्रीचा विनियोग होणे आवश्यक आहे. परंतु, औषध वाटप पुढील आर्थिक वर्षात झाल्याचे दिसून येते. सदर औषध वाटपाबाबत विनियोग दाखले सदर नस्तीसोबत नाहीत. यावरुन अनियमितता झाल्याबाबत लेखापरीक्षणाचे मत आहे. याबाबत लेखापरीक्षणांस खुलासा करावा.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 98 अन्वये विभाग प्रमुखांनी आर्थिक वर्षातून एकदा साठा नोंदवही व भांडार मधील शिल्लक याची पडताळणी करुन प्रमाणपत्र नोंदविणे व सादर करणे आवश्यक आहे. तरी लेखापरीक्षणांस याबाबतचे प्रमाणपत्र उपलब्ध झालेले नाही.

9) वरील पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठादाराने पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून60 दिवसाच्या आंत औषधांचा पुरवठा करणे बंधनकारक असतांना विलंब केल्यांस प्रती आठवडा किंमतीच्या 0.5 टक्के दराने दंड वसुल करणेबाबत तरतूद आहे. तसेच पशुसंवर्धन आयुक्तपुणे यांच्या निविदा क्रमांक डीडीडी/ 452 /205/2015/एएच-12, दिनांक 09/02/2015 मधील अट क्रमांक 24 नुसार विलंबाने पुरवठा केल्याबददल 10 टक्के दंड वसुल करणे आवश्यक असतांना पुरवठादाराकडून 5 टक्के दंड वसुल करण्यांत आलेला आहे. उर्वरित रक्कम संबंधीतांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

**3.754 विशेष घटक योजने अंतर्गत शेळी गट व दुधाळ जनावरे वाटप योजना अनुदान पंचायत समिती स्तरावर वितरीत करणे बाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2016-2017 या वित्तीय वर्षात विशेष घटक योजना अंतर्गत अनुसूचित जाती / नवबौध्द लाभार्थीना 75 टक्के अनुदानावर शेळीगट (10+1) व दुधाळ जनावरे गट वाटप व दुभत्या जनावरांना खादय अनुदान योजना राबविण्यात आली. सदर योजनेत रक्कम रूपये 1,98,00,000/- गुंतलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्रक्र-323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 तील मार्गदर्शक सुचना क्रमांक 1 नुसार सदर योजनेस सर्व

प्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाव्दारे व्यापक प्रसिध्दी देवून लाभार्थ्यांनकडून अर्ज मागविणे आवश्यक आहे. परंतु, व्यापक प्रसिध्दी दिल्याबाबत कोणतेही अभिलेखे नस्तीत उपलब्ध नाही.

2) वरील शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 3 व 4 नुसार लाभार्थी निवडतांना 30 टक्के महिलांना प्राधान्य देणे व शासन निर्णय दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के अपंग लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक आहे.

3) वरील शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 5 नुसार तालुका स्तरावर लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकारुन प्राप्त झालेले सर्व अर्ज जिल्हा स्तरीय निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवणे आवश्यक आहे. परंतु, प्रत्यक्षात योजनेच्या अनुषंगाने तपासणीकरीता लाभार्थी अर्जाची मांगणी केली असता अर्ज पंचायत समिती स्तरावर असल्याचे आढळून आले.

4) वरील शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 15 नुसार योजनेनुसार वाटप करण्यात आलेल्या शेळी व दुधाळ गटाचे लाभार्थी व सबंधीत जिल्हयाचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद यांच्या संयुक्त नावे तीन वर्षासाठी विमा उतरविण्यात यावा. परंतु, तशा प्रकारचा विमा उतरविल्याबाबतचे अभिलेखे तपासणीस उपलब्ध झाले नाही.

5) तालुकास्तरीय अधिका-यांनी प्राप्त झालेले किती अर्ज जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर केले. याबाबतची स्वतंत्र नोंद घेण्यात आली नाही. त्यामुळे तालुकानिहाय लाभार्थी अर्ज किती प्राप्त झाले याबाबत पडताळणी करता आली नाही.

6) पंचायत समितीनिहाय अनुसूचीत जाती उपयोजना शेळीगट/ दुधाळ गट वाटपाकरीता अध्यक्ष निवड समिती यांनी निवड केलेली एकुण शेळी गटाची लाभार्थी संख्या 273 व दुधाळ गटाची लाभार्थी संख्या 156 या लाभार्थांना लाभ दिल्याबाबत 14 पंचायत समितीकडून उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले नाही.

7) अध्यक्ष निवड समिती तथा पशुसवंर्धन उप आयुक्तालय, अमरावती यांनी पंचायत समितीनिहाय मंजुर केलेल्या शेळीगट /व दुधाळ गट वाटप लाभार्थी निवड यादीप्रमाणे त्याच अंपग लाभार्थ्याला, महिला लाभार्थ्यांना, सर्वसाधारण निवड लाभार्थांना लाभ दिला किंवा प्रतिक्षाधीन यादीतील लाभार्थांना लाभ दिला, याबाबतचे प्रमाणपत्र पंचायत समिती स्तरावरुन उपलब्ध करुन दिले नाही.

8) सन 2016-2017 पर्यंत तीन ते पाच वर्षाचे कालावधीत पशुसवंर्धन विभाग जिल्हा परिषद, अमरावती कडून 14 पंचायत समिती स्तरावर शेळीगट / दुधाळ जनावरे गट वाटप इतर योजनाबाबत किती लाभार्थींना लाभ दिला, त्यावर शासनाचा एकुण किती निधी वितरीत करण्यात आला, त्या कालावधीतील आज रोजी किती जनावरे हयात आहेत, एखादा सर्वे किंवा तशी तपासणी करून एखाद दोन खेडयातुन दुधाची शासकीय किंवा खासगी दुध डेअरीकडे किती लीटर दुधाची आवक होती, दुधाळ जनावरे गट वाटपानंतर त्या खेडयातुन दुधाची शासकीय किंवा खासगी दुध डेअरीकडे किती लीटरने दुधाचे आवकमध्ये वाढ झाली, त्या खेडयामधून त्या वर्षात दुधाळ जनावरे गटाबाबत लाभ घेण्याकरीता लाभार्थाने तलाठी यांचेकडून किती रुपये वार्षिक उत्पन्न असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले होते, लाभ दिल्यानंतर लाभार्थाचे दुस-या वर्षात तलाठी यांचे प्रमाणपत्रानुसार वार्षिक उत्पन्नात किती रुपयाने वाढ झाली, त्याचे राहणीमान उंचावण्यात किती मदत झाली, राहणीमानात काही बदल झाला किंवा कसे इत्यादी नमुद करुन अमरावती जिल्हयातील शेतकरी, दारिद्रय रेषेखालील कुटुंब आत्महत्या करण्याच्या विचारापासुन दुर होतील व ते त्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक विचार करतील, अशा प्रकारची एखादया आर्थिक वर्षाची माहिती प्राप्त करुन खरोखरच शासन राबवीत असलेल्या योजनेची फलश्रुती होत आहे, याची खातरजमा करणे आवश्यक होते, असे लेखापरीक्षणाचे मत आहे.

**3.755 सर्वसाधारण योजना व आदिवासी उपयोजना अंतर्गत 50 टक्के अनुदानावर तलंगा गट वाटप योजनावरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सर्वसाधारण योजना व आदिवासी उपयोजना अंतर्गत 50 टक्के अनुदानावर तलंगा गट वाटप योजनेवर रक्कम रूपये 26,16,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तलंगा गटाचे उभारणीबाबत निवारा, खादय औषधी, पाण्याची भांडी, खांदयाची भांडी इत्यादी लाभार्थीने निकषाप्रमाणे उभारले असल्याबाबत व त्यावरील अंदाजे खर्च रूपये 3,000/- असल्याबाबतचा तसेच त्याची जागा / निवारा तपासणी करुन योग्य असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र नस्तीत उपलब्ध नाही. योजनेची मार्गदर्शक सुचना क्रमांक 9 नुसार 50 टक्के खर्चाची तयारी असणा-या पात्र लाभार्थींची नावे मंजुर करावी, असे नमुद आहे. परंतु, तसा खर्च लाभार्थीकडुन केला गेला किंवा नाही, याची कागदपत्रे नस्तीत आढळुन आली नाहीत. त्यामुळे तंलगा गटाचे निवाराची व्यवस्था योग्य होती, याबाबत खात्री होत नाही.

2) लाभार्थीचे जागा मालकीबाबत 7/12 किंवा नमुना 8 नस्तीत उपलब्ध नाही. लाभार्थीने तलंगा गटाची उभारणी त्याचे स्वत.चे मालकीचे जागेत केली किंवा कसे, याबाबत तपासणी करता आली नाही.

3) वरीलपैकी कोणालाही तलंगा गट पुरवणेबाबत पुरवठा आदेश दिल्याचे नस्तीत नमुद नाही. सदर युनीटकडे वाटपा इतका साठा उपलब्ध होता किंवा नाही, याबाबत पत्रव्यवहार नस्तीत नाही. पुरवण्यात आलेल्या तलंगा गटाचे वय 8 ते 10 आठवडे असल्याबाबतचे प्रमाणपत्र नस्तीत उपलब्ध नाही. त्यामुळे वाटप प्रक्रिया योग्य झाली किंवा नाही, किती तंलगा गटाची मागणी होती व तेवढीच त्यांनी पुरविली किंवा कसे, याबाबत तपासणी करता आली नाही.

4) सदर योजनेकरीता आवश्यक असलेले निकषानुसार लाभार्थ्यांची निवड झाली किंवा कसे, याबाबत जिल्हास्तरावर खात्री न करता रक्कमा खर्च केलेल्या आहेत. जिल्हास्तरावर योजनेची लाभार्थ्यांचे कोणतीही कागदपत्र न ठेवल्यामुळे लाभार्थ्यांची झालेली निवड ही योग्य होती किंवा कसे, याबाबत खात्री पटली नाही.

5) शासन निर्णय क्रमांक जिवायो 2010 / प्रक 312 /पदूम-4, दिनांक 16/09/2010 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 1 नुसार कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात यावा, असे नमुद आहे. मास्टर नोंदवहीची प्रत नस्तीस जोडलेली नसल्याने एकाच कुटुंबात दुबार लाभ देण्यात आला किंवा कसे, याबाबत खात्री पटली नाही.

6) लाभार्थ्यांना तलंगा गट वाटप झाल्यानंतर त्यांचे उत्पन्नामधे वाढ झाले, याबाबतचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणा दरम्यान उपलब्ध झाले नाही.

7) तलंगा गटाचे वाटपाकरीता व्यापक प्रसिध्दी देऊन लाभार्थी अर्ज मागविण्यात आले नसून किती अर्ज प्राप्त झाले, याबाबत कोणतेही अभिलेखे लेखापरिक्षणास सादर केले नाही.

**3.756 सधन कुक्कुट प्रकल्प, जिल्हा परिषद, अमरावती येथील अंडी उबवणी केंद्र व कुक्कुट प्रकल्पाकरीता खादय औषधी व इतर आवश्यक साहित्य खरेदी खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सधन कुक्कुट प्रकल्प जिल्हा परिषद, अमरावती येथील अंडी उबवणी केंद्र व कुक्कुट प्रकल्पाकरीता खादय औषधी व इतर आवश्यक साहित्य खरेदीकरीता रक्कम रूपये 16,96,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जाहिरातीकरीता पशुसंवर्धन विभाग पत्र क्रमांक 1,293 दिनांक 15/07/2016 नुसार दिनांक 27/07/2016 रोजी दैनिक मंडळामध्ये जाहीरात देणेबाबत सुचित केली असता त्यांनी सदर जाहीरात दिनांक 26/07/2016 रोजी दिली असल्याचे दिसते. साप्ताहिक भारत वंदनाची प्रत नस्तीत उपलब्ध नाही. पशुखादय व औषधी साहित्य खरेदी ही रूपये 17 लक्ष ची असल्याने त्याचा पुरेसा खप असलेल्या राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहीरात देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

2) सधन कुक्कुट प्रकल्प, जिल्हा परिषद, अमरावती येथील अंडी उबवणी केंद्र व कुक्कुट प्रकल्पाकरीता खादय औषधी व इतर आवश्यक साहित्य खरेदीकरीता प्रशासकीय व तांत्रीक मंजुरी रूपये 11.27 लक्ष ऐवढी प्राप्त असतांना प्रत्यक्षात खर्च रूपये 16.96 लक्ष एवढा करण्यात आला आहे. याबाबत सप्रमाण खुलासा करावा.

3) महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे जाक्र वैदि/4 (1) /1881-1959/2016, दिनांक 28/03/2016 नुसार निविदा धारकाकडुन निविदा सादर करतेवेळी पशुपक्षी खादयाचा नमुना प्राप्त करुन घेणे व सदर नमुन्याची शासकीय खादय विश्लेषण प्रयोग शाळेमार्फत तपासणी करुन घेणे आवश्यक आहे.

4) तसेच मुददा क्रमांक 3 मधील पत्रानुसार प्रत्यक्ष खादय पुरवठा होण्यापूर्वी पुरवठा होणा-या बॅचच्या खादयाचा रॅंडम नमुना घेण्यात यावा व सदर नमुन्याची शासकीय विश्लेषणे प्रयोगशाळेमार्फत तपासणी करुन घेण्यात यावी. या तपासणी अहवालावरुन खादय निर्धारीत प्रमाणानुसार असल्याबाबतची खात्री झाल्यानंतरच पुरवठा आदेश देण्यात यावा व माल स्विकृत करण्यात यावा. परंतु, पशु संवर्धन विभागाकडुन पत्र क्रमांक 441/17/अक्र, दिनांक 21/02/2017 नुसार सहाय्यक आयुक्त पशुखादय विश्लेषण प्रयोगशाळा, पुणे -16 यांना पाठविण्यात आले. त्यानुसार त्यांनी जाक्र 201/2017 दिनांक 17/03/2017 रोजी तसा तपासणी / परिक्षण अहवाल सादर केला.

5) नियमानुसार पहिल्या 10 लाखाकरीता रूपये 100/- व पुढील प्रत्येक एका लाखाला रूपये 100/- असे रूपये 800/- चा स्टॅंप पेपरवर करारनामा पाहिजे. परंतु, करारामा रूपये 100/- चे स्टॅंप पेपरवर आहे. त्यामुळे शासनाचे रूपये 700/- चे महसुली नुकसान झाले.

6) साठा रजिस्टर नमुना 33 ची तपासणी केली असता दिनांक 29/05/2017 रोजी 168 Male व 790 Female, दिनांक 06/08/2017 रोजी 168 Male व 682 Female संचालक, केद्रीय संगठण पोल्ट्री, राजेंद्र नगर, हैद्राबाद कडून खरेदी करण्यात आले. पक्षाच्या वयोगटानुसार खालीलप्रमाणे खादय देण्यात आले:-

1. Chick mash - 1 दिवस ते 3 आठवडे
2. ग्रोअर मॅश - 9 आठवडे ते 20 आठवडे
3. लेअर मॅश - 21 आठवडे ते 72 आठवडे.

परंतु, साठा रजिस्टर पान क्रमांक 72 ची तपासणी केली असता दिनांक 21/03/2017 रोजी खरेदी केलेले लेअर मॅश 870 बॅग लेखापरिक्षण दिनांकापर्यंत शिल्लक आहे. यावरुन आवश्यकता नसतांना लेअर मॅश खरेदी केल्याचे दिसून येते.

7) करारनामातील अट क्रमांक 2 नुसार देयकातुन 5 टक्के व्हॅट व विक्रीकर कपात करणे आवश्यक असतांना कपात करण्यात आला नाही. सदर रक्कम रूपये 84,800/- सबंधीतांकडून वसुल करुन शासनखाती जमा दर्शवावे.

8) प्राप्त तरतुद रूपये 22.75 लक्ष पैकी रक्कम रूपये 11.27 लक्ष एवढा खर्च करण्यात आला असून उर्वरीत निधी रक्कम रुपये शासन खाती भरणा केल्याबाबत चलान दर्शवावी.

**3.757 जिल्हा वार्षिक अनुसुचित जातीतील लाभार्थीना 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे गट वाटपातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पशुसंवर्धन विभाग सन 2016-2017 मध्ये उपयोजने अंतर्गत अनुसूचितील लाभार्थींना 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावराचे गट वाटप योजना राबविण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 या वर्षात 194 लाभार्थींना लाभ दिला लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 56,92,176/- भरणा केल्याची पावती लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयानुसार सदर योजनेच्या लाभार्थींना एक दिवसाचे प्रशिक्षण देण्यात यावे. परंतु, विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेखे नस्तीत आढळत नाही.

3) सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना अनुक्रमांक 7 नुसार लाभार्थी यादी जिल्हाधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयाचे सूचना फलकावर उपलब्ध केल्याचे आढळत नाही. अट क्रमांक 12 नुसार दुधाळ जनावरे संगोपनासाठी लाभार्थीकडे पुरेशी जागा उपलब्ध असल्याचे अभिलेखे आढळत नाही.

4) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 11/11/2011 चे अट क्रमांक 18 नुसार लाभार्थीस हा व्यवसाय 3 वर्ष करणे आवश्यक आहे. लाभार्थीना दिलेल्या शासकीय अनुदानाचा दुरविनियोग केल्यास अनुदानाची रक्कम व्याजासह एक रक्कमी वसुली करावयाची आहे. परंतु, अट क्रमांक 20 नुसार पशुपालकाच्या घरी जावुन 100 टक्के पडताळणी करुन त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्यामार्फत वरील कार्यालयास सादर करावा. तसे केल्याचे अभिलेख्यावरुन आढळत नाही. त्यामुळे सदर बाबतची पडताळणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक 323, दिनांक 11/11/2011 अनुक्रमांक 21 नुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या एकूण शेळी गटाच्या 25 टक्के गटांची प्रत्यक्ष पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हयात फिरतीच्या वेळी वाटप केलेल्या एकूण दुधाळ जनावरे गटांपैकी 10 टक्के दुधाळ जनावरे गटांची अचानकपणे प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करावा. परंतु, विभागाने याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

6) मार्गदर्शक सूचनेनुसार सदर योजनेचे उपयोगीता प्रमाणपत्रे पुढील वर्षाच्या माहे एप्रिल मह्न्यिात सादर करण्यात यावे. मात्र विभागामार्फत तशी कार्यवाही झाल्याचे अभिलेखे अभावी पडताळणी करता येत नाही. तसेच सदर योजनाच्या मुल्यमापन अहवाल शासनास सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

7) विभागामार्फत सदर योजना यापुर्वी सुध्दा नियमित राबविण्यात आली असल्याने सदर योजनेचे मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशा प्रकारचे मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नसल्याने सदर योजनेचा लाभ एकाच लाभार्थ्यांस दोनदा दिल्या गेल्याची शक्यता नाकारता येत नाही.

### 3.758 जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजने अंतर्गत आदिवासी लाभार्थीना 75 टक्के अनुदानावर शेळयांचे गट वाटपातील अनियमितता.

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पशुसंवर्धन विभाग सन 2016-2017 मध्ये अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत आदिवासी लाभार्थीना 75 टक्के अनुदानावर शेळयांचे गट वाटप योजनेवर रक्कम रूपये 15,78,984/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 नुसार योजनेचे स्वरुप दिले असून स्थानिक जातीच्या 10 शेळया खरेदीस रुपये 40,000/- + बोकड रुपये 5,000/- व विमा रुपये 2,848/- तीन वर्षासाठी एकूण रुपये 47,848/- रक्कम ठरवली असून योजना 75 टक्के अनुदानावर असल्याने रूपये 11,962/- लाभार्थी हिस्सा व शासकीय अनुदान रूपये 35,886/- दिले आहे. चलनाव्दारे लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 5,38,290/- जमा केल्याचे नस्ती नुसार आढळते.

सदर रक्कमा लाभ दिलेल्या लाभार्थ्याचे असल्याबाबत लाभार्थी हिस्सा भरणा केल्याची पावती लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही. तसेच एकूण 45 लाभार्थीनी लाभार्थी हिस्सा भरणा केल्यानंतर एकूण 44 लाभार्थीना लाभ दिल्याचे प्रमाणकानुसार दिसून येते. पातूर येथील एका लाभार्थीस लाभ दिला असल्याचे किंवा लाभार्थी हिस्सा परत केल्याचे अभिलेखे दर्शवून अनुपालन दर्शवावे. तसेच लाभार्थी हिस्सा भरलेल्या लाभार्थ्याना लाभ दिल्याची खात्री करता आली नाही.

2) उपरोक्त शासन निर्णयानुसार सदर योजनेच्या लाभार्थीना एक दिवसाचे प्रशिक्षण देण्यात यावे. परंतु, विभागाने त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे अभिलेखे नस्तीत आढळत नाही.

3) सदर शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना अनुक्रमांक 7 नुसार लाभार्थी यादी जिल्हाधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयाचे सूचना फलकावर उपलब्ध केल्याचे आढळत नाही अट क्रमांक 12 नुसार शेळी संगोपनासाठी लाभार्थीकडे पुरेशी जागा उपलब्ध असल्याचे अभिलेखे आढळत नाही.

4) महाराष्ट्र शासन, निर्णय दिनांक 11/11/2011 चे अट क्रमांक 18 नुसार लाभार्थीस हा व्यवसाय 3 वर्ष करणे आवश्यक आहे. लाभार्थींना दिलेल्या शासकीय अनुदानाचा दुरविनियोग केल्यास अनुदानाची रक्कम व्याजासह एक रक्कमी वसुली करावयाची आहे. परंतु, अट क्रमांक 20 नुसार पशुपालकाच्या घरी जाऊन 100 टक्के पडताळणी करुन त्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्यामार्फत वरील कार्यालयास सादर करावा. तसे केल्याचे अभिलेख्यावरुन आढळत नाही. त्यामुळे सदर बाबतची पडताळणी करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक 323 दिनांक 11/11/2011 अनुक्रमांक 21 नुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या एकूण शेळी गटाच्या 25 टक्के गटांची प्रत्यक्ष पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद यांनी जिल्हयात फिरतीच्या वेळी वाटप केलेल्या एकूण शेळी गटांपैकी 10 टक्के शेळी गटांची अचानकपणे प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करावा. परंतु, विभागाने याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

6) मार्गदर्शक सूचनेनुसार सदर योजनेचे उपयोगीता प्रमाणपत्रे पुढील वर्षाच्या माहे एप्रिल महिन्यात सादर करण्यात यावे. मात्र विभागामार्फत तशी कार्यवाही झाल्याचे अभिलेखे अभावी पडताळणी करता येत नाही. तसेच सदर योजनाच्या मुल्यमापन अहवाल शासनास सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

7) विभागामार्फत सदर योजना यापुर्वी सुध्दा नियमित राबविण्यात आली असल्याने सदर योजनेचे मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशा प्रकारचे मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नसल्याने सदर योजनेचा लाभ एकाच लाभार्थ्यांस दोनदा दिल्या गेल्याची शक्यता नाकारता येत नाही.

8) उपरोक्त प्रमाणकानुसार एकूण रक्कम रुपये 15,78,944/- मधून रुपये 15 लाख अग्रीम वजा जाता उर्वरीत रक्कम रुपये 78,984/- व्यवस्थापक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ प्रक्षेत्र, पोहरा अमरावती यांचे नावे देण्यात आला देयकातून कपात विमा रुपये 93,984/- कोणाला प्रदान केलीबाबत खुलासा करावा.

**3.759 50 टक्के अनुदानावर तलंगा गट पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पशुसवंर्धन विभाग, जिल्हा परिषद, वाशिम येथील सन 2016-2017 मधील लेखापरीक्षण दरम्यान तलंगा वाटप गट योजनेंतर्गत एकून 100 तलंगा गट वाटप करून त्यावर रुपये 3,00,000/- खर्च करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक जिवायो 2010 / प्रक 312 /पदूम-4, दिनांक 16/09/2010 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 1 नुसार कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्याचे यावा, असे नमुद आहे. मास्टर नोंदवहीची प्रत नस्तीस जोडलेली नसल्याने एकाच कुटुंबात दुबार लाभ देण्यात आला किंवा कसे, याबाबत खात्री पटली नाही.

2) शासन निर्णयातील सुचना क्रमांक 7 व 10 नुसार लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारण्यासाठी 30 दिवसांची मुदत देण्यात यावी. दिनांक 30 डिसेंबर नंतर अर्ज स्विकारू नये. तसेच योजनेचे अर्ज जिल्हा निवड समितीकडे पाठविण्याची अंतीम तारीख ही 15 जानेवारी नमुद आहे. परंतु, विभागाने प्रक्रियेला उशीरा सुरुवात करून प्रशासकीय मंजुरी / तांत्रीक मंजुरी / पुरवठा आदेश इत्यादी दिनांक 14/09/2016 व 18/02/2017 रोजी दिले आहेत. त्यामुळे निवड प्रक्रिया योग्य राबविली गेली नाही. तसेच अर्ज आवकला घेतले नाही. करीता कधी प्राप्त झाले, याबाबत खात्री पटत नाही.

3) उपरोक्त शासन निर्णयातील मुददा क्रमांक 7 नुसार लाभार्थी निवड समिती स्थापन करण्यात येईल. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दस्ताऐवज नस्तीस उपलब्ध झाले नाही. तसेच ज्या जिल्हयात मध्यवर्ती अंडी

उबवणी केंद्र किंवा सघन कुक्कुट विकास गट नाहीत, अशा ठिकाणी नजिकच्या मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र किंवा सघन कुक्कुट विकास गटाच्या अधिकाऱ्याचा समितीमध्ये सदस्य म्हणुन समावेश करण्यात यावा. परंतु, समिती गठीत केली नाही व शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच निवड यादीवर दिनांक नमुद नसल्याने जिल्हा निवड समितीने योजनेची लाभार्थ्याची निवड यादी मंजुर / प्रसिध्द कधी केली गेली, याची सत्यता पडताळता आली नाही.

4) उपरोक्त शासन निर्णयातील मुददा क्रमांक 10 नुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना क्रमांक जिपवा/पशु/ता/कावि/718/2016, दिनांक 03/05/2017 नुसार अग्रीम धनादेश पाठविण्यात आला. धनादेश क्रमांक 059138/31.3.2017 यावरुन धनादेश विलंबाने देण्यात आला. परंतु, विहित कालावधीत तलंगा गट उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांची असतांना त्यांनी लेखापरिक्षण कालावधीपर्यंत पंचायत समिती, मालेगाव यांना तलंगा गट पुरविले नाही. अग्रिम रककम देवुनही विहित कालावधीत लाभ दिला नाही. करीता रक्कमेचा अपव्यय झाला, त्याबाबत खुलासा करावा. लाभार्थीना त्याच आर्थिक वर्षात लाभ मिळाला नाही.

5) उपरोक्त शासन निर्णयातील बाब क्रमांक 20 अन्वये या योजनेमध्ये लाभ दिलेल्या लाभार्थ्यांच्या बाबतीत दिलेल्या गटापासुन मिळणाऱ्या उत्पन्नाचे अभिलेखे ठेवावेत, असे नमुद असतांना त्याप्रमाणे अभिलेखे ठेवले नाहीत. तसेच फलश्रुती अहवालसुध्दा लेखापरिक्षणास प्राप्त झाले नाहीत.

6) बाब क्रमांक 21 अन्वये एकदा लाभार्थी निवड झाल्यावर पुढील पाच वर्षे त्याच लाभार्थीस पुन्हा लाभ देण्यात येवु नये. परंतु, विभागाने मास्टर नोंदवही न ठेवल्याने पडताळणी करता आली नाही.

7) योजनेची माहिती होणेकरीता त्याची व्यापक प्रमाणात प्रसिध्दी होणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीला मुनादीव्दारे प्रसिध्दी होणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे निदर्शनास आले नाही. करीता सदर योजनेच्या लाभापासुन वंचित राहिले. परंतु, निवडक ग्रामपंचायतीचे अर्ज आल्याचे निदर्शनास येते व त्यांची निवड केल्याचे निदर्शनास येते. यावुरुन निवडक ग्रामपंचायतीत प्रसिध्दी देण्यात आल्याचे निदर्शनास येते. करीता योजनेचा हेतु सफल झाला नाही.

8) वैयक्तीक लाभाच्या योजनेचा लाभ देतांना संबंधीत लाभार्थ्याकडे सदर वर्षात ग्रामपंचायतीची मालमत्ता कराचा भरणा थकीत नसल्याबाबत खात्री करणे आवश्यंक असतांना अर्जासोबत सदर वर्षाचा कराचा भरणा केल्याबाबतची पावती अर्जासोबत दिसून आली नाही. लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेत होणे आवश्यक आहे व तसा ग्रामसभेचा ठराव आवश्यक आहे. परंतु, लाभार्थी अर्जासोबत ग्रामसभेत निवड केल्याबाबतचा ठराव निदर्शनास आला नाही.

### 3.760 आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत 75 टक्के व अनुदानावर 02 दुभत्या जनावारचे गट वाटप करणेबाबतची अनियमितता.

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना अंतर्गत 75 टक्के अनुदानावर 02 दुभत्या जनावारचे गट वाटप करणेकरिता रककम रूपये 7,65,552/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीस्तरावर लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकारताना अर्जाची दिनांकासह स्वतंत्र नोंदवहीत नोंद करून ठेवणे, असे आदेशित असताना सदर नोंदवही लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही. उपरोक्त महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो-2011/प्र.क्र.305/ पदुम-4, दिनांक 22/11/2011 नुसार सर्वसाधारण मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थी निवड जिल्हास्तरीय निवड समितीव्दारे करणेत यावी, असे नमुद असतांना तसे अभिलेखे नस्तीस उपलब्ध झाले नाहीत.

2) उपरोक्त शासन निर्णय दिनांक 22/11/2011 नुसार सर्वसाधारण मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थी निवड जिल्हास्तरीय निवड समितीव्दारे करणेत यावी, असे नमुद असतांना तसे अभिलेखे नस्तीस उपलब्ध झाले नाहीत. तसेच लाभार्थ्याच्या अर्जावर दिनांक नमूद नसल्यामुळे अर्ज कधी प्राप्त झाले, याबाबतची खात्री करता आली नाही.

3) एकूण लाभार्थ्यापैकी 30 टक्के महिला आणि 3 टक्के अपंग लाभार्थी असल्याबाबत दर्शवून द्यावे.

4) मार्गदर्शक सुचेनेतील सूचना क्रमांक 19 लाभार्थ्याची यादी, खर्च व मूल्यमापन अहवाल आयुक्त, आदिवासी विभाग, नाशिक तसेच अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग व प्रकल्प अधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावा, असे नमूद असताना तशी कार्यवाही झाल्याचे आढळून येत नाही.

5) उपरोक्त शासन निर्णय दिनांक 22/11/2011 मधील सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना क्रमांक 18 नुसार

या योजने अंतर्गत लाभ दिलेल्या लाभार्थींची यादी संबंधीत जिल्हा पशुधन अधिकारी, पशुधन विकास अधिकारी(विस्तार), कार्यक्षेत्रातील पशुवैदयकिय संस्था व संबंधीत ग्रामपंचायत यांना देण्यात यावी. तसेच कार्यक्षेत्रातील पशुवैदयकिय संस्थांनी लाभार्थींची मास्टर नोदंवही 5 वर्षाकरिता पशुधनाच्या तपशिलासह ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली आढळुन आली नाही.

6) आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे यांचेकडील मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने सादर करावयाचे मासिक, त्रेमासिक, वार्षिक व फलनिष्पत्ती अहवाल तसेच योजनेचे मुल्यमापन अहवाल सादर केल्याचे दिसुन आले नाही.

7) जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीत पूर्ण होणे आवश्यक आहे. परंतु, सदर योजना राबिवताना आणि अंमलबजावणीकरीता मोठ्या प्रमाणावर उशीर झाला आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

8) मार्गदर्शक सुचेनेतील सूचना क्रमांक 13 नुसार लाभार्थ्यांना दुभत्या जनावराचे संगोपन करण्याकरीता प्रशिक्षण देण्याकरीता एक दिवसाचे नि:शुल्क प्रशिक्षण देण्यात यावे, असे नमूद असताना प्रशिक्षण घेतल्याबाबतचे आढळून आले नाही.

9) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रशासकीय आदेशामध्ये नमूद अटी प्रमाणे लाभार्थीने हा दुधाचा व्यवसाय किमान तीन वर्ष करणे बंधनकारक आहे. विभागाने आजपर्यंत जनावर वाटप केल्यावर संबंधित लाभार्थी व्यवसाय करत आहे किंवा कसे, याबाबत सप्रमाण खुलासा करणे आवश्यक आहे.

10) अंमलबजावणी अधिका-याने या योजनेस सर्व प्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाव्दारे व्यापक प्रसिध्दी देवुन लाभार्थीकडुन अर्ज मागविणेत यावेत, अशी सुचना असतांना तशी कार्यवाही केलेली आढळली नाही.

11) जनावरे खरेदीनंतर जनावरच्या पडताळणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांना वाटप केलेली दुधाळ जनावरे पडताळणी केली किंवा कसे, याबबत अभिलेखे आढळून आले नाही.

12) उपरोक्त शासन निर्णय दिनांक 22/11/2011 मधील सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना क्रमांक 20 नुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या 25 टक्के दुधाळ जनावरांची प्रत्यक्ष स्थळावर पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन, उपआयुक्त यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरिष्ठांस सादर करावा, असे नमुद असतांना यापैकी प्रत्यक्ष पडताळणी केल्याचे अभिलेखे लेखापरिक्षणात सादर झाले नाहीत.

13) जनावरे खरेदी करत असताना खरेदी समितीमधील सदस्य हजर असल्याबाबतचे अभिलेखे नस्तीमध्ये आढळून आले नाहीत. तसेच प्रशासकीय मंजुरीचे आदेश क्रमांक 94 दिनांक 02/02/2016 मध्ये नमूद अट क्रमांक 19 प्रमाणेच जनावर खरेदी झाल्याबाबातचे अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाहीत. उदा. जनावराची जात, दुध देण्याची क्षमता, जनावरचा वेताचा कालावधी.

14) सदर योजनामध्ये पंचायत समितीमार्फत योजनेची रक्कम थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यामध्ये रक्कम जमा करण्यात येणार आहे. परंतु, याबाबत पंचायत समितीने खर्च केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्याचे आढळून आले नाही.

15) योजनेमध्ये जनावरे वाटप केल्यानंतर लाभार्थ्याचे उत्पन्न किती प्रमाणात वाढले आणि आर्थिक परिस्थिती मध्ये किती सकारात्मक बदल झाला, याबाबतचा फलश्रुती आहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही. त्यामुळे शासनाच्या योजनामुळे लाभार्थ्याच्या आर्थिक परिस्थितीत किती सकारत्मक फरक पडला, याबाबत आकलन होत नाही.

16) पंचायत समिती स्तरावरील खर्च करण्यात आलेल्या अनुदानाचा हिशेब लाभार्थ्यांचा ताळमेळ सादर करण्यात आला नाही. पंचायत समिती स्तरावर अनुदान शिल्लक असल्यास त्याबाबत योग्य कार्यवाही करून शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. उदा. पंचायत समिती, मनोरा अंतर्गत एका लाभार्थ्याने लाभार्थी हिस्सा न भरल्यामुळे दोन जनावराची अनुदानाची रक्कम रूपये 31,898 + 31,898 = 63,796/- अखर्चित आहे. सदर रक्कम शासन खाती जमा करणे आवश्यक आहे किंवा लाभ देणे आवश्यक आहे. तसेच एकूण शिल्लक अनुदान शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

**3.761 100 टक्के अनुदानावर आदीवासी उपाययोजना सन 2015-2016 दुधाळ जनावरांना पशुखाद्य पुरवठा संबंधी नोंदविलेल्या खर्चातील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** 100 टक्के अनुदानावर आदिवासी उपाययोजना सन 2015-2016 दुधाळ जनावरांना पशुखाद्य पुरवठा संबंधी नोंदविलेल्या रक्कम रूपये 1,31,179/- खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना 2013-2014 नुसार वैयक्तिक लाभार्थीची निवड करतांना योजनेस पुरेशी प्रसिध्दी देवून अर्ज मागविण्यात यावे. तसेच अर्ज स्विकारतांना लाभधारकांना पुरेसा कालावधी देण्यात यावा, असे नमुद आहे. परंतु, अशी कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

2) लाभार्थीची निवड करतांना एकूण लाभार्थीच्या 30 टक्के महिला लाभार्थी निवडण्याबाबत प्राधान्य देण्यात यावे, असे नमूद आहे. लाभार्थी प्रस्तावाची तपासणी केली असता वरीलप्रमाणे महिला लाभार्थींना प्राधान्य देण्यात आले नसल्याचे दिसून येते.

3) लाभार्थीची निवड करतांना संबंधित ग्रामपंचायतींची शिफारस प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. परंतु, ग्रामपंचायतीचे शिफारसीबाबत ठरावाची सत्यप्रत प्रस्तावासोबत जोडण्यात आली नाही. त्यामुळे अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्याचे आढळून येते.

4) योजनेमध्ये निवडलेल्या लाभार्थ्यांची यादी माहितीफलक व विभागाच्या वेबसाईटवर लावणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे संचिकेची तपासणी केली असता दिसून येत नाही.

5) उपरोक्त थेट लाभ हस्तांतरण प्रक्रीयेव्दारे करण्यात आलेल्या प्रदानाचे अनुषंगाने लाभार्थी प्रस्तावाची तपासणी केली असता संचिकेमध्ये जोडण्यात आलेली मंजूर यादी व प्रदानाचे देयकासोबत जोडण्यात आलेल्या यादीतील तपशिलामध्ये व संबंधित पंचायत समिती अंतर्गत पशुधन विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष केलेल्या तपासणी अहवालामधील दर्शविलेल्या जनावरांच्या संख्येमध्ये तफावत असल्याचे आढळून आले आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**3.762 जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पशुवैदयकीय दवाखान्याकरीता औषधी खरेदी खर्चातील अनियमितता**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पशुवैदयकीय दवाखान्याकरीता औषधी खरेदीकरिता रक्कम रूपये 32,54,050/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस 2014/प्रक्र.82/ भाग 111/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये रुपये 3,00,000/- चे वरील साहित्य खरेदी ही ई - निविदा पध्दतीने करावयाची असतांना तसे न करता दरपत्रके मागवुन साहित्य खरेदी करण्यात आली. खुलासा करावा.

2) दैनिक वृत्तपत्रात जाहिरात देवुन साहित्य खरेदी न करता स्थानिक पुरवठादारांकडुन पत्र क्रमांक 3063 दिनांक 03/12/2016 अन्वये दरपत्रके मागविण्यात आली. प्रत्येक औषधीकरीता स्वतंत्र दरपत्रके मागविण्यात येवुन स्वतंत्र पुरवठा आदेश देण्यात आले. अनियमिततेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) पुरवठा आदेशातील दर व उपप्रमाणकातील दर यात तफावत दिसुन येते. सदर दर तफावतीबाबत खुलासा करावा.

4) पंचायत समितीकडील साठा पुस्तकांची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटी अनियमितता आढळतात.

अ- पंचायत समिती, मेहकर- साहीत्य प्राप्तीबाबत पशुवैदयकीय अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

ब- पंचायत समिती, संग्रामपुर- औषधी प्राप्ती व वितरणाच्या तारखा नमद नाहीत.

क- पंचायत समिती, शेगाव- Inj Cetroflaxicine 66 नग Inj meloxiclaim 100 ml 136 नग प्रापतीची नोदं नाही.

ड- पंचायत समिती देऊळगाव राजा - Inj meloxiclaim 100 ml 134 नग साठा पुस्तकात नोंद नाही.

Inj cefro flaxacine 4 gm 64 नग साठा पुस्ताकात नोंद नाही.

ई- पंचायत समिती, सिंदखेडराजा - Inj cefro flaxacine 4 gm 86 नग साठा पुस्तकात नोंद नाही.

उपरोकत औषधी प्राप्तीबाबत स्वतंत्र पोचपावत्या सादर कराव्यात, अन्यथा संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

**3.763 जिल्हा परिषद सेसमधुन केलेल्या फर्निचर खरेदी खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** जिल्हा परिषद सेसमधुन सन 2016-2017 या वित्तीय वर्षात फोरमेलीन चेंबर व इन्स्टुमेंट कॅबिनेट अनुक्रमे 15 नग व 17 नग खरेदी करण्यात येवुन त्यावर रुपये 4,99,643/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रामणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस 2014/प्रक्रं.82/ भाग 111/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये रुपये 3,00,000/- चे वरील साहीत्य खरेदी ही ई - निविदा पध्दतीने करावयाची असतांना तसे न करता दरपत्रके मागवुन साहित्य खरेदी करण्यात आली. खुलासा करावा.

2) दैनिक वृत्तपत्रात जाहीरात देऊन साहीत्य खरेदी न करता स्थानिक पुरवठादारांकडुन खरेदी करण्यात आली. खुलासा करावा.

3) दरपत्रके व्दिलिफाफा पध्दतीने मागविण्यात आले नाही. त्यामुळे पुरवठादार नोंदणीकृत आहे किंवा कसे, याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले नाही. आयकर, विक्रीकर प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास सादर केले नाही.

4) फोरमेलीन चेंबर प्रत्येक पंचायत समितीकरीता 1 नग देण्यात आले असतांना पंचायत समिती, मोताळा व मेहकर येथे प्रत्येक 2 नग पुरवठा केल्याचे दिसुन येते. खुलासा करावा.

5) इन्स्टुमेंट कॅबिनेटचा पुरवठा करतांना पंचायत समिती, चिखली मेहकर व मोताळा येथे प्रत्येकी 2 नग पुरविण्यात आलेले असुन उर्वरीत पंचायत समितींना प्रत्येकी 1 नग पुरवठा करण्यात आला. तफावतीबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

6) पंचायत समिती, देऊळगावराजाकरीता 1 नग फोरमेलीन चेंबर व 1 नग इन्स्टुमेंट कॅबिनेट खरेदी करण्यात येऊन वितरीत केल्याचे दर्शविले आहे. साठा पुस्तकात संबंधीताची स्वाक्षरी नसल्याचे दिसुन आले पंचायत समिती, देऊळगावराजाचे साठा पुस्तकाची तपासणी केली असता सदर बाबी प्राप्तीची नोंद नाही. त्यामुळे सदर साहित्य पुरवल्याबाबत साशंकता असुन पंचायत समिती देऊळगावराजा येथील पोंचपावती सादर करावी अन्यथा रुपये 13,500 + 17,479 एकुण रूपये 30,979/- बाबत संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन रकमेची वसुली होणे आवश्यक आहे.

**3.764 विशेष घटक योजने अंतर्गत 75 टक्के अनुदानावर दुधाळजनावरे वाटप करणे खर्चातील अनियमितता**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** विशेष घटक योजने अंतर्गत 75 टक्के अनुदानावर 111 लाभार्थी करीता दुधाळ जनावरांचे खरेदीकरीता एकुण रुपये 70,81,356/- खर्च केलेला असुन सदर रकमा संबंधीत बँकाकडे प्रदान करण्यात आल्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पशसंवर्धन दुग्ध्व्यवसाय व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो 2011/प्रक्रं.805/पदुम-4, दिनांक 22/11/2011 अन्वये सदर योजनेस प्रशासकीय मंजुरी प्राप्त असुन प्रत्येकी रूपये

40,000/- किंमतीच्या 2 म्हशी संकरीत गायी खरेदीकरीता रूपये 80,000/- व विमा खर्च रुपये 5,061/- असा एकुण रूपये 85,061/- रुपयेची योजना असुन 75 टक्के शासन अनुदान रुपये 63,796/- व 25 टक्के लाभार्थीने स्वत: भरुन अथवा बँक कर्ज घ्यावयाचे असल्यास 5 टक्के लाभार्थी हिस्सा व 20 टक्के बँकेचे कर्ज घेता येईल. परंतु, 5 टक्के रक्कम लाभार्थीकडुन वसुल केल्याचे दिसुन येत नाही 25 टक्के बँकेचे कर्ज मंजुरीपत्र प्राप्त होताच बँकेकडे अनुदानाच्या रकमा धनादेशादवारे पाठविण्यात आल्याचे दिसुन येते.

2) दुधाळ जनावरांची खरेदी ही तालुका स्तरावरील कृषी उत्पन्न बाजार समिती येथुन करावयाची असतांना पंचायत समितीकडे अनुदानाच्या रकमा पाठविणे व संबंधीत पशुधन विकास अधिकाऱ्यांमार्फत योजना राबविणे क्रम:प्राप्त होते. तसे न करता बँकाकडे रकमा प्रदान करण्याचे प्रयोजन काय, खुलासा करावा.

3) बँकेकडुन 25 टक्के लाभार्थी हिस्सा कर्ज रुपाने मंजुर करण्यासंदर्भात मंजुरी पत्र प्राप्त झाल्यानंतर अनुदानाच्या रकमा धनादेशादवारे बँकेकडे सुपुर्द करण्यात आल्यानंतर 2 दुधाळ जनावरे म्हशी व संकरीत गायी खरेदी करणे बंधनकारक असतांना 12 लाभार्थ्यांनी एकच म्हैस किंवा संकरीत गाय खरेदी केल्याचे दिसुन येते.

12 लाभार्थ्यांना प्रत्येकी रूपये 63,796/- अनुदानाची रक्कम 2 जनावरे खरेदीकरीता देण्यात आली असतांना त्यांनी एकच म्हैस किंवा गाय खरेदी केली असल्याने प्रती लाभार्थी रुपये 31,898/- प्रमाणे अनुदानाची रक्कम रुपये 3,82,776/- ची फलश्रुती झाली नाही. सदर 12 लाभार्थ्यांनी दुसऱ्यांदा दुधाळ जनावर खरेदी केले किंवा कसे केले असल्यास त्याबाबत कृषी उतपन्न बाजार समितीची पावती विमा प्रमाणपत्रासह सादर करावी, अन्यथा अनुदानाची रक्कम रुपये 3,82,776/- संबंधीताकडुन वसुल हाणे आवश्यक आहे.

4) सदर योजनेसंदर्भात लाभार्थीकडुन अर्ज मागविण्याचे दृष्टीने दैनिक लोकमत व दिव्यशक्ती या वृत्तपत्रात दिनांक 08/07/2016 रोजी जाहिरात देण्यात आली व त्यानुसार 788 अर्ज प्रकरणे प्राप्त झाले. त्यापैकी 316 लाभार्थीची निवड करण्यात आली. उर्वरीत लाभार्थ्यांचे अर्ज कशाचे आधारे नामंजुर करण्यात आलेत? नोंदवही सादर केली नाही.

5) सन 2016-2017 या वित्तीय वर्षात एकुण 158 लाभार्थ्यांना दुधाळ जनावरे खरेदी संदर्भात अनुदानाच्या रकमा संबंधीत बँकाकडे प्रदान करण्यात आलेल्या असतांना बँकेकडुन दुधाळ जनावरे खरेदी संबंधीत कार्यवाही तात्काळ होणे आवश्यक होते. परंतु, फकत 38 लाभार्थ्यांच्या दुधाळ जनावरे खरेदी पावत्या लेखापरीक्षणास सादर करण्यात आल्या. उर्वरीत 120 लाभार्थीकडील खरेदी पावत्या लेखापरीक्षणास सादर करण्यात आल्या नाहीत.

अर्धसमास पत्र क्रमांक 6 दिनांक 26/10/2017 अन्वये दुधाळ जनावरे खरेदी संदर्भात अभिलेख्याची मागणी करुनही लेखापरीक्षण कालावधी पावेतो अभिलेखे सादर करण्यात आली नाहीत. त्यामुळे 120 लाभार्थी करीता देण्यात आलेल्या अनुदानाची रककम रूपये 63,796/- प्रमाणे एकुण रूपये76,55,520/- ची फलश्रुती झाली नाही. योजनेवरील खर्च निरर्थक ठरला आहे. सदर लाभार्थीना दुधाळ जनावरांचे वाटप करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

6) सन 2015-2016 मधील अखर्चित निधी रुपये 73,53,694/- व सन 2016-2017 मधील प्राप्त निधी रूपये 2,00,00,000/- मिळुन एकुण रूपये 2,73,53,694/- प्राप्त असतांना मार्च 2017 अखेर रुपये 1,00,79,768/- एवढा खर्च करण्यात आला उर्वरीत निधी रूपये 1,72,73,926/- अखर्चित असण्यामागील कारणे नमूद करावी.

7) महाराष्ट्र शासन, पशसंवर्धन दुग्ध्व्यवसाय व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो 2011/प्रक्रं.805/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 20 अन्वये जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी वाटप केलेल्या जनावरांपैकी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करणे बंधनकारक असतांना तसे केल्याचे दिसुन येत नाही.

8) उपरोक्त शासन निर्णयातील सुचना क्रमांक 28 अन्वये लाभार्थ्यांनी दुग्ध व्यवसाय, गाय, म्हैस पालन विषयक प्रशिक्षण घेणे आवश्यक असतांना लाभार्थी प्रशिक्षीत असल्याबाबत प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाहीत.

**3.765 आयुक्त पशुसंवर्धन यांचे भावबंद करारामुळे जिल्हा परिषदेला झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रूपये 10,02,975/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आयुक्तालय पशुसंवर्धन पुणे यांचे भावबंद करारातील निर्देशानुसार विभागाने पुरवठाधारकास तरतुदीच्या एक तृतीयांश इतक्या निधीचे Mineral Mixture पुरवठयाचे आदेश दिलेले आहे. तथापि, वरील कामधेनु व शक्ती या कंपन्यांचे पॅकीग 5 किलोचे पॅकींग रुपये 223/- असून त्याचा प्रती किलो दर रुपये 44.60 एवढा दिसून येतो.

परंतू शंकुज कंपनीकडील खरेदी ही रुपये 45.75 प्रमाणे केलेली असल्यामुळे रुपये 45.75 - रुपये 44.60 = रुपये 1.15 एवढ्या जादा दराने एकूण 7300 किलोग्रॅम मिक्चंरची खरेदी केल्यामुळे जिल्हा परिषदेस 7300 X 1.15 = रुपये 8,395/- चे आर्थिक नुकसान झालेले आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 नुसार रक्कम प्राप्त झाल्याबाबतची पावती पुरवठाधारकाकडून प्राप्त करण्यात आली नाही.

**3.766 जिल्हा वार्षिक योजनाअंतर्गत करण्यात आलेल्या औषध खरेदीतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत 2 प्रमाणकांन्वये रक्कम रूपये 49,99,416/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशात नमुद केल्यानुसार औषधाने पूर्ण विवरण पुरवठाधारकाने बीलावर नोंदविणे आवश्यक आहे. जसे बॅच नंबर, एक्सपायरी डेट, परंतू प्रमाणक क्रमांक 4045, दिनांक 31/03/2017 मधील बीलावर सदरील तपशील नमुद करण्यात आला नाही.

2) आयुक्तालय, पशुसंवर्धन पुणे यांचे भावबंद करार दिनांक 19/03/2017 मधील मुद्दा क्रमांक 09 नुसार चांगल्या स्थितीतील पार्सल कार्यालय प्रमुखांनी स्वत: चे उपस्थितीत दोन अधिका-यांचे समोर फोडावे व त्यातील वस्तूंची नोंद नोंदवहीत घेण्यात यावी. तथापि वरीलप्रमाणे कार्यावाही केल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 नुसार रक्कम प्राप्त झाल्याबाबतची पावती पुरवठाधारकाकडून प्राप्त करण्यात आली नाही.

**3.767 75 टक्के अनुदानावर आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी उपयोजना 2016-2017 अंतर्गत शेळी गट वाटपाबाबत. (OTSP)**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 13,99,554/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मंजुर यादीतील लाभार्थी लाभ घेण्यास तयार नसल्यास प्रतिक्षा यादीतील लाभार्थीस लाभ देतांना मंजुर लाभार्थीकडून नाहरकत प्रमाणपत्र घेऊन (लाभ घेण्यास तयार नाही) नंतर प्रतिक्षा यादीतील लाभार्थीची निवड करावयाची असतांना मंजुर लाभार्थ्यांकडून नाहरकत प्रमाणपत्र न घेता प्रतिक्षा यादीतील लाभार्थीस लाभ दिलेला आहे.

2) शासन निर्णया नुसार शेळी गट वाटप करतांना एकूण लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झालेल्या यादीतुन 30 टक्के महिला लाभार्थींची निवड करणे आवश्यक असतांना नस्ती ची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की आदीवासी उपयोजना अंतर्गत शेळी गट करीता एकूण 36 महिलांनी अर्ज केला असुन पंचायतींने फक्त 06 महिला लाभार्थ्यांना लाभ दिले आहे.

3) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-2011/प्र.क्र.414/पदुम-4, दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना या योजने अंतर्गत लाभ देण्यात यावा असतांना शेळी गट वाटपाबाबतची मंजुरी यादीत एकूण 2 अपंग लाभार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले असुन एकही लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषि, पशंसवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय, विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.323/पदुम-4, नुसार पशुसंवर्धन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलल्या एकूण शेळी गटाच्या 25 टक्के गटांची प्रत्यक्ष पडताळणी करावी तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त

आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हयात फिरतीच्या वेळी वाटप केलेल्या एकूण शेळी गटांपैकी 10 टक्के शेळी गटांची अचानकपणे प्रत्यक्ष पडताळणी करवयाचे असतांना तसे अहवाल नस्तीला आढळून आले नाही.

5) अंमलबजावणी अधिकाऱ्याने या योजनेस सवप्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाद्वारे व्यापक प्रसिध्दी देवून लाभार्थीकडून अर्ज मागविण्यात यावे असे असता फक्त वृत्तपत्राद्वारे प्रसिध्दी करण्यात आले असुन सकाळ या एकच वृत्तपत्राद्वारे प्रसिध्दी करण्यात आले असल्यामुळे योजनेची व्यापक प्रसिध्दी झाली असे म्हणता येत नाही.

**3.768 पशुवैद्यकीय दवाखान्यात विंधन विहीर खोदकामावर अर्धवट खर्च नोंदवुन शासकीय निधीचा अपव्यय करण्याच्या अनियमितेबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा ने त्यांच्या अधिनस्त असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये नवीन विंधन विहीर खोदणेसाठी व त्यावर विद्युतपंप बसविणेकरिता सन 2015 -2016 व 2016-2017 या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण (बिगर आदिवासी) योजनेनेतून एकुण रक्कम रुपये 27,98,490/- खर्च केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नवीन विंधन विहीर खोदणे व त्यावर विद्युत पंप बसविण्याची 30 कामे पूर्ण करून एकूण रूपये 27,98,490/- खर्च करण्यात आले आहे. परंतु, काही पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये फक्त नवीन विंधन विहीर खोदणेसाठी खर्च नोंदविला आहे. परंतु, त्यावर विद्युतपंप बसविण्यात आले नाही.

कामाबाबत अर्धवटपणे खर्च नोंदविणेबाबत अर्धसमास पत्राने विचारणा केली असता त्याचे उत्तर देण्यात आले नाही किंवा फक्त विंधण विहिरीवरच का खर्च नोंदविण्यात आला? त्याबाबत कोणतेही अभिलेखे सादर केले नाही.

अशा प्रकारे निष्फळ खर्च नोंदविल्यामुळे शासकीय निधीचे नुकसान झाले आहे. रक्कम रुपये 1,44,531/- वसुलपात्र आहे. अनुपालन सादर करावे.

**3.769 पशुप्रदर्शन जाहिरात व साहित्य प्रचारच्या खर्चाची गंभीर अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदरबाबत पशुप्रदर्शनी व प्रचार साहित्यावर जिल्हा परिषद सेस फंडातून रूपये 1,48,000/- रूपये खर्च केलेला आहे. तसेच याच पशुप्रदर्शनी व प्रचार साहित्यावर शासकीय निधीतून रूपये 10,00,000/- खर्च केलेले असून त्याबाबत लेखापरीक्षण अहवालामध्ये वेगळा आक्षेप नोंदविला आहे. वरीलप्रमाणे रूपये 1,48,000/- च्या पशुप्रदर्शन व प्रचार साहित्याच्या खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद, वर्धा ने दिनांक 10 व 11 डिसेंबर 2016 ला वर्धा येथे दोन दिवसीय गवळावू पशु प्रदर्शन आयोजित केली होते. त्याबाबत प्रचार करण्यासाठी दैनिक भाष्कर व दैनिक लोकमत समाचार या दोन राज्य स्तरावरील हिंदी दैनिकात जाहीरात देण्याबाबत अनुक्रमे रूपये 33,600/- व रूपये 65,000/- चे प्रदान करण्यात आले.

परंतु, सदर प्रकरणात उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांचे रोष्टरप्रमाणे कार्यवाही न करता राज्यस्तरावरील अ वर्गाच्या दोन दैनिकात जाहीरात देण्यावर खर्च केलेला असून दैनिक लोकमत समाचारमध्ये दिलेल्या जाहीरातीची प्रत नस्तीत व देयकासोबत संलग्न नव्हती. याबाबत अर्धसमास पत्राव्दारे विचारणा केली असता खुलासा करण्यात आला नाही. त्याप्रमाणे लोकमत समाचारच्या रूपये 65,000/- च्या उपप्रमाणक क्रमांक 41191 ची तपासणी केली असता, त्या उपप्रमाणकाच्या तपशिलामध्ये लोकमत समाचार दिवाळी ऑल दिनांक 31/10/2016 , लोकमत दिवाळी ऑल दिनांक 31/10/2016 अशा बाबी नमूद आहे.

अशा प्रकारे शासन परिपत्रकान्वये अनुज्ञेय नसतांना राज्यस्तरावरील अ वर्गाच्या दोन दैनिकात जाहीरात देण्यावर तसेच त्यापैकी लोकमत समाचार या दैनिकात प्रत्यक्षात जाहीरात न देताच नियमबाहयपणे खर्च नोंदविण्यात आलेला आहे. रक्कम रूपये 65,000/- वसूलपात्र आहे.

2(अ) दिनांक 02/12/2016 मे कोलते प्रिंटर्स, नागपूर यांचेकडून चारापत्रीका, दिनांक 09/12/2016 मे. कोलते प्रिंटर्स, नागपूर यांचेकडून जनावरांच्या संसर्गजन्य रोगाविषयी माहिती पत्रक आणि दिनांक 08/12/2016 ला मे. कोलते प्रिंटर्स, नागपूर यांचेकडून गवळावू माहिती पत्रक यावर एकुण रूपये 15,000/- खर्च करण्यात आला.

2(ब) दिनांक 31/02/2017 नुसार पशुप्रदर्शन व प्रचार साहित्य खर्च यावर रूपये 50,000/- खर्च केलेला आहे. याबाबत मे.अशोका ग्राफीक्स, मे. कोलते प्रिंटर्स व मे.सृजनकला प्रिंटींग या तीनही नागपूर येथील पुरवठादारास अनुक्रमे रूपये 20,000, रूपये 20,000/- व रूपये 10,000/- असे एकुण 50,000/- प्रदान करण्यात आले. तीनही खरेदी एकाच प्रकारची असूनही एकत्र करून दरपत्रके न बोलविता तुटक पध्दतीने खर्च करण्यात आलेला आहे. शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र क्र 82/भाग III/ उदयोग-4, दिनांक 30/10/2015 नुसार दरपत्रके न बोलविताच सदरचा खर्च करण्यात आला आहे.

3) त्यानंतर दिनांक 24/01/2017 ला चारापत्रीका, दिनांक 20/02/2017 ला कुक्कुट माहितीपत्रक, दिनांक 24/03/2017 ला कुक्कुट माहिती पत्रक, दिनांक 29/03/2017 ला चारापत्रीका, दिनांक 19/01/2017 ला जनावरांच्या संसर्गजन्य रोगाविषयी माहितीपत्रक दिनांक 10/03/2017 गवळावू माहितीपत्रक व दिनांक 27/03/2017 ला योजना विषयी माहिती पत्रक छपाईवर रूपये 35,000/- खर्च करण्यात आला. परंतु, सदर माहितीपत्रक वाटण्याकरिता पशुपालकांचा कोणताही मेळावा, कार्यशाळा किंवा कार्यक्रम घेतल्याचे कागदोपत्री पुरावे दप्तरी आढळले नाही. तसेच दिनांक 10/12/2016 दिनांक 11/12/2016 या दोन दिवसांचे राज्यस्तरावरील पशुप्रदर्शनी आटोपल्यानंतर सदर रूपये 35,000/- चे पशु प्रचार साहित्य छापण्यावर खर्च करण्याचे प्रयोजनाविषयी अर्धसमास पत्राव्दारे विचारणा करण्यात आली असता त्याबाबत खुलासा करण्यात आला नाही. अशाप्रकारे रक्कम रूपये 35,000/- कागदोपत्री खर्च नोंदवून जिल्हा परिषद सेस निधीचे नुकसान करण्यात आले. रक्कम रूपये 35,000/- वसूलपात्र आहे.

**3.770 दोन दिवसीय गवळावू पशुप्रदर्शनी आयोजीत करणाऱ्या खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद, वर्धा येथे दिनांक 10 व 11 डिसेंबर रोजी दोन दिवसीय गवळावू पशुप्रदर्शनी आयोजीत केली होती. यासाठी शासकीय निधीतून रक्कम रुपये 10,00,000/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशु प्रदर्शनात जनावरांच्या प्रकारानुसार अ, ब, क, ड या 4 गटामध्ये 333 जनावरांची विभागणी करून एकुण 12 विजेत्यांना प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कार अनुक्रमे रूपये 10,000/-, 8,000/- व 6,000/- याप्रमाणे रूपये 96,000/- चे पुरस्कार प्रदान करण्यात आले. परंतु, उर्वरित 321 पशुंना रूपये 1,000/- प्रती याप्रमाणे एकुण रूपये 3,21,000/- चे उत्तेजनार्थ बक्षीस रोख स्वरूपात करण्यात आले. महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग, शासन निर्णय दिनांक 30/08/2010 नुसार पशु प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या विविध जातीच्या गटामध्ये स्पर्धक पशु, पक्षी यांचा सहभाग 10 पेक्षा कमी असल्यास प्रथम, व्दितीय, तृतीय बक्षीय न देता उत्तेजनार्थ बक्षीस देणेबाबत नमूद आहे. परंतु, सदर प्रकरणात प्रत्येक गटात 50 पेक्षा जास्त गोपालक सहभाग झाल्याचे दर्शविण्यात येवून सुध्दा उर्वरित 321 पशुसांटी रूपये 1,000/- प्रती याप्रमाणे रोखीने उत्तेजनार्थ बक्षीस म्हणून दिल्याचे दर्शविले आहे. अशाप्रकारे अनुज्ञेय नसतांना नियमबाहयपणे रूपये 3,21,000/-चा खर्च करण्यात आला आहे. तसेच अशी कोणतीही स्पर्धा नसते, ज्यामध्ये सर्व स्पर्धकांना बक्षीस देण्यात येते. प्रत्यक्षात 321 गोपालकांच्या ओळखबाबत (About Identity) कोणतेही पुरावे आढळले नाही. 321 गोपालकांचे नावे व पशुबाबत नोंदणी करून सही घेतल्याचे दर्शवून कृत्रिम पुरावे तयार केल्याचे दिसते. याबाबत अर्धसमासपत्राव्दारे विचारणा केली असता खुलासा करण्यात आला नाही.

2) 12 स्पर्धकांना 04 गटात विभागून एकुण रूपये 96,000/- चे प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कार प्रदान करण्यात आले आहे. त्यापैकी 07 गोपालकांचे ओळखबाबत अभिलेखे नस्तीत आढळले. परंतु, उर्वरित 05 गोपालक श्री. देवीदास विश्राम राऊत, रा. काचनूर आर्वी, श्री. महेंद्र पंजाबराव खोटे, रा. अहिरवाडा, आर्वी, श्री. चंद्रभान नारायण आलोडे, रा. पांजरा, आर्वी, श्री. भोजराज अरबट व श्री. सचिन देविदास राऊत, रा. काचनूर, आर्वी यांचे ओळखबाबत व बँक खात्याबाबत पुरावे आढळले नाही व अर्धसमासाने मागणी करून सुध्दा लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. त्याचप्रमाणे श्री. देविदास विश्राम राऊत व सचिन देविदास राऊत एकाच कुटुंबातील सदस्य आहेत.

3) पशु प्रदर्शनात भाग घेतल्याबाबत एकुण 333 पशुपालकांची नोंदणी झाली असतांना 700 लोकांच्या जेवण, चहा व नाश्ता यावर एकुण रूपये 94,500/- इतका खर्च झालेला आहे. उपस्थितीपेक्षा दुप्पटीने खर्च करण्याबाबत अर्धसमासपत्राव्दारे विचारणा केली असता खुलासा करण्यात आला नाही.

4) एकदा दरपत्रके बोलावून जेवण व नाश्ता यावर रूपये 94,500/- खर्च केले असतांना व मंडप डेकोरशनव्दारे प्रदर्शन स्थळी राहण्यावर खर्च केला असतांना परत मगन संग्रहालय वर्धा ला रूपये 5,110/- जेवणाचे व MGIRI, वर्धा ला रूपये 2,800/- खोली भाडयाचे प्रदान करण्यात आले. सदर खर्च रोखीने करण्यात आला असून अनुज्ञेय नसतांना करण्यात आला आहे.

5) प्रथम, व्दितीय व तृतीय पुरस्कार प्राप्त करणाऱ्या पशुपालकांना ट्रॉफी प्रदान करण्यासाठी मेशिवा ट्रेडर्स, वर्धा ला ट्रॉफी खरेदीसाठी रूपये 3,000/- प्रदान केले असतांना 12 नग डेमो चेक छापण्यावर रूपये 4,452/- खर्च केला आहे. डेमोचेक कोणत्याही बँकेत वटविण्यात येत नसून तो खर्च निरर्थक आहे. रक्कम रूपये 4,452/- चा खर्च हा वित्तिय औचित्याचा नियमाचा भंग करणारा आहे. वित्तिय औचित्याच्या नियमानुसार शासकीय निधी खर्च करतांना स्वत:चा निधी खर्च करतांना जी काळजी घेतली जाते, त्याबाबत आहे. रक्कम रूपये 4,452/- वसूलपात्र आहे.

6) आयकर अधिनियम 1961 च्या कलम 194 सी नुसार रूपये 30,000/- ते 75,000/- वार्षिक रकमेपर्यंत 2 टक्के आयकर कपात करणे आवश्यक असतांना आकाश कॅटरर्स, वर्धा च्या देयकातून आयकर कपात करण्यात आला नाही. तसेच आयकर अधिनियमानुसार देयकावर पॅन नंबर दर्शविला नसल्यास संबंधिताकडून 20 टक्के आयकर कपात करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आकाश कॅटरर्स हा महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम 1961 व Food Safety and Stadard Act 2011 अन्वये पंजीकृत नाही. 20 टक्के आयकराबाबत रूपये 18,900/- वसूलपात्र आहे.

7) सेवाकर कायदा 1994 च्या भाग 65 (77)(अे) तसेच सुधारीत सेवाकर कायदा 2004 च्या भाग 90 प्रमाणे 10 सप्टेंबर 2004 पासून मंडप डेकोरशन ही बाब सेवाकराच्या कायदयाखाली आणण्यात आली आहे. मे.विनोद डेकोरेशन व मे विकास डेकोरेशनचे अनुक्रमे रूपये 14,992/- व रूपये 41,220/- असे एकुण रूपये 56,212/- सेवाकरांची रक्कम वसूल करावी.

**3.771 पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या विविध बांधकामासाठी दिलेला शासकीय निधी 2 वर्षांहुन अधिक कालावधीपासून खर्च न केल्यामुळे निधी अडकुन असल्याबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 21) -** पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद, वर्धा ने पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या विविध बांधकामांसाठी वित्त प्रेषणाद्वारे सन 2015-2016 व 2016-2017 या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण (बिगर आदिवासी) व योजना अंतर्गत योजना सर्वसाधारण(बिगर आदिवासी) योजनेतून सन 2015-2016 मध्ये रक्कम रुपये 2,48,87,700/- व सन 2016-2017 मध्ये रककम रुपये 1,00,54,237/- निधी जिल्हा परिषद, वर्धा च्या 3 विभागांना वितरीत केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरीलप्रमाणे सन 2015-2016 या आर्थिक वर्षात 210 लक्ष रुपये बांधकाम विभागास पशुवैद्यकीय द्वाखानांच्या विविध बांधकामासाठी वितरीत केले होते. त्यापैकी लेखापरीक्षण दिनांकापर्यंत फक्त रूपये 68,27,681/- खर्च करून 12 बांधकामे पूर्ण करण्यात आली. परंतु, सन 2015-2016 या आर्थिक वर्षात वितरीत केलेल्या निधीपैकी आजतगायत 2 वर्ष 5 महिने चा कालावधी जाऊन सुद्धा रूपये 1,41,72,319/- रुपयांचा शासकीय निधी खर्चाअभावी अडकुन पडलेला आहे. जिल्हाधिकारी तथा सचिव, जिल्हा नियोजन समिती, वर्धा यांचे निधी वितरण आदेश क्रमांक 380 दिनांक 30/06/2015 च्या अट क्रमांक 5 प्रमाणे योजनेअंतर्गत प्राप्त निधी त्याच वित्तिय वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. अखर्चित निधी 1,41,72,319/- शासनास परत करून अनुपालन सादर करावे.

2) वरीलप्रमाणे सन 2015-2016 या आर्थिक वर्षात पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा ने ग्रामीण पाणीपुरवठा विभागास रूपये 30,000/- रुपये वितरीत करण्यात आले आहे. रक्कम रुपये 30,000/- कोणत्या बाबींवर

खर्च करण्यात आले? याबाबत माहिती व अभिलेखे 2 अर्धसमास पत्राद्वारे मागणी करूनही लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. रक्कम रुपये 30,000/- शासनास परत करून अनुपालन सादर करावे.

3) वरीलप्रमाणे सन 2015-2016 या आर्थिक वर्षात नवीन विंधन विहीर खोदणे व विद्युत पंप बसविण्यासाठी रक्कम रुपये 38,57,700/- भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा विभागास वितरीत करण्यात आले आहे. सदर निधीमधून सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार व सादर केलेल्या काम पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रानुसार नवीन विंधन विहीर खोदणे व विदयुत पंप बसविण्याची 30 कामे पूर्ण करून एकूण रूपये 27,98,490/- खर्च करण्यात आले आहे. सदर कामे पूर्ण झाल्यानंतर शिल्लक रक्कम रूपये 10,59,210/- शासनास परत करून अनुपालन सादर करावे.

4) सन 2016-2017 मध्ये वरीलप्रमाणे पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, वर्धा ने पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या विविध बांधकामांसाठी वित्त प्रेषणाद्वारे रूपये 1,00,54,237/- वितरीत करण्यात आले, याबाबत अर्धसमासपत्र देवूनसुद्धा माहिती व अभिलेखे लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

**3.772 जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना अंतर्गत पशुवैद्यकीय संस्था आणि शेळ्या मेंढ्यांना जंतनाशक औषधी पुरवठा करणे बाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर बाबत रक्कम रूपये 6,88,226/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा पशुसर्वंधन अधिकारी यांनी पशुवैद्यकीय संस्था आणि शेळ्या मेंढ्यांना जंतनाशक औषधी पुरवठा करणे साठी कार्यान्वित अधिनस्त पशुवैद्यकीय 52 दवाखाने यांचेकडून वार्षिक औषध मागणी पंचायत समिती पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे मार्फत नोंदविली नसताना विभागानी आपले स्तरावरून परस्पर औषधी कशी खरेदी केली.

2) पशुधन विकास अधिकारी यांची जिल्हा स्तरावर औषधी खरेदी साठी समिती गठित नसताना औषधी खरेदी यादी तयार करुण तांत्रिक मंजुरी साठी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त नागपुर यांना कशी सादर केली.

3) पशुसंवर्धन आयुक्त, पुणे यांचे भावबंद दरकरार पत्र क्रमांक डीडीडी/टेंडर/595/391/2016-17/पसं 12, औध, पुणे 67, दिनांक 19/03/2017 नुसार येणे प्रमाणे निविदाधारकांना औषध पुरवठा आदेश विभागानी दिनांक 29/03/2017 ला दिले आहे.

4) औषध दरकरार अटी व शर्ती क्रमांक 03 प्रमाणे औषधांची बाबनिहाय गुणवत्ता तपासणी अहवाल उपलब्ध केले नाही. खात्याचे निर्देशानुसार गुणवत्ता तपासणी अहवाल शिवाय पुरवठाधारकांना रक्कम अदा केली.

5) पशुवैद्यकीय कार्यान्वित पंचायत समिती, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे मार्फत औषधी पुरवठा केलेली दवाखाने यांचे औषधनिहाय विनियोग प्रमाणपत्र नाही.

6) पशुसंवर्धन आयुक्त, पुणे यांचे भावबंद दरकरार अटी व शर्ती क्रमांक 07 प्रमाणे औषधिचे दर हे मुळ किंमत व्हँट / विक्रीकर सर्व समावेशक दर या स्वरूपात असतांना येणे प्रमाणे औषध पुरवठाधारकांनी मागणी देयक मध्ये vat रक्कमेची आकारणी केली आहे. दरकरार व्यतिरिक्त आकारणी केलेली रक्कम रुपये 31,131/- वसुली होणे आवश्यक आहे.

7) पशुसंवर्धन आयुक्त, पुणे यांचे भावबंद दरकरार पत्र क्रमांक डीडीडी/टेंडर/595/391/2016-17/पसं 12, औध, पुणे 67, दिनांक 19/03/2017 नुसार औषधीचा पुरवठा करने साठी खात्याशी करारनामा केलेले 19 निविदाकार मध्ये Me. Rafale Pharma यांचे नावाचा समावेश नाही. खात्याशी करारनामा नसताना विभागानी Me. Rafale Pharma यांना औषधी पुरवठा आदेश देऊन औषधी खरेदी कशी केली.

**3.773 सामान्य योजना अंतर्गत पशुवैद्यकीय संस्था आणि शेळ्या मेंढ्यांना जंतनाशक औषधी पुरवठा करणेबाबत**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर बाबत रक्कम रूपये 19,99,998/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा पशुसर्वधन अधिकारी यांनी पशुवैद्यकीय संस्था आणि शेळ्या मेंढ्यांना जंतनाशक औषधी पुरवठा करणे साठी कार्यान्वित अधिनस्त पशुवैद्यकीय 52 दवाखाने यांचेकडून वार्षिक औषध मागणी पंचायत समिती, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे मार्फत नोंदविली नसताना विभागानी आपले स्तरावरून परस्पर औषधी कशी खरेदी केली.

2) पशुधन विकास अधिकारी यांची जिल्हा स्तरावर औषधी खरेदी साठी समिती गठित नसताना औषधी खरेदी यादी तयार करुन तांत्रिक मंजुरी साठी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त नागपुर, यांना कशी सादर केली.

3) पशुसंवर्धन आयुक्त पुणे यांचे भावबंद दरकरार पत्र क्रमांक डीडीडी/टेंडर/595/391/2016-17/पसं 12, औध, पुणे 67, दिनांक 19/03/2017 नुसार येणे प्रमाणे निविदाधारकांना औषध पुरवठा आदेश विभागानी दिनांक 29/03/2017 ला दिले आहे.

4) औषध दरकरार अटी व शर्ती क्रमांक 03 प्रमाणे औषधांची बाब निहाय गुणवत्ता तपासणी अहवाल उपलब्ध केले नाही. खात्याचे निर्देशानुसार गुणवत्ता तपासणी अहवाल शिवाय पुरवठाधारकांना रक्कम अदा केली.

5) पशुवैद्यकीय कार्यान्वित पंचायत समिती, पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे मार्फत औषधी पुरवठा केलेली दवाखाने यांचे औषधनिहाय विनियोग प्रमाणपत्र नाही.

6) पशुसंवर्धन आयुक्त, पुणे यांचे भावबंद दरकरार अटी व शर्ती क्रमांक 07 प्रमाणे औषधिचे दर हे मुळ किंमत व्हॅट / विक्रीकर सर्व समावेशक दर या स्वरूपात असतांना येने प्रमाणे औषध पुरवठाधारकांनी मागणी देयक मध्ये vat रक्कमेची आकारणी केली आहे. दरकरार व्यतिरिक्त आकारणी केलेली रुपये 1,32,155/- रक्कमेची वसुली होने आवश्यक आहे.

7) पशुसंवर्धन आयुक्त, पुणे यांचे भावबंद दरकरार पत्र क्रमांक डीडीडी/टेंडर/595/391/2016-17/पसं 12, औध, पुणे 67, दिनांक 19/03/2017 नुसार औषधीचा पुरवठा करने साठी खात्याशी करारनामा केलेले 19 निविदाकार मध्ये Me. Gusto Pharma. यांचे नावाचा समावेश नाही. खात्याशी करारनामा नसताना विभागानी Me. Gusto Pharma. औषधी पुरवठा आदेश देऊन औषधी खरेदी कशी केली.

**3.774 केंद्र पुरस्कृत योजना अंतर्गत लाळ्या खुरकत रोगाचे नियंत्रण व रोगमुक्त पट्टा निर्माणसाठी साहित्य खरेदी करणेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर बाबत रक्कम रूपये 5,69,991/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा पशुसर्वधन अधिकारी यांनी लाळ्या खुरकत रोगाचे नियंत्रण व रोगमुक्त पट्टा निर्माण करणे साठी कार्यान्वित अधिनस्त पशुवैद्यकीय दवाखाने यांचेकडून लसीकरणासाठी लागनारे निडल, सीरीज, व अन्य साहित्य मागणी पंचायत समिती पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे मार्फत नोंदविली नसताना विभागानी आपले स्तरावरून परस्पर साहित्य कशी खरेदी केली.

2) पशुसंवर्धन आयुक्त, पुणे यांचे भावबंद दरकरार पत्र क्रमांक व्हीईटी/टेंडर/112/392/2016-17/पसं 12, औध, पुणे 7, दिनांक 20/03/2017 नुसार येणे प्रमाणे निविदाधारकांना साहित्य पुरवठा आदेश विभागानी दिनांक 29/03/2017 ला दिले आहे.

3) साहित्य पुरवठा पार्सल चांगल्या स्थितीत असल्याबाबत कार्यालय प्रमुख यांनी स्वत: आणि अन्य प्राधिकारी यांचे समक्ष पार्सल फोडून साहित्यांची मागणी नुसार साहित्य पुरवठा केले किंवा कसे याची तपासणी केली नाही.

4) साहित्यांची गुणात्मक आणि संख्यात्मक तपासणी अहवाल शिवाय पुरवठाधारकांना रक्कम अदा केली.

5) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) प्रमाणे सक्षम प्राधिकारी यांचे साहित्य गुणवत्ता तपासणी अहवाल नाही.

6) पशुवैद्यकीय कार्यान्वित पंचायत समिती पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचे मार्फत साहित्य पुरवठा केलेली दवाखाने यांचे साहित्य निहाय विनियोग प्रमाणपत्र नाही.

7) पशुसंवर्धन आयुक्त, पुणे यांचे भावबंद दरकरार अटी व शर्ती क्रमांक 05 प्रमाणे साहित्य दर हे मुळ किंमत व्हॅट / विक्रीकर सर्व समावेशक दर या स्वरूपात असतांना Me. Gusto Pharma. 6 टक्के Vat rupye 3,503/- साहित्य पुरवठाधारकांनी मागणी देयक मध्ये VAT रक्कमेची आकारणी केली आहे. दरकरार व्यतिरिक्त आकारणी केलेली रक्कमेची रक्कम वसुली होणे आवश्यक आहे.

**3.775 कामधेनु दत्तक ग्राम योजनेसाठी औषधी खरेदीतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदर बाबत रक्कम रूपये 15,79,985/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे कलम 83 (3) अन्वये औषधी खरेदीपुर्वी त्याची गुणवत्ता तपासणी अहवाल प्रयोगशाळेकडून प्राप्त करून घेणे आवश्यक आहे व प्रयोगशाळेकड्न तपासणी अहवाल समाधानकारक आल्यानंतर 90 टक्के रक्कमेचे प्रदान करणे आवश्यक असतांना नियमबाहयपणे संपुर्ण 100 टक्के रक्कमेचे प्रदान केल्यामुळे पुरवठाधारास अवैध लाभ दिल्याचे दिसून येते

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1093/प्र.क्र.1239/ 34, दिनांक 01/09/1999 नुसार साहित्याचे खरेदी तथा वाटप त्याच वित्तिय वर्षात होणे आवश्यक असतांना तसे न केल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला असे म्हणता येत नाही.

3) शासन निर्णय दिनांक 20/06/2008 अन्वये योजनेच्या नियोजनाची अंमलबजावणी केल्याचे दिसून येत नाही. पशुच्या आरोग्यांत सुधारणा झाल्याबाबत पशुधन अधिकाऱ्याचा अहवाल नस्तीला दिसून आलेला नाही

**3.776 कामधेनु दत्तक ग्राम योजनेअंतर्गत विविध बाबीवरील खर्चाची अनियमितता.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** कामधेनु दत्तक ग्राम योजनेअंतर्गत विविध बाबींकरिता रक्कम रुपये 19,20,000/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना 8 तालुक्यातील निवड केलेल्या एकूण 32 गावात उक्त शासन निर्णयातील निकषानुसार व विहीत बाबीवर योजना राबवावयाची आहे. असे असतांना सुचना फलक 32 नग रूपये 2,97,216/- व लोखंडी बोर्डकरीता रूपये 1,36,000/- एकूण रक्कम रुपये 4,33,216/- याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती-2012/प्रक273/39, दिनांक 26/11/2014 नुसार रूपये 3,00,000/- पेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब न करता उपरोक्त बाबीवर खर्च केलेला आहे.

2) पंचायत समिती स्तरावर सदर योजने अंतर्गत वैरण विकास बाबत 32 दत्तक ग्राम यांना प्रत्येकी रुपये 17,000/- प्रमाणे एकूण रुपये 5,44,000/- तसेच सहल व प्रसिध्दी करीता रूपये 9,42,784/- असे एकूण रक्कम रूपये 14,86,784/- अनुदान वितरीत केलेची रक्कमेची उपयोगीता प्रमाणपत्र उपलब्ध केले नाही. तसेच योजनेचा मुल्यमापन अहवाल विभागानी उपलब्ध केले नाही.

3) कामधेनु दत्तक ग्राम योजनेशी निगडीत मार्गदर्शक सुचना नुसार विविध 10 बाबीवर वर्षभर योजना राबवयाची आहे. कारण काही गायी / म्हशी दुधात असतील तर काही गाभण, त्यामुळे योजनेचा पुर्ण लाभ मिळावा व वेगवेगळ्या कालावधीमध्ये दुधात असणाऱ्या गायी / म्हशीच्या दुध उत्पादनामध्ये किती वाढ झाली, याबाबत माहिती घेता येईल व योजनेचा एकंदरीत मुल्यमापन करणे शक्य होईल. परंतु, सदर योजनेत संपुर्ण वर्षात एकूण मंजुर अनुदानाचे 39.34 टक्के इतकाच खर्च झाल्याने संबंधीतास यांचा योग्य लाभ झाला नाही. तेव्हा या योजनेचा मुळ उद्देश सफल झाला, असे म्हणता येत नाही.

**3.777 रुग्णालये व दवाखाने सामुग्री व पुरवठा योजने अंतर्गत औषधी खरेदीतील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** प्रमाणक क्रमांक 1230 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 7,23,900/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) M/S Gusto Pharma Aurangabad यांना दिलेल्या पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 नुसार पुरवठादाराच्या देयकामध्ये पुरवठा संदर्भात औषधीचा Batch no, Mfg Date, Exp Date चा उल्लेख असावा, असे नमुद असतांना सुध्दा पुरवठादाराने सादर केलेल्या उपप्रमाण क्रमांक 335 दिनांक 25/09/2016 वर पुरवठा केलेल्या औषधींबाबत सदर तपशिल नमुद नाही.

2) भावबंद दरकरारातील अट क्रमांक 15 नुसार जिल्हास्तरीय औषधी मागणी करणा-या अधिका-यांनी औषधी मागणी करण्यापूर्वी त्यांच्या अधिनस्त पशुवैदयकीय दवाखान्यांकडून आवश्यक औषधींची मागणी घ्यावी व त्यासाठी सर्व पशुवैदयक दवाखान्यांचे प्रमुखांनी त्यांच्या दवाखान्यात गेल्या 3 वर्षात उपचारासाठी आलेल्या पशुरुग्णांचा आढावा घेउन मागणी करण्याबाबत नमुद आहे. परंतु, औषधी खरेदी करण्यापूर्वी अशा प्रकारची क्षेत्रिय पशुवैदयकीय दवाखान्याकडून कोणतेही मागणीपत्र प्राप्त न करता मोघम खरेदी करण्यात आली आहे.

3) उपरोक्त औषधी प्राप्त झाल्याची नोंद साठा पुस्तक पान क्रमांक 05 ते 07 वर घेण्यात आली आहे. परंतु, औषधी प्राप्त झाल्याचा दिनांक, औषधी वितरीत केल्याचा दिनांक, प्रत्येक पशुवैदयक दवाखान्याला वितरीत केल्यानंतर शिल्लक साठा, वितरण करणा-या अधिका-याची स्वाक्षरी इत्यादी रकाने भरण्यात आले नाहीत. तसेच सदर औषधी प्राप्त झाल्याबाबत पशुवैदयक दवाखान्यांकडून पोच पावत्या उपलब्ध् केलेल्या नाहीत. तसेच पशुवैदयक दवाखान्यांचे उपयोगिता / विनियोग प्रमाणपत्र घेतलेले नाही.

4) पुरवठादाराकडून औषधी प्राप्त झाल्याचे डिलिव्हरी चालान औषधी प्राप्त करणा-या अधिका-याच्या स्वाक्षरीसह घेण्यात आले नाही.

5) पुरवठादारास रक्कम प्राप्त झाल्याबाबत मुद्रांकीत पोचपावती नस्तीबध्द नाही.

6) Garima Health care pvt ltd यांनी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना दिनांक 07/12/2016 ला औषधींचा पुरवठा केल्याचे दिसून येते. सदर पुरवठा दिनांक 07/12/2016 ला केल्याने दिनांक 27/10/2016 ते 07/12/2016 असे 40 दिवस म्हणजेच 6 आठवडे विलंबाने केला आहे. म्हणून भावबंद करारातील अट क्रमांक 12 नुसार प्रती आठवडा 0.5 टक्के विलंब शुल्क आकारणी करावी.

7) प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन, नागपूर विभाग, नागपूर यांनी त्यांचे पत्र क्रमांक 4186 दिनांक 29/06/2016 अन्वये उपरोक्त औषधांच्या खरेदीस तांत्रिक मंजूरी प्रदान केली आहे. परंतु, सदर तांत्रिक मंजुरी प्रदान करण्या अगोदरच अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पत्र क्रमांक 1462 दिनांक 27/06/2017 अन्वये पुरवठादारास पुरवठा आदेश देण्यात आला आहे

**3.778 जिल्हा परिषद महसूल खर्चांतर्गत पशुवैदयकीय दवाखान्यासाठी अवजारे व हत्यारे खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर बाबत रक्कम रूपये 71,985/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुसंवर्धन आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक 04/01/2016 चे हत्यारे, अवजारे, उपकरणे खरेदीबाबत भावबंद दर करारमधील सुचना क्रमांक 14 नुसार जिल्हास्तरीय हत्यारे, अवजारे व उपकरणे यांची मागणी करणा-या अधिका-यांनी मागणी करण्यापूर्वी त्यांचे अधिनस्त पशुवैदयकीय दवाखान्यांकडून आवश्यक हत्यारे अवजारे, उपकरणे यांची मागणी घ्यावी, असे नमुद असतांना क्षेत्रिय कार्यालयांकडून अशी मागणी न घेताच मोघम स्वरुपात खरेदी केलेली आहे.

2) भावबंद दरकरारातील सुचना क्रमांक 13 नुसार निविदाधारकाकडून पुरवठा झालेल्या हत्यारे अवजारे, उपकरणे यांच्या गुणात्मक आणि संख्यात्मक तपासणी झाल्यानंतर 45 दिवसांच्या आत प्राप्त पुरवठयाची रक्कम अदा करावी, असे सुचना असतांना सुध्दा प्राप्त हत्यारे व अवजारे यांची गुणात्मक चाचणी अहवाल उपलब्ध नसतांना सुध्दा संबंधितास रक्कम अदा करण्यात आली आहे.

3) भावबंद दरकरारातील सुचना क्रमांक 3 नुसार पुरवठादारांकडून प्राप्त हत्यारे व अवजारे यांची वाहतुक कोणत्या माध्यमांद्वारे करण्यात आली? याचा अहवाल नस्तीला / देयकाला जोडण्यात आलेला नाही.

4) सदर साठा प्राप्त करणा-या अधिका-याच्या स्वाक्षरीसह डिलीव्हरी चालान नस्तीला उपलब्ध् नाही.

5) साठा नोंदवहीत उपरोक्त प्राप्त हत्यारे व अवजारे यांची नोंद पान क्रमांक 35 ते 36 घेण्यात आली आहे. परंतु, साहित्य कोणत्या दिवशी प्राप्त झाला, तो दिनांक साठा पुस्तकात नमुद करण्यात आला नाही त्यामुळे साठा उशीरा प्राप्त झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. हत्यारे व अवजारे वितरीत केल्याचा दिनांक, प्रत्येक पशुवैदयक दवाखान्याला वितरीत केल्यानंतर शिल्लक साठा, वितरण करणा-या अधिका-याची स्वाक्षरी इत्यादी रकाने भरण्यात आले नाहीत. तसेच सदर वस्तू प्राप्त झाल्याबाबत पशुवैदयक दवाखान्यांकडून पोच पावत्या उपलब्ध केलेल्या नाहीत

6) भावबंद दरकरारातील सुचना क्रमांक 5 नुसार जर सदर माल रूपये 5,000/- चे वर असल्यास, थेट तालुकास्तरावर पशुसंवर्धन दवाखान्याला साहित्य पुरवठादाराकडून स्वखर्चाने पुरवठा करण्यासंदर्भात सुचना आहे असे असतांना सुध्दा सदर साहित्य जिल्हा मुख्यालयी मागविण्यात आले आहे.

7) भावबंद दरकरारातील सुचना क्रमांक 15 नुसार जिल्हास्तरीय अधिका-यांनी खरेदी केलेली हत्यारे, अवजारे व उपकरणे विनावापर पडून राहिल्यास व मुदबाहय झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मागणी करणाऱ्या अधिका-याची राहिल, असे असतांना त्याप्रमाणे पशुवैदयक दवाखान्यांचे उपयोगिता / विनियोग प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

**3.779 सेवाशुल्क अंतर्गत संपूर्ण रक्कम पंचायत समितीला न देता रोखवहीला शिल्लक ठेवणेबाबत**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर बाबत रक्कम रूपये 14,41,533/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शासन निर्णयान्वये पशुवैदयकीय दवाखान्यामार्फत जमा झालेल्या रकमांचे वितरण पंचायत समित्यांना करणेबाबत आदेशीत आहे. पशुसंवर्धन विभागांतर्गत रोखपुस्तक व बँक पासबुकची तपासणी केली असता सन2016-2017 मध्ये एकुण 21,64,287/- शिल्लक आहे. परंतु, रूपये 14,41,533/- खालीलप्रमाणे नमुद केल्याप्रमाणे पंचायत समित्यांना वितरीत केली आहे:-

1) वरील नमुद शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली नाही त्यामुळे सदर रक्कम अखर्चित आहे.

2) सन 2016-2017 मध्ये रक्कम रूपये 14,41,533/- पंचायत समित्यांना कोणत्या आधारे वितरीत केली? त्याचा अहवाल प्राप्त नाही.

3) नस्तीची तपासणी केली असता ज्या पंचायत समितीमार्फत जेवढी रक्कम जमा झाली, त्यांना त्या प्रमाणात वितरीत करणे आवश्यक आहे. परंतु, सदर रक्कम त्याप्रमाणे वितरीत करण्यात आली नाही.

4) सन 2016-2017 अखेर सदर सेवा शुल्काची रक्कम रूपये 7,22,754/- शिल्लक आहे.

**3.780 एकस्तर पदोन्नतीचा लाभ देताना चुकीची वेतननिश्चिती केल्यामुळे अतिप्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक टिआरएफ-2000/प्र.क्र.3/बारा, दिनांक 06/08/2002 मधील परिच्छेद क्रमांक 3 मधील मुद्दा क्रमांक 7 नुसार आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून एकस्तर पदोन्नतीचा लाभ देताना गट ‘अ’ ते ’ड’ मधील सर्व पदधारकांना संबंधीत कर्मचारी/अधिकारी त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच्या काळात त्यांनी धारण केलेल्या मूळ पदाच्या नजीकची वरिष्ठ/पदोन्नतीची वेतन श्रेणी व त्या अनुषंगाने वेतननिश्चितीचा लाभ देण्याबाबत तरतूद आहे म्हणजे कर्मचारी/अधिकारी यांनी धारण केलेल्या मूळ पदावरून वरिष्ठ पदावर त्यांची पदोन्नती झाली असती, त्यावेळेस ज्याप्रमाणे वेतननिश्चिती केली असती, त्याप्रमाणे वेतननिश्चिती एकस्तर पदोन्नतीचा लाभ देताना करणे आवश्यक आहे.

पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली येथील श्री.रामदास कवडू घोडाम, परिचर यांचे सेवापुस्तकाची पडताळणी केली असता एकस्तर पदोन्नतीचा लाभ देताना पदोन्नतीप्रमाणे वेतननिश्चीती न करता शासन निर्णय,

वित्त विभाग दिनांक 29/04/2009 मधील परिशिष्ट 3 नुसार वेतननिश्चीती केल्यामुळे नियुक्तीचा दिनांक 20/09/2007 पासून वेतनाचे अतिप्रदान होत असल्याचे निदर्शनास आले.

उपरोक्तपणे चुकीच्या वेतननिश्चितीमुळे श्री.रामदास कवडू घोडाम, परिचर यांना नियुक्तीचा दिनांक 26/09/2007 पासून माहे सप्टेंबर, 2017 पर्यंत रूपये 58,053/- चे अतिप्रदान झालेले आहे. तरी सोबत जोडलेल्या विवरणपत्र 1 नुसार अतिप्रदान राशी रूपये 58,053/- ची वसूली करुन शासन खाती जमा करण्याच्या कार्यवाहीसह अनुपालन सादर करण्यात यावे.

**3.781 लाळया खुरकत रोगाचे नियंत्रण-रोगमुक्त पट्टा निर्माण करणे अंतर्गत साहित्य खरेदीबाबत (केंद्र हिस्सा).**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** संगणक साहित्य खरेदीसाठी रूपये 1,76,100/- व दवाखान्यातील लसीकरणाच्या साहीत्याचा पुरवठासाठी रूपये 2,41,597/- असा एकूण रूपये 4,17,697/- चा खर्च करण्यात आला. सदर खर्चाच्या नस्तीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक एफएमडीसीपी/2016-17/40/836/2016, दिनांक 18/07/2016 अन्वये प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार साहित्य पुरवठा व यंत्रसामुग्री या कारणासाठी विनियोग करीत असताना आवश्यक असणाऱ्या बाबीवरच खर्च करणे अपेक्षीत आहे. यासाठी जिल्हयातील शिल्लक साठा तपासूनच पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. उपरोक्तपणे संगणक साहित्य मिळणेबाबत कोणतीही मागणी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेली नसताना आवश्यक नसताना सदर साहित्य खरेदी करण्यात आलेली आहे.

2) वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक 01/12/2016 नुसार 15 फेब्रुवारी पर्यंत खरेदी प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक असून त्यानंतर कोणतीही खरेदी प्रक्रिया राबविता करता येत नाही. मात्र जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी पत्र क्रमांक जिपगड/ पशुसं/तांत्रीक/200(8)/2017, दिनांक 14/02/2017 नुसार संगणक साहित्य खरेदी करिता व पत्र क्रमांक जिपगड/पशुसं/ तांत्रीक/ 200/2017, दिनांक 14/02/2017 नुसार दवाखान्यातील लसीकरणाच्या साहित्य खरेदीकरीता दरपत्रके मागविली. तसेच दिनांक 29/03/2017 रोजी दरपत्रके मंजूर करुन पुरवठा आदेश देण्यात आला. 15 फेब्रुवारी नंतर खरेदी प्रक्रिया पूर्ण होत असून शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे

3) जिल्हा स्तरावरील साठा नोंदवही तपासली असता खरेदी केलेले सर्व संगणक साहित्य व लसीकरणाचे साहित्य लेखापरिक्षणाच्या दिनांकापर्यंत विनावाटप पडून असल्याचे निदर्शनास आले.

4) साठा नोंदवहीत साहीत्यानिहाय पृष्ठे सोडलेली नसून योजनानिहाय पाने सोडलेली आहेत तसेच प्रत्येक वर्षी साठा नोंदवही बदलली जाते. त्यामुळे पूर्वीचे कोणते साहित्य किती प्रमाणात शिल्लक आहे? याबाबत आढावा घेता येत नाही.

5) पंचायत समिती स्तरावरील साठा नोंदवहींची लेखापरिक्षणाकरीता सादर केलेले नाही.

6) योजनेअंतर्गत उपलब्ध झालेल्या तरतूदींचे जिल्हानिहाय खर्चाचे एकत्रीत उपयोगीता प्रमाणपत्र विहीत नमुन्यात (प्रपत्र - क) दिनांक 10/04/2014 पूर्वी आयुक्त, पुणे यांना सादर करणे आवश्यक आहे. मात्र जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी लेखापरिक्षणाच्या दिनांकापर्यंत सदर प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

**3.782 75 टक्के अनुदानावर 2 दुधाळू जनावरांचे गट वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** 75 टक्के अनुदानावर 2 दुधाळू जनावरांचे गट वाटप योजनेवर रक्कम रूपये 49,76,088/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, गडचिरोली, कुरखेडा, सिरोंचा, आरमोरी, एटापल्ली व अहेरी यांचे उपयोगीता प्रमाणपत्रात प्रत्यक्षात लाभ दिलेल्या लाभार्थ्यांचे नाव दर्शविलेले नाही. त्यामुळे निवड यादीतीलच लाभार्थी असल्याची खात्री करता आली नाही.

2) पंचायत समिती चामोर्शी, मुलचेरा, सिरोंचा, भामरागड, एटापल्ली व अहेरी यांचेकडून महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक 1082/645/266/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यांकन करणेबाबत निर्देश असतांना फलश्रुती अहवाल प्राप्त केलेले नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 3 अन्वये लाभार्थी निवडतांना 30 टक्के महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश असतांना पंचायत समिती आरमोरी, एटापल्ली व भामरागड यांनी सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही केली नाही.

4) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 4 अन्वये तसेच शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2011/प्र.क्र.414/पदुम-4, दिनांक 06/09/2011नुसार लाभार्थी निवडतांना 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत लाभ देण्यात यावा, असे निर्देश असतांना पंचायत समिती गडचिरोली, वडसा, कुरखेडा, धानोरा, चामोर्शी, अहेरी व सिरोंचा यांनी सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही केली नाही.

5) पंचायत समिती, आरमोरीचे लाभार्थी श्री.किशोर जनार्दन मेश्राम, रा.वासाळा,पंचायत समिती मुलचेराचे लाभार्थी श्री.गुलशन रामचंद्र करमे, रा.गोमणी, पंचायत समिती, एटापल्लीचे श्री.दौलत पोचुजी दहागावकर, रा.डुम्मे व पंचायत समिती, भामरागड चे श्रीमती चंपा दशरथ झाडे, रा.मन्नेराजाराम हे लाभार्थी अपंग असल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे मंजूरी आदेशात नमूद आहेत. तथापि, अपंग असल्याबाबतचे त्यांचे वैद्यकिय प्रमाणपत्र अर्जासोबत जोडलेले नाही.

6) पंचायत समिती, भामरागड मधील मंजूर लाभार्थी श्री.विलास वसंत चांदेकर, रा. मन्नेराजाराम यांचा अर्ज नस्तीला उपलब्ध नाही. त्यामुळे अर्जाची तपासणी करता आली नाही. त्यांची झालेली निवड निकषानुसारच झाल्याची खात्री करता आली नाही.

7) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे कार्यालयात उपलब्ध् मंजूर केलेल्या लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता पंचायत समिती, एटापल्ली येथील लाभार्थी श्री. आनंदराव वक्टु दुर्गे, रा.बुर्गी यांचे अर्जावर पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती, एटापलली यांची स्वाक्षरी नाही. त्यांचे अर्जावर आधार कार्ड नंबर नाही. तसेच सदर लाभार्थी दारिद्रय रेषेखाली, अत्यल्प / अल्प् भुधारक शेतकरी नाही. त्यांचेकडे 2 हेक्टर् 80 आर शेतजमीन असल्याचे सात बाराचे दाखल्यावरून दिसून येते. सदर लाभार्थी महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील लाभार्थी निवडीचे निकषात बसत नसतांना नियमबाहय लाभ दिला आहे. तरी संबधितावर जबाबदारी निश्चित करून, रक्कम् वसूलीची कार्यवाही करावी व अनुपालन सादर करावे.

8) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे कार्यालयात उपलब्ध मंजूर केलेल्या लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता पंचायत समिती, अहेरीचे 4 लाभार्थी अर्जावर लाभार्थीचे व पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती, अहेरी यांची स्वाक्षरी नाही. तसेच 9 लाभार्थी अर्जावर पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती, अहेरी यांची स्वाक्षरी नाही.

9) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 20 अन्वये पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या 25 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी 10 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी व तसा अहवाल वरीष्ठास सादर करावा, असे निर्देश असतांना असे अहवाल लेखा तपासात उपलब्ध झाले नाही.

10) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 9 अन्वये एका कुटूंबातील एकाच व्यक्तिस या योजनेचा लाभ देण्यात यावा किंवा तत्सम योजनेतंर्गत लाभ दिलेल्या लाभार्थीस सदर

योजनेचा लाभ देवू नये, असे स्पष्ट निर्देश असतांना मागील तीन वर्षात लाभ घेतला नाही, याबाबतचे ग्रामपंचायत सरपंच व सचिवाचे पत्र अर्जासोबत जोडलेले नाही.

**3.783 जिल्हा परिषद उपकरातुन साहित्य व औषधी लस खरदेतील अनियममितता.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद ने जिल्हा परिषद उपकरातुन साहित्य व औषधी लस खरेदीवर रक्कम रूपये 9,88,460/- खर्च नोदंविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अतिरिक्त आयुक्त, पशुसवंर्धन विभाग यांचे पत्र जावक क्रमांक डीडीडी/313/ (भाग- 2/49/2012-13/पसं-12. पुणे 1, दिनांक 21/03/2013 व अतिरिक्त आयुक्त, पशुसवंर्धन विभाग यांचे पत्र जावक क्रमांक डीडीडी/326/1256/2014/पसं-12.औंध पुणे7, दिनांक 05/02/2014 यांचे दरकरार मंजुरीतील अटी व शर्तीनुसार जिल्हास्तरीय औषधी मागणी करणेपुर्वी त्यांचे अधिनस्त पशुवैदयकीय दवाखान्याकडुन मागणी घेण्यात यावी प्रस्तुत प्रकरणी अशी कार्यवाही झालेली नाही.

महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2010/प्र.क्र.335/पदुम-4, दिनांक 09/08/2011 अन्वये दवाखान्याचा दर्जा व श्रेणी नुसार औषधी खरेदी करून वाटप करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली असल्याचे दिसून आले नाही.

अतिरिक्त आयुक्त, पशुसवंर्धन विभाग यांचे पत्र जावक क्रमांक डीडीडी/326/(भाग-2/49/2014/पसं-12, पुणे-7, दिनांक 05/02/2014 अन्वये मे.तिरुपती ट्रेड लिंक, नागपूर यांचेशी दरकरार करण्यात आलेला आहे. सदरील दरकराराची मुदत दिनांक 30/06/2016 पर्यंत असून सदरील जिल्हा परिषद उपकरातुन साथ रोग नियंत्रण अतंर्गत औषधी खरेदीस दिलेल्या प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता विहित कालावधीत पूर्ण करून, औषधी खरेदीचे आदेश देणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही केलेली नाही.

अतिरिक्त आयुक्त, पशुसवंर्धन विभाग यांचे पत्र जावक क्रमांक डीडीडी/326/1256/2014/पसं-12.औंध पुणे 7, दिनांक 25/11/2014 यांचे दरकरारातील अट क्रमांक 2 तसेच खात्याचे पत्र क्रमांक.डीडीडी/305/334/पसं-12 दिनांक 25/03/2014 अन्वये सूची केली नुसार औषधाची गुणवत्ता तपासणी झाल्याची खात्री करुनच दर करारस कंपनीस देयके अदा करण्यात यावी. परंतु तिरुपती ट्रेड लिंक नागपूर यांचेकडून प्राप्त औषधीची गुणवत्ता तपासणी न करताच देयकाचे प्रदान केले असल्याचे दिसून आले.

पशुवैद्यकीय दवाखान्यास पुरवठा केलेली औषधी हॉस्पीटल मॅन्युअल खंड1 चाप्टर 25 परिच्छेद 8 प्रमाणे साठा नोंदवहीत बाबनिहाय औषधांच्या परिभाषा व तपशील नमुद करणे आवश्यक आहे परिपूर्ण नोंदी न घेता मात्र प्राप्त साठा संख्या घेतलेली आहे.

पुरवठा केलेल्या औषधीचे प्रत्यक्ष वापरानंतर त्या बाबत सादर केलेला अहवाल संचिकेत नाही.

महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समीती लेखा सहींता 1968 मधील नियम 98 नुसार सक्षम प्राधिकाऱ्याने साठा नोंदवहीतील शिल्लक व भांडारातील शिल्लक याची पडताळणी करुन अभिप्राय नोंदविणे आवश्यक आहे अशी कार्यवाही झालेली नाही.

**3.784 जिल्हा वार्षिक योजनेतून औषध खरेदी व पुरवठा करणेबाबत**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जालना यांनी जिल्हा वार्षिक योजनेतून औषध खरेदी व पुरवठा करणेबाबत रक्कम रूपये 34,91,076/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 20 नुसार पुरवठादारास साहित्य पुरवठाबाबत रक्कम प्राप्त झाल्याची पोच पावती लेखापरीक्षणास दाखवली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 79 नुसार प्रत्यक्ष देण्यात आलेली पुरवठा देयक दुबार वापरली जावु नये म्हणुन ती विरुपीत केली पाहिजे परंतु, ती विरुपीत केलेली नाही.

3) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास/1091/प्र.क्र. 921/34, दिनांक 31/07/1991 अन्वये योजनेचे वेळापत्रक निश्चित केले असुन वेळा पत्रकाचे पालन केले नसल्याचे दिसुन येते.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 91 नुसार दर सहा महिन्यांनी पशु वैद्यकीय केंद्रातील साठा नोंदवहीची शिल्लक कार्यालय प्रमुखाने तपासणी करणे आवश्यक आहे. तशी तपासणी केली नाही.

5) विभागाने नमुना क्रमांक14 खर्च वर्गीकरण नोंदवही ठेवली नसल्याने नोंदीबाबत खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 199 अन्वये क्षेत्रिय कार्यालयाकडील औषध साठाची तपासणी करुन शिल्लक विनियोग बरोबर असल्याचे प्रमाणपत्र घेतले नाही.

**3.785 विशेष घटक योजने अंतर्गत जंतनाशक औषधी खरेदी बाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** विशेष घटक योजने अंतर्गत जंतनाशक औषधी खरेदीकरिता रक्कम रूपये 19,99,946/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेचे लाभधारक मागासवर्गीय अनुसूचीत जातीचा असावा. लाभधारकाकडील जनावरांस वर्षभरात दोनवेळा जंतनाशकांचा पुरवठा करण्यात यावा अशी तरतुद आहे परंतु जिल्हाभरात असणाऱ्या अनुसूचीत जाती लाभार्थ्यांकडे किती पशुधन उपलब्ध आहे याबाबतचा तपशिल संचिकेत संलग्न केलेला नाही. त्यामुळे नोंदविण्यात आलेली जंतनाशकाची मागणी योग्य आहे किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात खातरजमा होत नाही.

2) कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्सवसाय विकास व मत्स्य व्यवसाय, विभाग शासन निर्णय क्रमांक डिआएएस-2009 / प्र.क्र.435 / पदुम - 4, दिनांक 05/03/2010 नुसार औषधी मागणी अधिकाऱ्यांनी रुपये 5,000/- किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या खरेदी केलेल्या औषधाची गुणवत्ता अन्न व औषधी प्रशासन विभागाकडील मान्यता प्राप्त प्रयोग शाळेकडुन तपासणी करावी अथवा सदरच्या औषधाच्या बॅच महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाच्या इतर अधिकाऱ्यांनी विहीत पध्दतीने गुणवत्ता तपासणी करुन घेतली असल्यास त्याची खात्री करुन त्याबाबतचा लेखी पुरावा संग्रही ठेवून त्यानंतरच देयकाची अदायी करणे बाबत आदेश आहेत परंतु उपरोक्त प्रकरणी सदर आदेशाचे पालन केलेबाबत दिसून आले नाही.

3) उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 22 नुसार पशुवैदयकीय संस्थाना पुरवठा केलेल्या औषधींचा ती वापरल्याचा तीमाही अहवाल घेण्यात यावा असे आदेशित आहे. परंतु उपरोक्त प्रकरणी अशी कार्यवाही अनुसरल्याचे दिसून येत नाही.

4) तांत्रीक मान्यता आदेशातील अट क्रमांक 4 नुसार जंतनाशक पुरविण्यापूर्वी व जंतनाशक पुरविल्यानंतर जनावरातील जंत प्रादुर्भावाची स्थिती तपासणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही अनुसरण्यात आलेली नाही.

5) गुणवत्ता चाचणी अहवाल देयकासोबत / संचिकेस संलग्न केलेला नाही. त्यामुळे देयकाचे केलेले प्रदान योग्य असलेबाबत लेखापरीक्षणात खातरजमा होत नाही.

6) गॅलक्सी फार्मा यांचे क्रेडीट मेमो क्रमांक 169, दिनांक 26/08/2016 हे रुपये 19,99,946/- एवढया रकमेचे आहे. परंतु सिफलॉन ड्रग्ज हैद्राबाद यांनी गॅलक्सी फार्मा यांना पाठविलेले टॅक्स इनव्हाईस (संचिकेस संलग्न आहे) क्रमांक 438, दिनांक 03/09/2016 व क्रमांक 437, दिनांक 3/09/2016 या दोन टॅक्स इनव्हाईस ची एकूण बेरीज रुपये 14,75,377/- इतकी आहे. म्हणून औषधाची एकूण किंमत रुपये 14,75,377/- इतकी असताना रुपये 19,99,946/- एवढया रकमेचे देयक पारीत झालेले आहे. म्हणून रुपये 19,99,946/- एवढया रकमेने देयक पारीत करण्याचे प्रयोजन काय ? याबाबत विभागाने खुलासा करणे आवश्यक आहे.

7) गॅलक्सी फार्मा यांचे क्रेडीट मेमो क्रमांक 169, दिनांक 26/08/2016 नुसार बॅच क्रमांक FNMH-71 ते 81 या बॅचची औषधी पुरविली आहे. परंतु सिफलॉन फार्मा ड्रग्ज यांचे टॅक्स इनव्हाईस क्रमांक 438, दिनांक 03/09/2016 नुसार बॅच क्रमांक FNMH-77 ते 81 या बॅचची Manufacturing date ही सप्टेंबर 2016 अशी आहे. म्हणजेच सप्टेंबर 2016 या महिन्यात तयार होणाऱ्या बॅचचा संदर्भ दिनांक 26.08.2016 च्या क्रेडीट मेमो मध्ये

कसा नमुद करण्यात आला ? या विसंगतीबाबत योग्य त्या अभिलेख्यांसह शहानिशा / कारणमीमांसा होणे आवश्यक आहे.

8) तालुकास्तरावरील प्राप्त मागणी पत्रकाप्रमाणे पुरवठा करण्यात आलेला नाही मागणीपेक्षा कमी/ जास्त पुरवठा करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे मागणी पत्रकामध्ये मागणीच्या संख्येत खाडाखोड करण्यात आलेली आहे, परंतु या खाडाखोडी साक्षांकीत केलेल्या नाहीत. त्यामुळे या मागणी पत्रकाप्रमाणे करण्यात आलेली खरेदी आवश्यक तेवढी होती किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात खातरजमा करता आली नाही. उदाहरणार्थ केज तालुक्याची मागणी 1600 नग बॉटल्स असताना त्यांना 2200 नग बॉटल्सचा पुरवठा करण्यात आलेला आहे व बीड तालुक्याची मागणी 2500 नग बॉटल्सची असताना त्यांना 2200 नग बॉटल्सचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

9) पुरवठा आदेशाचा दिनांक 29/06/2016 असा असून औषधी पुरवठा करण्याचा कालावधी पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत असा आहे. परंतु प्रत्यक्ष औषधी प्राप्त दिनांक 05/09/2016 असल्याने पुरवठकारास औषधी पुरवठा करण्यास 1 आठवडा विलंब झालेला आहे. म्हणून भावबंद दरकरारातील अट क्रमांक 12 नुसार विलंबाबाबत प्रती आठवडा एकूण रकमेच्या 0.5% रक्कम रुपये 10,000/- दंड म्हणून देयकातुन कपात करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणी दंडाची रक्कम कपात करण्यात आलेली नाही. तरी आता दंडाची रक्कम रुपये 10,000/- संबंधीताकडून वसुलपात्र ठरते.

10) औषधी साठा प्राप्त दिनांक 05/09/2016 आहे परंतु वाटप मात्र दिनांक 16/01/2017 रोजी (साठा नोंदवहीतील पान क्रमांक 52 वरील नोंदींनुसार) केलेले आहे. यावरुन औषधी साठा 4 महिने 10 दिवस एवढया विलंबाने तालुकास्तरावर वाटप करण्यात आलेला आहे असे दिसून येते.

11) महाराष्ट्र शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक डी.पी. आर/ 1088/सीआर/79630, दिनांक 26/06/1989 अन्वये ज्या वित्तीय वर्षात औषधी खरेदी केली आहे त्याच वर्षात विनियोग करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

12) योजनेबाबत व्यापक अशी प्रसिध्दी केलेबाबतची अभिलेखे संचिकेत संलग्न केलेली नाही. त्यामुळे योजनेची व्यापक प्रसिध्दी केली किंवा कसे याबाबत लेखापरीक्षणात पडताळणी करता आली नाही.

13) फलश्रुती अहवाल संचिकेस संलग्न केलेले नाहीत.

### 3.786 जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत जिवरक्षक औषधी खरेदी बाबत

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत जिवरक्षक औषधी खरेदीकरिता रक्कम रूपये 79,45,375/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिवरक्षक औषधांची तालुक्यांकडील प्राप्त मागणी व केलेली एकूण खरेदी यांचा हिशेब जुळत नाही तालुक्यांना वर्षभरासाठी लागणाऱ्या औषधांच्या एकूण मागणीपेक्षा जास्तीची खरेदी केलेली आहे. उदाहरणार्थ Inj. Dexamethasone 4mg/ml (10ml) या औषधीची मागणी (सन 2016-17 मधील) 12450 नग असताना एकूण खरेदी मात्र 20000 नग आहे. तसेच तालुक्यांनी केलेल्या मागणीपेक्षा त्यांना जास्तीचे वाटप केलेले आहे. उपरोक्त औषधाची सन 2015-16 या वर्षातील खरेदी करण्यासाठी दिनांक 22/02/2016 रोजी पुरवठा आदेश दिलेले असून त्यानुसार 20000 नग प्राप्त झालेले असतानाही पुनःश्च सन 2016-17 मधील खरेदीसाठी दिनांक 29/06/2016 रोजी पुरवठा आदेश (20000 नगाचे) दिलेले आहेत. म्हणजेच मागणीचा विचार न करता केवळ प्राप्त अनुदान खर्ची टाकण्यासाठीच अनावश्यक खरेदी प्रस्तावित केल्याचे दिसून येते.

2) आवश्यकतेपेक्षा जास्तीची औषधी खरेदी करुन पशुवैदयकीय दवाखान्याना वाटप केल्याने ती Expiry Date नंतरही वापराविना तशीच शिल्लक असल्याचे दिसून येते. हि बाब अतिशय गंभीर असून अशी Expiry Date नंतरची औषधी अनावधानाने वापरात येऊन अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उदाहरणार्थ. i) प.वै.दवाखाना येळंब श्रेणी 2 तालुका शिरुर या दवाखान्याचे साठा नोंदवहीनुसार लेखापरीक्षण कालावधीपर्यंत Inj. Dexamethasone (बॅच क्रमांक 4508/16, Expiry date 10/2017) या औषधाचे 20 नग शिल्लक असल्याचे दिसून आले.

ii) पशु वैद्यकीय दवाखाना मानुर श्रेणी 2 तालुका शिरुर या दवाखान्यात Inj. Dexamethasone (बॅच क्रमांक 4508/16, Expiry date 10/2017, औषधी प्राप्त दिनांक 16/01/2017 ) या औषधाचे 110 नग (साठा नोंदवही पान क्रमांक 13 नुसार) लेखापरीक्षण कालावधीपर्यंत शिल्लक असल्याचे दिसून आले.

iii) पशु वैद्यकीय दवाखाना मानुर श्रेणी 2 तालुका शिरुर या दवाखान्यात Inj. C.P.Maleate (50 ml) (बॅच क्रमांक 3608/16, 3708, 3808, 3908, Expiry date 10/2017, औषधी प्राप्त दिनांक 16/01/2017) हे औषध लेखापरीक्षण कालावधीपर्यंत पूर्णच्या पूर्ण म्हणजे 160 नग साहित्य साठा नोंदवहीत (साठा नोंदवही पान क्रमांक 9) वापराविना शिल्लक असल्याचे दिसून आले.

3) गुणवत्ता चाचणी अहवाल देयकासोबत / संचिकेस संलग्न केलेला नाही. त्यामुळे देयकाचे केलेले प्रदान योग्य असलेबाबत लेखापरीक्षणात खातरजमा होत नाही. उदा.Inj. DNS, Inj. Sodium Chloride, Inj. Compound Sodium Lactate, Inj. Calcium Boro Gluconate या औषधाचे गुणवत्ता चाचणी अहवाल संचिकेस / देयकास संलग्न केलेले नाहीत.

4) कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्सवसाय विकास व मत्स्य व्यवसाय, विभाग शासन निर्णय क्रमांक डिआएएस-2009/प्र.क्र.435/पदुम - 4, दिनांक 05/03/2010 नुसार औषधी मागणी अधिकाऱ्यांनी रुपये 5,000/- किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या खरेदी केलेल्या औषधाची गुणवत्ता अन्न व औषधी प्रशासन विभागाकडील मान्यता प्राप्त प्रयोग शाळेकडुन तपासणी करावी अथवा सदरच्या औषधाच्या बॅच महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाच्या इतर अधिकाऱ्यांनी विहीत पध्दतीने गुणवत्ता तपासणी करुन घेतली असल्यास त्याची खात्री करुन त्याबाबतचा लेखी पुरावा संग्रही ठेवून त्यानंतरच देयकाची अदायी करणे बाबत आदेश आहेत. परंतु उपरोक्त प्रकरणी सदर आदेशाचे पालन केलेबाबत दिसून आले नाही.

5) उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 22 नुसार पशुवैदयकीय संस्थाना पुरवठा केलेल्या औषधींचा ती वापरल्याचा तीमाही अहवाल घेण्यात यावा असे आदेशित आहे. परंतु उपरोक्त प्रकरणी अशी कार्यवाही अनुसरल्याचे दिसून येत नाही.

6) Inj. Oxytetracyclin या औषधाचे टॅक्स इनव्हाईस नुसार या औषधाचे बॅच क्रमांक I-11014 या बॅचचे 3744 नग पुरवठा केलेला असताना व बॅच क्रमांक I-11007 या बॅचचे 3672 नग पुरवठा केलेला असताना साठा नोंदवही (सन 2015-16 ची साठा नोंदवही) पान क्रमांक 66 वरील नोंदींनुसार या दोन्ही बॅचचे प्रत्येकी 10000 नग प्राप्त झालेबाबत नमुद आहे. म्हणजेच या दोन्ही बॅचचे अनुक्रमे 3744 व 3672 नग प्राप्त झालेले असताना साठा नोंदवहीवर मात्र प्रत्येकी 10000 नग जमेस घेण्यात आलेले आहेत. ही बाब अतिशय गंभीर असून या विसंगतीबाबत अभिलेख्यांसह खुलासा होणे आवश्यक आहे.

7) तसेच उपरोक्त औषधीचा साठा नोंदवहीतील नोंदीनुसार बॅच क्रमांक I-11023 या बॅचचे 8000 नग प्राप्त झालेचे दर्शविण्यात आलेले आहे. परंतु टॅक्स इनव्हाईसनुसार या बॅच क्रमांकाच्या औषधाचा पुरवठाच झालेला नाही या विसंगतीबाबत अभिलेख्यांसह खुलासा होणे आवश्यक आहे.

8) Inj. Compound Sodium Lactate या औषधाचे 16MH17P014, P015 व P016 या बॅच क्रमांकाचे औषधी पुरवठा असताना साठा नोंदवहीवर (पान क्रमांक 64) केवळ बॅच क्रमांक 16MH17P014 ही एकच बॅच नमुद केलेली आहे. सर्व बॅचेसचे क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

9) पुरवठा आदेश क्रमांक 162, दिनांक 22/02/2016 (Inj. Oxytetracyclin) बाबत प्रत्यक्ष पुरवठा दिनांक 25/06/2016 (साठा नोंदवहीचे पान क्रमांक 66 नुसार) आहे. सदरबाबत पुरवठाकाराने 8 आठवडे विलंबाने पुरवठा केलेला आहे. म्हणून भावबंद दर करारातील अट क्रमांक 12 नुसार विलंबाबाबत प्रती आठवडा एकूण रकमेच्या 0.5% रक्कम दंड म्हणून कपात करणे आवश्यक आहे. म्हणून सदर प्रकरणी दंडाची एकूण रक्कम रुपये 44,592/- संबंधीताकडून वसुलपात्र ठरते.

10) त्याचप्रमाणे पुरवठा आदेश क्रमांक 163, दिनांक 22/02/.2016 (Inj. Calcium Boro Gluconate व Inj. Compound Sodium Lactate ) बाबत प्रत्यक्ष पुरवठा दिनांक 24/05/2016 (साठा नोंदवहीचे पान क्रमांक 65 नुसार) असा आहे. त्यामुळे सदरबाबत पुरवठाकाराने 4 आठवडे विलंबाने पुरवठा केलेला असल्याचे दिसून येते.

म्हणून भावबंद दर करारातील अट क्रमांक 12 नुसार विलंबाबाबत प्रती आठवडा एकूण रकमेच्या 0.5% रक्कम दंड म्हणून कपात करणे आवश्यक आहे. म्हणून सदर प्रकरणी दंडाची एकूण रक्कम रुपये 19,618/- संबंधीताकडून वसुलपात्र ठरते.

11) महाराष्ट्र शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक डी.पी. आर/1088/सीआर / 79630, दिनांक 26/06/1989 अन्वये ज्या वित्तीय वर्षात औषधी खरेदी केली आहे त्याच वर्षात विनियोग करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणी याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.787 लाळ खुरकुत रोगाचे नियंत्रण आणि रोगमुक्त पटटा निर्माण करणे योजनेवर नोदविलेल्या खर्चा बाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** लाळ खुरकुत रोगाचे नियंत्रण आणि रोगमुक्त पट्टा निर्माण करणे FMD CP केंद्र पुरस्कृत योजनेमधुन सामुग्रीवर रक्कम रूपये 4,71,999/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त औरंगाबाद यांनी प्रदान केलेल्या तांत्रीक मान्यता आदेशातील अनुक्रमांक 1 नुसार सदरचे अनुदान हे सन 2014-15 अंतर्गत 24032412 या लेखाशिर्षांतर्गत प्राप्त आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 6 जुन 2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील आर्थिक वर्षात वापरता येईल व त्यानंतर अखर्चित राहिलेला निधी स्वायत्त संस्थानी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. त्यानुसार सन 2014-15 या वर्षासाठी प्राप्त झालेला निधी लगतच्या वर्षात म्हणजेच सन 2015-16 मध्ये दिनांक 31/03/2016 पर्यंतच खर्च करण्याची परवानगी आहे. तद्नंतर अखर्चित राहीलेला निधी शासनास परत करणे आवश्यक आहे. परंतु उपरोक्त प्रकरणी सन 2014-15 मध्ये प्राप्त झालेला निधी सन 2016-17 मध्ये खर्ची टाकण्यात आलेला आहे. सदर बाब नियमबाहय आहे.

2) प्रशासकीय मान्यता आदेशात जावक क्रमांक व दिनांक नमुद नाहीत.

3) तालुक्यांकडून प्राप्त झालेल्या मागणीपत्रानुसार 5ml Dispo syringe ची एकूण मागणी 85500 नग असताना खरेदी मात्र एकूण 125555 नग केलेली आहे. यावरुन अनावश्यकपणे मागणीपेक्षा जास्तीची खरेदी केल्याचे दिसून येते. तालुक्यामार्फत आलेल्या मागणीपेक्षा कमी/जास्त वाटप केलेले आहे. उदाहरणार्थ गेवराई तालुक्याची मागणी नसतानाही त्यांना 10000 नग (5ml) वाटप केलेले आहेत. पाटोदा तालुक्याची मागणी 8000 नग (5ml) असताना त्यांना 11200 नग (5ml) पुरवठा केलेला आहे. तसेच केज तालुक्याची मागणी 17000 नग असताना त्यांना 16000 नग (5ml) पुरवठा केलेला आहे. माजलगाव व अंबेजोगाई यांचे मागणीपत्रकात मागणी संख्येत खाडाखोड केलेली आहे.

4) प्रमाणक क्रमांक 108 चे बाबतीत पुरवठा आदेश दिनांक 17/03/2016 चे असून प्रत्यक्ष पुरवठा दिनांक 25/05/2016 या दिनांकास झालेला आहे. म्हणून पुरवठा 1 आठवडा विलंबाने झालेला असल्याने भावबंद करारातील अटीनुसार एकूण खरेदी रकमेवर प्रतीआठवडा 0.5% प्रमाणे दंडाची रक्कम रुपये 1,510/- कपात करणे आवश्यक आहे. याबाबत दंडाची रक्कम रुपये 1,510/- संबंधीताकडून वसुल करुन योग्य त्या लेखाशिर्षात भरणा करून अनुपालन दर्शवावे.

5) योजनेच्या मार्गदर्शक सुचना दिनांक 18/01/2016 मधील सुचना क्रमांक 34 नुसार सर्व बाबींवर खर्च करणे आवश्यक असताना केवळ Dispo Syringe खरेदी केलेली आहे.

6) साहित्याचे गुणवत्ता चाचणी अहवाल संचिकेस / देयकास संलग्न केलेले नाहीत. परंतु तरीही देयकाचे पूर्ण प्रदान केलेले आहे.

**3.788 जिल्हा परिषद स्वउत्पन्न मधून लाळया खुरकुत रोगाचे नियंत्रणासाठी औषधी खरेदीवर नोदविलेल्या खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** लाळखुरकुत रोगाचे नियंत्रण आणि रोगमुक्त पटटा निर्माण करणे FMD CP साठी जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पन्नातुन सामुग्रीवर रक्कम रूपये 4,99,995/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पत्र क्रमांक डीडीडी/452/15/15-16/प.सं-12,पुणे-7, दिनांक 04/01/2016 च्या दरकरार मजुंरीतील अटी व शर्तीनुसार जिल्हास्तरीय औषधी मागणी करणेपुर्वी त्यांचे अधिनस्त पशुवैदयकीय दवाखान्याकडुन मागणी घेण्यात आली. एकत्रित गोषवारा काढलेला नाही. त्यामुळे मागणीनुसार खरेदी झाल्याची खात्री करता आली नाही.

2) पंचायत समिती स्तरावरून 140 दवाखाने यांचेकडून प्राप्त मागणीपत्रामद्धे नमूद नसताना खरेदी केळ्याचे दिसून आले. प्राप्त अनुदान खर्ची टाकण्याच्या उदेश्याने सदरील औषधी खरेदी केल्याचे दिसून येते.

उदाहरणार्थ 1.ceftriaxone+salbactum4.5gm@75.96*3000=2,27,880/- ही औषधी तालुक्यांकडून प्राप्त झालेल्या मागणीपत्रकामध्ये नमुद नसतानाही खरेदी करण्यात आलेली आहे. वरील प्रकारे करण्यात आलेल्या खरेदीबाबत प्राधिकार दर्शवून अनुपालन सादर करावे

3) पशुवैद्यकीय दवाखान्यास पुरवठा केलेली औषधी हॉस्पीटल मॅन्युअल खंड 1 चाप्टर 25 परिच्छेद 8 प्रमाणे साठा नोंदवहीत बाबनिहाय औषधांच्या परिभाषा, मुदतबाहय दिनांक व तपशील नमुद करणे आवश्यक आहे. परंतु अशा नोंदी घेतलेल्या नाहीत.

4) पुरवठा केलेली औषधी वापरानंतर उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आल्याचे दिसून आले नाही

5) प्र.क्र.64, दिनांक 18/01/2017 सेलवेल, इंदौर यांना पुरवठा आदेश 725, दिनांक 29/06/2016 नुसार 29/06/2016 ते 29/08/2016 (60 दिवसामध्ये) पुरवाठा होणे आवश्यक असताना प्रत्यक्ष दिनांक 04/11/2016 रोजी प्राप्त झाल्याचे कुरियर associatedroadcarriers,पावती क्रमांक 4000339924 वरून दिसून येते तरी प्रति आठवडा 0.5% दंड नुसार 4 आठवडा साठी रुपये 1,976/-वसूलपात्र ठरतात.

6) प्रकरण 44, दिनांक 17/01/2017, alliancebiotech, पंचकुला यांना पुरवठा आदेश 726, दिनांक 29/06/2016 नुसार दिनांक 29/06/2016 ते 29/08/2016 (60 दिवसामध्ये) पुरवठा होणे आवश्यक असताना प्रत्यक्ष 14/12/2016 रोजी प्राप्त झाल्याचे indeeptransways,पावती क्रमांक 11813 वरून दिसून येते तरी विलंबाने पुरवठा करण्यासाठी प्रति आठवडा 0.5% दंड नुसार 5 आठवडा साठी रुपये 1,598/- वसूलपात्र ठरतात.

7) औषधी पुरवठा केल्यानंतर क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून उपयोगीता प्रमाणपत्र घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झाली नाही.

**3.789 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना कडबाकटर यंत्र 3 एच.पी.इलेक्ट्रिक मोटारसह खरेदी करून पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद परभणीच्या सन 2016-2017 या वितीय वर्षाच्या लेखापरीक्षणात विभागाने जिल्हा परिषद उपकर योजनेअंतर्गत 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना 2 प्रमाणकाअन्वये रक्कम रुपये 37,30,825/- चे कडबाकटर खरेदी करून वाटप केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/645/366/34, दिनांक 29/07/1989 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेचे मूल्यमापन तीन स्तरावर करणे आवश्यक आहे. परंतु, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद परभणी यांनी अशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे सदर योजना राबविल्यामुळे लाभार्थ्यांचा काय फायदा झाला, याबाबतची पडताळणी करता आली नाही. तसेच सदर योजना यापूर्वी देखील राबविण्यात आली होती. त्याचा अनुभव काय होता व त्याचा लाभार्थ्यांना कितपत फायदा झाला, याबाबतची कोणतीच अभिलेखे न दर्शविल्यामुळे पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2012/प्र.क्र.104/ वित्त-3 दिनांक 16/10/2012 अन्वये जिल्हा परिषदांनी साहित्याची खरेदी करताना खरेदी प्रक्रिया ही पारदर्शी पद्धतीने होण्या संदर्भात खालील मुद्यांवर काटेकोरपणे कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत:-

(i) जे साहित्य खरेदी करावयाचे आहे त्याच्या गुणवत्तेबाबत खात्री करावी.

(ii) सदर साहित्याची बाजारभावापेक्षा जास्त दर नसल्याची खात्री करावी.

(iii) साहित्य हे सुस्थितीत व मापदंडाप्रमाणे असल्याची खात्री करून त्याची संबंधित कार्यालयाकडून तांत्रिक तपासणी करून घावी. परंतु, अशी उचित कार्यवाही केलेचे अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

3) जिल्हा परिषद स्तरावर लाभार्थ्यांना देय व देण्यात आलेल्या लाभधारकांची नोंद लाभार्थी मास्टर नोंदवहीत घेऊन सदर नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, पशुसंवर्धन विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

4) विभागाने पूर्णा तालुक्यातील 17 लाभार्थ्यांची 50 टक्के लाभार्थी हिश्याची रक्कम रूपये 2,58,125/- वित्त विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांचेकडे धनाकर्षाने जमा केलेली आहे. परंतु, वित्त विभागाने सदर लाभार्थी हिश्यांची रक्कम रूपये 2,58,125/- अद्यापपर्यंत महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, नांदेड यांना प्रदान केलेली नाही. तरी सदर रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे.

5) योजनेच्या अंमलबजावणीनंतर लाभार्थी शेतकऱ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्यात आलेली नाहीत. तसेच योजना अंमलबजावणी नंतर योजनेचा फलश्रुती अहवाल निर्गमित केलेला नाही

**3.790 शेतक-याच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष मदतीचा कार्यक्रम राबविणे अंतर्गत पशु आरोग्य दाखले तयार करणेवरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** उस्मानबाद जिल्हयातील शेतक-याच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष मदतीचा कार्यक्रम राबविणे अंतर्गत पशु आरोग्य दाखले तयार करुन पुरवठा करणेसाठी गजानन प्रिटींग प्रेस,उस्मानाबाद यांना पुरवठा आदेश देण्यात येवुन त्यावर रक्कम रुपये 299998/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महसुल व वनविभाग शा.नि. क्र. एससीवाय-2015/प्रक्र.119/म-7(भाग-2) दिनांक 24/07/2015 नुसार शेतक-याच्या आत्महत्या रोखण्यासाठी पथदर्शी प्रकल्प म्हणुन विशेष मदतीचा कार्यक्रमतर्गत शेतक-यांचे मनोबल उंचावणे व शेतक-याच्या मनामध्ये जगण्यासाठी प्रेरणा निर्माण करणारे साहित्य निर्मिती करुन प्रोत्साहन देणे आवश्यक आहे तथापि आरोग्य दाखल्याची छपाई करुन पंस स्तरावर वाटप करण्यात आल्याने बळीराजा चेतना अभियानाचे उदिष्ट साध्य झालेले नाही.

2. महसुल व वनविभाग शा.नि. क्र. एससीवाय-2015/प्रक्र.119/म-7(भाग-2) दिनांक 24/07/2015 नुसार शेतक-याच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष मदतीचा कार्यक्रम राबविणेबाबत पशुसंवर्धन विभागामार्फत करावयाच्या उपाययोजनांना देण्यात आलेल्या मंजुरीप्रमाणे उपाययोजना न करता पशु आरोग्य दाखले तयार करणेवर रक्कम खर्च करण्यात आली आहे.

3. उस्मानाबाद जिल्हयातील तालुकानिहाय त्रस्त कुटुंबाची संख्या 10136 व वितरीत आरोग्य दाखले 157894 आहेत.

उस्मानाबाद जिल्हयात 10136 त्रस्त कुटुंबे असुन या त्रस्त कुटुंबाकडील जनावरांसाठी दाखल्यांची छपाई करुन वितरीत करण्यापुर्वी त्रस्त कुटुंबाकडे असलेल्या जनावरांचा सर्व्हे न करता किंवा याबाबतची कुठलीही माहिती संकलित न करता व पंस स्तरावरुन त्यानुसार दाखल्याची मागणी घेण्यात आली नाही.त्यामुळे अनावश्यक दाखल्यांची छपाई करुन उपलब्ध तरतुदीच्या अधिन राहुन रक्कम खर्च करण्यात आली आहे.अर्धसमास पत्र क्र.02 दिनांक 08/12/2017 नुसार त्रस्त कुटुंबाकडील किती जनावरांचे दाखले निर्गमित करण्यात येवुन केलेल्या नोंदीबाबतचा तपशिल व शिल्लक दाखले मागणी करुनही दर्शविण्यत आले नाहीत.तसेच त्रस्त कुटुंबाकडील

पशुधनाव्यतिरिक्त इतर पशुधनासाठी विनियोग केलेल्या दाखल्यांची माहिती अर्धसमास पत्रान्वये मागणी करुनही दर्शविण्यात आली नाही.

4. उदयोग, उर्जा व कामगार विभाग शानि. क्र.भांखस-1088/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग -4 दिनांक 01/12/2016 मधील परिच्छेद 3.2.3(ड) नुसार दरपत्रकाच्या आधारे खेरेदी करतांना निविदाकाराकडुन त्याचा VAT/CST क्रमांक घेण्यात यावा. VAT/CST क्रमांक लागु नसल्यास तत्सम प्राधिकरणकडील नोंदणी क्रमांक असलेल्या निविदाकाराच्या लेटरहेडवर दरपत्रक घेण्यात येवुन संबधित निविदाकाराचे पॅनकार्ड घेणे आवश्यक आहे.तथापि एकाच निविदाकराचे पॅनकार्ड घेण्यात येवुन दरपत्रके उघडण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

5. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 नुसार पशुसंवर्धन दाखले पांढ-या रंगाच्या हॅण्डमेड पेपरवरती,वजन 730 कि.ग्रॅ. प्रती रिम, 170 GSM चा वापरणे बंधनकारक आहे. उक्त शासन निर्णयातील 4.7 नुसार पुरवठयाच्या ठिकाणी माल पोहचताच मालाचे त्वरीत निरीक्षण करणे आवश्यक आहे. मालाची तपशिलवार तपासणी केल्याशिवाय व माल विनिर्देशाप्रमाणे आहे याची खातरजमा झाल्याशिवाय देयकाचे प्रदान करण्यात येवु नये.तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

6. स्विकृत निविदेचे दर हे प्रती हजारी असतांना त्याप्रमाणे पुरवठा आदेश न देता प्रती नग पुरवठयाचे आदेश देण्यात आले.आरोग्य दाखले छपाईचा दर हा प्रती हजारी रुपये 1900 असतांना उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत 157000 नगाचा पुरवठा करणेबाबत आदेश देण्यात आले नाहीत.केवळ अनुदान खर्च करण्याचे उदेशाने 894 नगासाठीची रक्कम रुपये 1699 वसुल करुन शासन खाती भरणा करावी.

**3.791 75 % अनुदानावर 2 HP कडबाकुटी यंत्र वाटपातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2016-17 मध्ये जिल्हा परिषद उपकरातुन खात्याच्या भावबंद करारानुसार शेतक-यांना 75 % अनुदानावर 2 HP विदयुत चलीत यंत्राचा पुरवठा करणेसाठी कडबा कुटी यंत्राची खरेदी करण्यात येवुन त्यावर रक्कम रुपये 1999500/- एवढा खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जल संधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार लाभार्थ्यांचे दृष्टीने लाभादायक स्वरुपाची कोणतीही योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंची खरेदी करण्यापुर्वी लाभार्थ्यांच्या निवडीची प्रक्रीया, योजनेस प्रसीध्दी देवून, ग्रामसभेच्या शिफरशीने आलेल्या अर्जातून विहीत निकषानुसार निवड करुन सर्वार्थाने पुर्ण करावी व लाभार्थ्यास वस्तूंचे वाटप त्याच वित्तीय वर्षात व विहीत वेळेत होईल अशा प्रकारे योजना राबवावयाची आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2. ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्रंमाक 1084/सीआर 1633/57,दिनांक 19.01.1985 नुसार प्रथम लाभार्थी हिस्सा वसूल झाल्याशिवाय योजना कार्यान्वीत करु नये असे आदेश असताना लाभार्थी हिस्सा जमा न करताच योजना कार्यान्वीत करण्यात आली.

3. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जल संधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक 1082/645/366/34, दिनांक 29/07/1989 अन्वये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणा-या योजनेचे मुल्यमापन तीन स्तरावर करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे सदर योजना राबविल्यामुळे लाभार्थ्यांचा काय फायदा झाला याबाबत पडताळणी करता आली नाही.

4. ग्रामविकास विभागाचे परिपत्रक क्रंमाक मागास 1089/प्र.क्रं.44/34, दिनांक 05.10.1989 नुसार लाभार्थीचे लाभाबाबत गावनिहाय व जातनिहाय मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ दिला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.पंरास2012/प्र.क्र104/वित्त-3 दिनांक 16.10.2012 नुसार जिल्हा परिषदेच्यावतीने खरेदी करण्यात येणा-या सामग्री विषयक दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हा परिषदेने यंत्रसामग्री तथा वस्तु खरेदी करतांना खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

अ) जिल्हा परिषदेने योजना राबवितांना विषय समितीच्या सभेमध्ये लाभार्थीची यादी निश्चित करावी व त्यास मान्यता घ्यावी.

ब) जी यंत्रसामग्री खरेदी करावयाची आहे त्याच्या गुणवत्तेबाबत खात्री करावी

क) सदर यंत्रसामग्रीची बाजारभावापेक्षा जास्त दर नसल्याची खात्री करावी

ड) यंत्रसामग्री सुस्थितीत व मापदंडाप्रमाणे असल्याची खात्री करावी व तसेच त्याची संबधित कार्यालयाकडुन तांत्रिक तपासणी करुन घ्यावी.

इ) खरेदी प्रकिया सुरु करतांना ती कोणत्याही परिस्थीतीत शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार असावी.

पशुसंवधर्न विभागाने साहित्य खरेदी करतांना वरील बाबीची पुर्तता न करता व उदयोग उर्जा व कामगार विभाग उदयोग,उर्जा व कामगार विभाग शानि. क्र.भांखस-1088/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग -4 दिनांक 01/12/2016 नुसार साहित्य सामग्री खरेदीसाठी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही.

6. अतिरिक्त आयुक्त् पशुसंवर्धन पुणे यांचे भावबंद करार क्र.वैवि/व-16(21)/403-475/2015 दिनांक 23/01/2015 मधील अटी व शर्ती क्र.4 नुसार पुरवठा करण्यात येणा-या सर्व (100 %) विदयुतचलित कउबाकुटी यंत्राच्या गुणवत्तेबाबतची तपासणी भारतीय मानक प्रमाणक दर्जानुसार स्थानिक अभियांत्रिकी महाविदयालय /तंत्र निकेतन महाविदयालय या संस्थाकडुन करुन घेण्यात येवुन तपासणी अहवाल प्राप्त करुन घ्यावा.त्यानुसार स्थानिक अभियांत्रिकी महाविदयालय /तंत्र निकेतन महाविदयालयाकडुन तपासणी अहवाल न घेता शासकीय तंत्र निकेतन महाविदयालय कोल्हापुर यांचेकडुन अहवाल घेण्यात आला.सदर अहवाल क्र.3394 दिनांक 29/09/2016 नुसार पुरवठा केलेल्या 172 नग कडबा कुटी यंत्राची 100 % तपासणी 25/08/2016 ते 16/09/2016 या कालावधीत करण्यात आली आहे.तथापि वरीलांप्रमाणे नमुद कडबा कुटी यंत्र तपासणी कालावधीत प्राप्त झालेली नसतांना 100 % तपासणी कोणत्या आधारे करण्यात आली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

7. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पुरवठा आदेश क्र.जिपउ/पसंवि/तांत्रिक-2 /301/2016 दिनांक 30/06/2016 नुसार व खात्याच्या भावबंद करारातील अटी व शर्ती क्र. 09 च्या अधिन राहुन पुरवठा आदेशाच्या दिनांकापासुन 60 दिवसाचे आत गटस्तरावर कडबाकुटी यंत्र पुरवठयाचे आदेश देण्यात आले.सदरील अटीनुसार दिनांक दिनांक 29/08/2016 पर्यंत गटस्तरावर कडबाकुटी यंत्राचा पुरवठा करणे आवश्यक असतांना उस्मानाबाद, उमरगा, भुम, परंडा,व लोहारा यांना विलंबाने गटस्तरावर कडबाकुटी यंत्राचा पुरवठा झालेला आहे

8. खात्याच्या भावबंद करारातील अटी व शर्ती क्र. 10 नुसार 60 दिवसाच्या अवधीनंतर विलंबाने पुरवठा केल्यास संबधित पुरवठादाराकडुन एकुण मागणी किंमतीच्या 0.5 % प्रति आठवडा या प्रमाणे दंड आकारण्यात येईल.त्यानुसार वर नमुद विलंब दिवसासाठीची दंडाची रक्कम रुपये 24874 पुरवठादाराकडुन वसुल करुन जिप उपकरात जमा करावी.

9. खात्याच्या भावबंद करारातील अटी व शर्ती क्र. 13 नुसार प्राप्त झालेल्या कडबाकुटी यंत्राचा दर्जा भारतीय मानक प्रमाणकाच्या दर्जानुसार असल्याबाबतची खातरजमा करणे आवश्यक आहे.तथापि अशी खातरजमा करण्यात आली नाही किंवा याबाबतचा उल्लेख तपासणी अहवालात नमुद नाही.

10. खात्याच्या भावबंद करारातील अटी व शर्ती क्र. 11 नुसार पुरवठा देयकाची रक्कम ईसीएन/एनईएफटी प्रणालीदवारे अदा करावी.तथापि रेखित धनादेशादवारे रक्क्मेचे प्रदान करण्यात आल्याने भावबंद करारातील अटी व शर्तीचे पालन झालेले नाही.

**3.792 गुरांच्या छावण्या बंद पश्चात औषधांच्या नियमबाहय व विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता केलेल्या खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** टंचाईग्रस्त भागातील जनावरांच्या चा-याच्या प्रश्नावर मात करणेसाठी करावयाच्या उपाययोजनातर्गंत उस्मानाबाद जिल्हयातील टंचाईग्रस्त भागात आवश्यकतेनुसार जनावरांना सवलतीच्या दराने चारा उपलब्ध करुन देण्यासाठी छावण्या उघडण्याची परवानगी महसुल

व वनविभाग शा. नि. एससीवाय-2015/प्रक्र 248/म-7/दिनांक 20/08/2015 च्या शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधिन राहुन देण्यात आली.त्यानुसार जिल्हयात 94 छावण्या उघडण्यात येवुन या छावणीतील दाखल जनावरांना औषधी देण्याकरिता शासनाच्या भावबंद करारावर औषधांची खरेदी करण्यात येवुन त्यावर रुपये 1759978/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक डिआयएस 2009/प्रक्र.435/पदुम-4 दिनांक 5 मार्च 2010 मध्ये विहीत केलेल्या सुधारीत कार्यप्रणाली क्र.14 नुसार मागणीपत्रके एकत्रित करुन उपलब्ध निधीच्या अधिन राहुन त्यास संबधित प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त यांची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक आहे.तथापि तुळजापुर व कळंब तालुक्यासाठीची मागणीपत्रे नसतांना अशी पुर्णपणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2. खात्याच्या भावबंद करारातील अट क्र. 15 नुसार सर्व पशुवैदयकीय दवाखान्याचे प्रमुखांनी गेल्या 3 वर्षात उपचारासाठी आलेल्या पशुरुगणांच्या आजाराचा आढावा घेवुन लागणा-या औषधांची मागणी करणे आवश्यक आहे.तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

3. कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक डिआयएस 2009/प्रक्र.435/पदुम-4 दिनांक 5 मार्च 2010 मध्ये विहीत केलेल्या सुधारीत कार्यप्रणाली क्र.09 नुसार क्षेत्रीय स्तरावरील गरज,आवश्यकता व मागणी प्रस्ताव विचारात घेवुन शासन निर्णयात नमुद % वारीच्या प्रमाणात औषधांची खरेदी करण्यात आलेली नाही.

4. छावणीत दाखल झालेल्या जनावरांना औषधी पुरवठा करणेसाठी रुपये 20 लक्ष निधी दिनांक 31/03/2016 रोजी प्राप्त झलेला असतांना व वर नमुद केल्याप्रमाणे मागणी विहीत वेळेत प्राप्त होवुनही व खात्याचा भावबंद करार उपलब्ध असतांनाही छावण्या कार्यान्वीत कालावधीत औषधांची खरेदी करुन पुरवठा करणे अभिप्रेत असतांना विलंबाने पुरवठा आदेश देण्यात आले.त्यामुळे छावणी बंद पश्चात औषधांचा पुरवठा होवुन सदर औषधांचा विनियोग छावणीत दाखल जनावरांसाठी झालेला नाही.भावबंद कराराच्या मुदतीच्या (30/06/2016) अंतिमक्षणी केवळ अनुदान खर्च करण्याचे उदेशाने रक्कम खर्च करण्यात आली आहे.त्यामुळे ज्या प्रयोजनासाठी अनुदान वितरीत करण्यात आले त्या प्रयोजनार्थ रक्कमेचा विनियोग करण्यात न आल्याने निष्फळ खर्चाची रक्कम रुपये 1759978 वसूल करावी.

5. विषय समिती सभा दिनांक 21/04/2016 चे इतिवृत विषय क्र. 5 नुसार पशुधन छावणीसाठी रुपये 20 लक्ष तरतुद प्राप्त झाली असुन जिल्हयात सुरु असलेल्या चारा छावणीमधील पशुधनास दैनंदिन उपचार करणेसाठी औषधी खरेदी करुन पशुवैदयकीय संस्थेमार्फत पुरवठा करणेसाठी मान्यता दिलेली असतांना पंचायत समिती स्तरावर या औषधांचा विनियोग छावणी बंद पश्चात इतर जनावरासांठी करण्यात आल्याने महसुल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक एससीवाय-2015/प्रक्र 248/म-7/दिनांक 20/08/2015 शासन निर्णयातील अट क्रमांक ब (4) चे पालन झालेले नाही.

6. महसुल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक एससीवाय-2015/प्रक्र 248/म-7/दिनांक 20/08/2015 शासन निर्णयातील अट क्रमांक ब नुसार छावणीत दाखल केलेल्या जनावरांच्या नोंदी विहीत नमुन्याच्या नोंदवहीत घेण्यात येवुन छावणीतील जनावरांना आवश्यक ती औषधी दिल्याबाबतच्या नोंदी व लसीकरणच्या नोंदी सदर नोंदवहीत घेण्यात येवुन नोंदवहया अदयावत ठेवणे आवश्यक आहे.अर्धसमास पत्र क्र. 05 दिनांक 15/12/2017 नुसार नोंदवहीची मागणी करुनही दर्शविण्यात आली नाहीत.

7. खात्याच्या भावब्ंदकरारातील मार्गदर्शक सुचना 3 नुसार प्राप्त औषधांची गुणवत्ता तपासणी झाल्याची खात्री करुनच दरकरारीत कंपनीस देयके अदा करावीत.सुचना क्र. 14 नुसार निविदाकाराकडुन पुरवठा झालेल्या औषधांची गुणवत्ता आणि संख्यात्मक तपासणी झल्यानंतर प्राप्त औषध पुरवठयाची रक्कम अदा करावी. तथापि पुरवठा झालेल्या औषधांचा गुणवत्ता तपासणी अहवाल घेण्यात आला नाही.

8. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्रमांक डिआयएस 2009/प्रक्र.435/पदुम-4 दिनांक 5 मार्च 2010 मध्ये विहीत केलेल्या सुधारीत कार्यप्रणाली क्र.13 नुसार औषध

मागणी अधिका-यानी रुपये 5000 किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या खरेदी केलेल्या औषधांची गुणवत्ता अन्न व औषध प्रशासन विभागाकडील मान्यता प्राप्त प्रयोगशाळेकडुन तपासणी करावी अथवा सदरच्या औषधांची बॅच महाराष्ट्र राज्यातील पशुसंवर्धन विभागाच्या इतर अधिका-यानी विहीत पध्दतीने गुणवत्ता तपासणी करुन घेतली असल्यास त्याची खात्री करुन लेखी पुरावा संग्रही ठेवुन त्यानंतरच देयकाची अदायगी करावी. आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांनी निर्गमित केलेल्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेची नावे लेखापरीक्षणास दर्शविण्यात न आल्याने मान्यता प्राप्त शाळेतुनच गुणवत्ता तपासणी झाल्याबाबात खातरजमा होवु शकली नाही.

9. दरकरातील औषधांचा पुरवठा मागणी प्राप्त झाल्यापासुन संबधित निविदाकाराने 60 दिवसाच्या आत करणे बंधनकारक राहील.60 दिवसाच्या अवधीनंतर विलंबाने मागणी परवठा केल्यास संबधित निविदाकाराकडुन एकुण मागणी किंमतीच्या 0.5 % प्रति आठवडा याप्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात यावे. त्यानुसार विलंबाने केलेल्या औषधी पुरवठयाबाबत विलंब शुल्क परिगणित करुन रक्कम वसुल करावी व शासन खाती जमा करावी.

**3.793 पशुवैद्यकीय सेवा व पशु आरोग्य योजनेत्तर योजनेअंतर्गत औषधी व साधन सामुग्री खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद लातुर येथे सन 2016-2017 या वर्षात औषधे खरेदीवर रक्कम रुपये 9,97,907/- खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्धसमासपत्र क्रमांक 1, दिनांक 15/09/2017 अन्वये मागणी करुनही पंचायत समिती अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखान्याचे साठा नोंदवही, इत्यादी अभिलेखे लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आले नाहीत, त्यामुळे वाटप करण्यात आलेल्या साहित्याचा व औषधांचा वापर तालुक्यातील पशुरूग्णांसाठी करण्यात आला असल्याबाबत खातरजमा करता आली नाही.

2) जिल्हा परिषद अधिनस्त पशुवैद्यकीय दवाखान्यांकडुन आवश्यक औषधांची मागणी घेण्यात आलेली नाही. औषध पुरवठा भावबंद करार 2014-16 क्रमांक डीडीडी/326/1199/2014/पसं-12, दिनांक 25/11/2014 नुसार जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी औषधांची मागणी करण्यापुर्वी त्यांचे अधिनस्त पशुवैद्यकीय दवाखान्यांकडून आवश्यक औषधीची मागणी घ्यावी व त्यासाठी सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांचे प्रमुखांनी त्यांच्या दवाखान्यात गेल्या 3 वर्षात उपचारासाठी आलेल्या पशुरुग्णांच्या आजाराचा आढावा घेवुन लागणाऱ्या औषधांची मागणी करावी. परंतु याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) Sellwell pharmaceuticals ltd या पुरवठादार संस्थेस औषधांचा पुरवठा करणेबाबत पुरवठा आदेश क्र.298, दिनांक 30/06/2016 अन्वये देण्यात आले. औषध पुरवठा भावबंद करार नुसार सर्व दर करारातील बाबींचा पुरवठा मागणी प्राप्त झाल्यापासुन 60 दिवसांच्या आत करणे बंधनकारक राहील व 60 दिवसांच्या अवधीनंतर विलंबाने पुरवठा केल्यास संबंधित निविदाकाराकडुन मागणीच्या एकुण किंमतीच्या 0.5% प्रति आठवडा याप्रमाणे विलंब शुल्क आकारणी करण्यात यावी. परंतु, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. विलंबाचा कालावधी विचारात घेवुन विलंब शुल्क संबंधित पुरवठादार संस्थेकडून वसुल करुन शासन खाती जमा करुन पुर्तता दर्शवावी

4) Ashish surgical co. या पुरवठादार संस्थेस औषधांचा पुरवठा करणेबाबत एकुण रुपये 65,965/- इतक्या रकमेचे आदेश देण्यात आले होते. परंतु जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद लातुर यांचे दरास मान्यता बाबतचे आदेश क्रमांक 94, दिनांक 17/10/2016 नुसार रुपये 55,386/- इतक्या खर्चास तरतुदीच्या अधीन मान्यता देण्यात आली होती. परंतु दरास मान्यताबाबतचे आदेशानुसार तरतुदीच्या अधीन रुपये 55,386/- इतका खर्च नोंदवुन प्रदान करणे आवश्यक असतांना रुपये 65,965/- इतका खर्च नोंदविण्यात आला आहे जो रुपये 10,579/- ने जादा आहे.

5) Galaxy sales corpn. यांचेकडुन खरेदी करण्यात आलेल्या Inj. Gentamycine 30ml - 14220 नग पुरवठा करणेबाबत एकुण रुपये 4,55,040/- इतक्या रकमेचे आदेश देण्यात आले होते. परंतु जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद लातुर यांचे दरास मान्यता बाबतचे आदेश क्रमांक 385, दिनांक 31/03/2017 नुसार रुपये 3,48,080/- इतक्या खर्चास तरतुदीच्या अधीन मान्यता देण्यात आली होती. परंतु दरास मान्यताबाबतचे

आदेशानुसार तरतुदीच्या अधीन रुपये 3,48,080/- इतका खर्च नोंदवुन प्रदान करणे आवश्यक असतांना रुपये 4,55,040/- इतका खर्च नोंदविण्यात आला आहे जो रुपये 1,06,960/- ने जादा आहे.